

श्री तुळसी देवी



# ॥ श्री तुळसी महात्म्य ॥

॥ श्री तुळसी महात्म्य ॥



॥ श्री तुळसी महात्म्य ॥

॥ श्री तुळसी महात्म्य ॥

## Contents


॥ श्री तुळसी महात्य्म ॥ ........ १

अथः प्रथमोऽध्यायः ........ १

अथः द्वितीयोऽध्यायः ........ ६

अथः तृतीयोऽध्यायः ........ १०

अथः चतुर्थोऽध्यायः ........ १३

अथः पंचामोऽध्यायः ........ २०

अथः षष्टमोऽध्यायः ........ २५

अथः सप्तमोऽध्यायः ........ ३२

अथः अष्टमोऽध्यायः ........ ३८

अथः नवमोऽध्यायः ........ ४२

अथः दशमोऽध्यायः ........ ४७

अथः एकाद्शोऽध्यायः ........ ५१

अथः द्वाद्शोऽध्यायः ........ ५७

अथः त्रयोद्शोऽध्यायः ........ ६१

अथः चतुर्द्शोऽध्यायः ........ ६६

अथः पंचद्शोऽध्यायः ........ ७१

॥ श्री तुलसी कवचम् ॥ ........ ७६

श्री तुलसी देवी नाम अष्टक स्तोत्र ........ ७८

श्री पुण्डरीक कृतं तुलसीस्तोत्रम् ........ ७९


॥ श्री तुळसी महात्य्म ॥

|| श्री तुलसी चालीसा|| ..................................................................................................................................................................................................................................................................................................... ८१

## ॥ श्री तुळसी महात्म्म ॥

# ॥ श्री तुळसी महात्म्म ॥

## अथः प्रथमोऽध्यायः

॥ ॐ श्री गणेशाय नमः ॥ ॐ श्री सरस्वत्यै नमः॥ ॐ श्री गुरुभ्यो नमः ॥॥ ॐ श्री स्वामी समर्थायै नमः॥ ॐ श्री ग्रामदेवतायै नमः॥ ॐ श्री वास्तू देवतायै नमः॥ ॐ श्री स्थान देवतायै नमः॥

॥ अथ तुलसी माहात्म प्रारंभः॥श्री गणेशासीं नमन । ज्याचे ठाई नाहीं भिन्न पण ॥ जो दुम-दुमीत परि पूर्ण ॥ सर्वां ठाई॥॥१॥नमस्कार ऐसिया गणेशा ॥ ज्याच्या कृपेनें अंधकार पावे नाशा । स्मरण मात्रें ज्ञान प्रकाशा ॥ पावे देखा॥२॥प्रसंगीं त्यासीं प्रार्थुनी ॥ वक्ता विनवी जोडूनी पाणी ॥ तुलसी माहात्म्य वदवी वदनी ॥श्री गणेशा तूं॥३॥ आतां नमूं ते शारदा॥जी पासूनि पाविजे कवित्व पदा ॥॥ क्षण मात्रें गार्भाधा ॥ ज्ञान दृष्टी देतजे॥४॥ वक्ता म्हणे माझी विज्ञापना ऐसी ॥ वदावें तुळसी माहात्म्यासीं ॥ तरी कूपा करून दीनासीं ॥ सिद्धी ते पाववी ॥५॥ आतां नमन श्री गुरु ज्ञान देवा ॥ माझा संसार सफळ करावा ॥ जेणें पावेन परतीर ठेवा ॥ ऐसें करीं स्वामिया ॥६॥ हा भवसिंधु तरावयासीं ॥ भगवत्कथा वदवी अहिर्नशी ॥ हेच मती द्यावी मज

दीनासीं ॥ कृपाळुवा ॥७॥ माझिये मनीची कल्पना एसी ॥ कीं वदावें तुलसी माहात्म्यासी ॥ हेचि विज्ञाप़ती चरणासी ॥ देवाधि देवा ॥८॥ श्रवण करितां श्राते तृप्त होती ॥ समाधान पाविजे संत महंतीं ॥ ऐसे करी कृपामूर्ती ॥ देव राया ॥९॥ आतां श्रोतयांसी हेच विनवणी ॥ उदासतान धरावी मनीं ॥ तुळसी माहात्म्य ऐकतां श्रवणीं ॥ महापातके जातील ॥१०॥ हा भवसिंधु तरावयासीं ॥ श्रवण करावें तुळसी माहात्म्या सी ॥ पवित्र होय महा दोषी ॥श्रवण मात्रे ॥११॥ तुम्ही तरी जाणते श्रोते सज़्जन ॥ तुह्मां प्रार्थू- शके कोण ॥ परी प्रसंगोचित्त आपण ॥ तुम्हासी विनंती करीतसें ॥१२॥ आतां मज ध्यावे कृपा दर्शन ॥कथा ऐकावी सावधान ॥ तुळसी माहात्म्य करा श्रवण ॥ महा दोष जातील ॥१३॥स्कंद पुराणींची कथा ॥ सावधान परिसावी आतां ॥ दुश्चित्त न व्हावे श्रोता ॥ म्हणोनि वक्ता विनवितसे ॥१४॥ नैमिषारण्यीं अठ्यायशी सहस्र ॥ बैसले असती ऋषेश्वर ॥ त्यासीं सूत सांगे सविस्तर ॥ तुळसी महात्म्य हें ॥१५॥ कोणे एके दिवसीं ॥ इंद्र बैसला सभेसीं ॥ देव गुरु तया पासीं ॥ बैसलासे ॥१६॥ इंद्र म्हणे गुरु अवधारी ॥ बहुत पाप जाहले पृथ्वी वरी ॥ तरी लोकासीं तरणोपायकरीं ॥ स्वामि राजा ॥१७॥ ऐसी सांगावी कथा ॥ जेणें तरणो पाय होय समस्तां ॥ हरे भवरोगव्यथा ॥ प्राणियांची ॥१८॥ म्हणोनि बहुत प्रकारें ॥ गुरुसींस्त-विलेआदरें ॥ मग सांगता झाला त्वरें॥ बृहस्पती इंद्रासी ॥१९॥ म्हणे ऐकगा-वज्रधरा ॥ जुनाट कथा श्रवण करा ॥ श्रवणें पाविजे परत्रा ॥सर्व लोकी ॥२० ॥श्री तुळसीचे महिमान ॥मज तो न वदवे जाण ॥ब्रह्मा कांहीं वदेल आपण ॥ ऐसे कळो येतसे ॥२१॥ मज तंव वदावया थोडी मती ॥किंचित सांगतो तुजप्रती ॥ ऐसे इंद्रासीं बृहस्पती ॥ बोलता झाला॥२२॥आतां ऐक सावधान ॥ सांगतों तुळसीचे महिमान ॥ श्रवण करितां दोष दारुण ॥क्षण मात्रें दग्ध होती ॥२३॥ प्रल्हाद इंद्रापासी ॥ बैसलासे त्यासमयासीं ॥ तेणे ही बृहस्पतीसीं॥विनवणी केली ॥२४॥ प्रल्हाद म्हणे देवगुरु ॥ आंमहासीं तुमचा आधारु ॥ तु बुद्धिवंत कृपा सागरु ॥ स्वामि नाथा

॥२५॥ तरीं कृपा करीं आम्हा वरी | तुळसी माहात्म्य सांगा झडकरी ॥ श्रवण करितां ये संसारीं ॥ तरोनिया जाइजे ॥२६॥ इंद्र प्रल्हाद त्या समयासीं ॥ विनविते झाले ब्रृहस्पती सीं ॥ गुरु सांगता झाला तयांसी ॥ ते आइकाजी ॥२७॥ गुरु म्हणे इंद्रासीं ॥ तुवां अनुष्टान केलें तुळसी पासी् ॥ म्हणोनि वधिले राक्षसांसीं ॥ सत्य जाणा ॥२८॥ देत्य मारून पावलासी जय ॥ ऐसें अनुष्ठानाचे महिमान आहे ॥ आणिक सांगतो तेंहें ॥ ऐक चित्त देऊनी ॥२९॥ प्रल्हादे तुळसीचें अनुष्ठान ॥ यथा सांग केले आपण ॥ म्हणोनि पावला संपूर्ण ॥ राज्य दैत्यांचें॥३०॥मंगळें केले तुळसीचें अनुस्टान ॥ म्हणोनि पावला भूमीचें अधिष्ठान ॥ भूमि पुत्र म्हणती संपूर्ण ॥ लोकत्रयीं ॥३१॥ तुळसी काष्ठाचें गंध श्रीपती ॥ भावें करूनि भाळीं लाविती ॥ त्याचे ठाई परम प्रीती ॥ भगवंताची ॥३२॥ कंठीं तुळसीची माला घाली॥यज्ञ सूत्री असे बांधिली ॥ कर्णी शिरी असे धरिली ॥ माळा देखा ॥३३॥ ऐशा माळां घालुनि ठाई ठाई ॥ नित्य जप करतां पाहीं ॥ अनंत फळ भोगी तोही ॥ अश्वमेधाचें ॥३४॥ आणिक तो पावे परधाम ॥ पुन्हा त्यासीं नाहीं जन्म ॥ तुटे त्याचा भव भ्रम ॥संसारींचा ॥३५॥ पत्र पुष्प फळतोय ॥ जेणें तुळसीची पूजा कारिताहे ॥ तो परम पावन होय ॥ लक्ष्मी वंत ॥३६॥ द्वारीं तुळसीचे झाड असे ॥ त्यासीं पत्र पुष्प कांहींच नसे ॥ तरी पुजावें उल्हासें ॥ संशय मानसीं न धरावा ॥३७॥ प्राणी झालिया गतप्राण ॥ तुळसी काष्टें जरी होय दहन ॥ तरीतोनिःपाप आपण ॥ सर्व पाप दहन झालें| ॥३८॥ प्रेतासी घांलोनि तुळसी माळा ॥ कीर्तन करीत नेला दहनस्थळा ॥ त्याच्या पातकाचा मेळा ॥ पळे देखा ॥३९॥ हस्ती देखोनी सिम्हासी ।॥ पलायन करी दूर देशीं ॥ तेसा प्राणियाच्या पातकासी ॥ पळ सुटता हे ॥४०॥ संपूर्ण दहन करावयासी ॥ इतुकीं काष्ठे मिळतील कैशी ॥ ऐशिया शंका धराल मानसी ॥ तरी तेही ऐकावें ॥४१॥ एक तुळसी काष्ठ घाली ॥ तेणे अवधीक तुळसी काष्ठे झाली ॥ ऐसे कल्पोनि तये वेळीं ॥ एक तरी काष्ठ घालिजे ॥४२ ॥ त्या दहनांतून अग्नी घेऊनि जाय ॥|आणि होम करिता होय ॥ तरी

एका होमें आठाचे पाहें ॥ श्रेय येईल ॥४३॥ तुळसी काष्ठाचें पुर्ण ॥ अग्नि वरी घाली आपण ॥ घूप म्हणोनिया जाण॥ श्री हरीसीं समर्पी ॥४४॥ त्यासीं शत यागांचें पुण्य ॥ सहस्र घडलीं गोदाने ॥ हा संशय न धरावा मनें ॥पुराणीं पहा ॥४५॥ तुळसी काष्ठ उजळोनी ॥ तो दीप लावी श्री हरी लागुनी ॥ तरी सहस्र दीप उजळिले ऐसे मनीं ॥ श्री हरी मानिता होय ॥४६॥ नेवेद्या वरी प्रोक्षीजे तुळसी तीर्थ ॥ तुळसी पत्र घालीजे नेवेद्यांत ॥ तरी त्याच्या पुण्यास नाहीं मित ॥ तो नैवेध देवासी बहु प्रिय ॥४७॥ ऐसा नैवेद्य समर्पी भगवंता ॥ त्याच्या पुण्यास नाहीं साम्यता ॥ ऐसें जाण तत्वता ॥ निश्चयेसी ॥४८॥ तुळसी तळींची मृत्तिका घेऊन ॥सप्त वर्षे करी अंगासीं लेपन ॥ त्या पुण्याचे फळ न सांगवे जाण ॥ तें अगाध पै ॥४९॥तुळसी काष्ठ उगाळून ॥ त्याणें करीत सेत र्पण ॥ तेरीं पितृ गण संपूर्ण ॥ संतुष्ट होती ॥५०॥ गरुडावरी बैसोन ॥ वैकुंठासीं जाती आपणं ॥ ऐसे घ्राणाचें माहिमान ॥असे देखा ॥५१॥ तुळसी काष्ठ उगाळून ॥ पितृ गणांसीं लावी आपण ॥ तरी अष्ट श्राद्धे केली जाण ॥ एके श्राद्धे ॥५२॥ श्राद्ध काळीं तुळसी काष्ठाचा होम करी ॥ तरी पितृ गण तुप्त स्वर्गनतरीं ॥ ऐसी काष्ट गंधाची थोरी ॥ असे जाणा ॥५३॥ तुळसी काष्ठ उगाळून ॥ शाळिग्रामासी चर्चून ॥ त्याच गंधें आमंत्रण ॥ ब्राम्हणासीं करावें ॥५४॥ ऐसे अवघे बाम्हण ॥ श्राद्धी सांगे आपण ॥ तरींच त्याचे पितृगण ॥ तुप्तहोती ॥५५॥ त्यासी घडे अश्वमेधाचें पुण्य ॥ या विषयी संशय न धरावा जाण ॥ हे तुळसी चें महिमान ॥ अगाध असे ॥५६॥ जयाच्या द्वारी तुळसी वृंदावन ॥ तयासी लक्ष्मी चे काय उणें ॥ स्वयें नारायण आपण ॥ वसे तेथें ॥५७॥ तुळसी विरहित नारायण नसे ॥ ऐसें पुराणीं बोलिलें असे ॥ म्हणूनी धन्यं धन्य ते पुरुष ॥ जे नित्य तुळसी पूजिती ॥५८॥ भाव धरोनिया मनीं ॥ हा ग्रंथ पडे जे श्रवणीं ॥ तै पापा होय धुणी ॥ पद्म पुराणीं हे ख्याती ॥५९॥ दुःस्वपन्न देखिल्या वरी ॥ काराग्रहीं पडे त्या अवसरीं ॥.व्याधी प्राप्त जाहलिया शरीरी ॥ या अध्यायाचा जप करावा ॥६०॥ ऐसे नित्य नेमी चैव ॥ ग्रहण पंच पर्व ॥

जप करावा धरोनि भाव ।।। निश्चयेसीं ॥६१॥ अपस्मारादि प्राण संकट ॥ प्राप्त होता जप करावा एकनिष्ट ॥ अवघें वारील संकट ॥ ऐसें महिमान तुळसीचें ॥६२॥ हा अध्याय श्रवण करील अंतकाळीं ॥ त्यासी नाहीं जन्मावळी ॥ जन्म मृत्यू सीं टाळी ॥ तुळसा देवी ॥६३॥ ऐसा धरून विश्वास ॥ श्रवण करावें तुळसी महात्म्यास ॥ तरी हरती महा दोष ॥ विठ्ठल दास रुद्र म्हणे ॥६४॥

इति श्री स्कंद पुराणे तुळसी महात्म्ये प्रथमोऽध्यायः ॥१॥

॥ श्री स्वामी समर्थार्पणमस्तू ॥श्री गुरु दत्तात्रयार्पणमस्तू॥

॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥

❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# अथः द्वितीयोऽध्यायः

॥ ॐ श्री गणेशाय नमः ॥ ॐ श्री सरस्वत्यै नमः॥ ॐ श्री गुरुभ्यो नमः ॥॥ ॐ श्री स्वामी समर्थायै नमः॥ ॐ श्री ग्रामदेवतायै नमः॥ ॐ श्री वास्तू देवतायै नमः॥ ॐ श्री स्थान देवतायै नमः॥

॥ कित्येकांचा भाव ऐसा मनीं ॥ कीं महाराष्ट्र नायकावें कानीं ॥ एका संस्कृता वांचूनी ॥ ऐकूं नये ॥१॥ तरी बीजावीण वृक्ष वाढेल कैसा ॥पायावीण भिंती चढेना सहसा ॥ ग्राम नसतांसिं वेस कैसा ॥ ठाव असेजी ॥२॥संसकृची टीका महाराष्ट्र ॥ ऐसा असे हा विचार स्पष्ट ॥ विकल्प टाकोनि दूरनष्ट ॥श्रवण कीजे ॥३॥ मत मतांतरे उदंड असती ॥ परी एकात्मता धरावी चित्तीं ॥ भावें तुळसी माहात्म्य श्रवण करिती ॥ तरी इच्छिलें पावती नर नारी ॥४॥ आतां असो हे आडकथा ॥ कथेचें अनुसंधान चालवी आतां ॥ म्हणोनि झाला बोलता ॥ श्रोता वक्तयासी ॥५॥ होजी म्हणोनि वक्ता म्हणे ॥ आतां कथेसीं अवधान देणें ॥ एक चित्ते श्रवण करणें ॥ हे तुळसी माहात्म्य ॥६॥ प्रल्हाद आणि इंद्रासी ॥ ब्रृहस्पती सांगे उभयतांसीं ॥ कथा ऐकावी ऐसी ॥ सांगतों तुम्हा प्रती ॥७॥ इंद्रासी देव गुरु म्हणे ॥ हारि हर एकचि प्रतिमा जाण ॥ भिन्नता नधरावी आपण ॥ हृद्या माजी ॥८॥ जो हरी तोचि हर ॥ ऐसा मानावा निर्धार ॥ शंकराची ही पूजा निरंतर ॥ करीत जावी ॥९॥ आषाढी पासून कार्ति की द्वादशी ॥ सहस्र बेल पत्रें वाहावीं शिवासीं ॥ तरी त्याची फळश्रुती ऐसी ॥ ऐंका तुम्ही ॥१०॥ दरिद्राचा तात्काळ नाश ॥ ज्ञानाचा होय प्रकाश ॥ विद्या प्राप्त होय अनयासें ॥ सत्य जाणा ॥११॥ भाद्रपद शुक्ल चतुर्दाशीस ॥ ऐसें आचरण करावें पुरूषें ॥ तें सांगतो तुम्हास ॥ सावधान ऐकावे ॥१२॥ सहस्त्र बेल पत्रें सहस्र दुर्वा ॥ त्या दिवशी वाहाव्या केशवा ॥ समर्पाव्या देवाधिदेवा ॥ विष्णुनामें ॥१३॥ त्यासीं

आत्म प्राप्ती होय ॥ उत्तम नक्षत्र होऊनि राहे ॥ पुण्य सरलीया जन्मा सये ॥ भाग्यवंता चे पोटीं ॥१४॥ राम नवमी विजया दशमी ॥ पोर्णिमा वैशखी ज्येष्ठ शुध पंचमी ॥ आश्वीन शुद्ध नवमी ॥ एसिया तिथी जाणपां ॥१५॥ कार्तिकी पोर्णिमा मार्गशीर्षी ॥ मकर संक्रांत रविवारासीं ॥ पूजन करावें तें परियेसीं ॥ सांगतों तुम्हा ॥१६॥ शत दुर्वा संपूर्ण ॥ तोडोनि ध्याव्या आपण ॥ सहस्र तुळसी मंजिऱ्या निवडून ॥ ध्याव्या देखा ॥१७॥ मंजिऱ्या ध्यावयाची युक्ति ॥ तें सांगतो तुम्हा प्रती ॥ तें सावधान चित्तीं॥ ऐका तुम्ही ॥१८॥ दोन पाने खाली वरी मंजिरी ॥ ऐशा तोडव्या ते अवसरीं ॥ मग दुर्वा आणि मंजिरीं ॥ विष्णूस समर्पाव्या ॥१९॥॥ तरी सदा सर्व काळ ॥ यश पावे प्रबळ ॥ तयासी संतुस्ट गोपाळ ॥ सर्व काळ होतसे ॥२०॥ एकादशीस करावें जागरण ॥ तुळसी वृंदावनी हरि कीर्तन ॥ तरी कोड जाय जाण ॥ कर्त्या पुरुषाचें ॥२१॥ तुळसीचे भावें पूजन ॥ पार्वती ने केले आपण ॥ मग शंकर प्राप्ती झाली जाण ॥ तुळसी कृपेनें॥२२॥सावित्री ने केले तुळसी पूजन॥ब्रम्ह देवा पावली आपण ॥ ऐसें तुळसा देवीचे महिमान ॥ आहे देखा ॥२३॥ अरूनधती स्त्री वसिष्ठाची ॥ सेवा करिती जाहाली तुळसीची ॥ प्राप्ती झाली वसिष्ठाची ॥ तये लागीं ॥२४॥ रुक्मिणीसी पाहिजे कृष्ण प्राप्ती ॥ म्हणोनि तुळसी सेवा झाली करिती ॥ तिचे कृपेनें जाहली प्राप्ती ॥ श्री कृष्णाची ॥२५॥ तुळशी चे अनुष्ठान ॥ देव गुरु ने केले आपण ॥ संजीवनी विद्या संपूर्ण ॥ प्राप्त जाहली ॥२६॥ समुद्र उल्लंघवयाते ॥ वायुपुत्रे केलें अनुष्ठानातें ॥ मग बळ पावला पूर्णते ॥ पैलतीरा जावया ॥२७॥ शेषा ने तुळसी चे अनुष्ठान ॥ बहुत केले आपण ॥ मग उर्मी मस्तकीं धरून ॥ उचलिली ॥२८॥ राज्य पावला नाग लोकींचें ॥ ऐसें महिमान तुळसीचे ॥ गुरु सांगे आपुले वाचे इंद्रादि प्रल्हादासीं ॥२९॥ श्री रामे केलें अनुष्ठान ॥ तुळसी प्रसन्न जाहली आपण ॥ वर दीधला संपूर्ण ॥ श्री रामासीं ॥३०॥ रावण कुंभकर्णाचे निर्दळण ॥ रामा तूं करिसील जाण ॥ जय पावसी संपूर्ण ॥ युद्ध समयीं ॥३१॥ गणेशानें केली सेवा ॥ प्राप्त झाला चतुर्दश विद्येचा ठेवा ॥ गजासुराचा प्राणध्यावा ॥ ऐसा वर दीधला ॥३२॥कार्तीक स्वामी आपण ॥ करितां जाहला तुळशी चें आराधन ॥ वर पावोनिया तेणे ॥तारकासुर वधियेला ॥३३॥ नंदिकेश्वर आपण ॥ करिता झालाव आराधन॥ तात्काळ जाहला

वहन ॥ श्री शंकराचें ॥३४॥ तुळसीचे कृपें करून ॥ क्षीर सागर केला प्राशन ॥शुभ वर्ण झाला तेणें ॥ वरदें-देखा ॥३५॥ वीरभद्रे तुळसी चें अनुष्टान ॥ करून केलीं सुप्रसन्न ॥ वर मागोनियां आपण ॥ दक्षाचें शिर तोडिलें ॥३६॥ तुळसीचें आराधन॥ शंकरे केले आपण ॥ मग वर पावोनि जाण ॥ त्रिपुर मारिला ॥३७॥ गरुडं केलें अनुष्टान ॥ वर पावला परिपूर्ण ॥ मग उल्लंघिता जाहला आपण । सप्त समुद्र ॥३८॥॥ वरदानें नाग कुळ मारितां जाहला ॥ अमृतासीं घेऊन आला ॥ स्वये विष्णूचा होऊनि ठेला ॥ वहन देखा ॥३९॥ अष्टलोकपाळ निर्मळ ॥ अनुष्ठान करिते झाले तात्काळ ॥ मग अष्टदिशाधि पति सकळ. ॥ होऊनि ठेले ॥४०॥ सरस्वती आपण॥ करिती झाली आराधन ॥ वर पावोनिया जाण ॥ त्रिभुवन व्यापिलं ॥४१॥ तुळसीचे अनुष्ठान ॥ दुर्गो देवीने केलें आपण ॥ वर पावोन वधिले कोण ॥ ऐकानामें तयांची ॥४२॥ चंडमुंड-महिषासुर ॥ मारिती झाली सत्वर ॥ निर्दाळूनियां असुर॥ विजयी झाली ॥४३॥ मार्केंडेय ऋषीने केले अनुष्ठान ॥ चतुरदश कल्पे आयुष्य पावला जाण ॥ ऐसे हे महिमान ॥ तुळसा देवीचं ॥४४॥ रंभेनें केले पूजन ॥ देवांगना झाली वरें करून ॥ देवसभेसी असे जाण ॥ अद्यापि वरी ॥४५॥ ऐसे जेणें केले अनुष्टान ॥ त्याचे मनोरथ झाले पूर्ण ॥ आतां पत्रें न तोडावी जाण ॥ ते तिथि वार ऐकावें ॥४६॥ संक्राति द्वादशी शुक्रवार ॥ रवि भोमव्यापती पात साचार ॥ या दिवशी तुळसी पत्र ॥ सहसा ही तोडू नये ॥४७॥ जे पत्रें तोडिती तये दिवशीं ॥ ब्रम्ह हत्या घडे त्यांसीं ॥सौशय न धरावा मानसीं ॥ पुराणी पहा ॥४८॥ माघ द्वादशीस पूजा घडे ॥ तरी अश्वमेधाचें पुण्य जोडे ॥ चुके संसार सांकडें ॥ ऐसें पुराण बोलतसे ॥४९॥ अर्दोदयीं रविवारीं ॥ माघ मासीं स्नान करी ॥ तुळसी मृत्तिका लाऊन जरी ॥ सर्वांगासीं॥५०॥ तरी त्याचीं तीन कुळें उद्धरती ॥ हे यथार्थ जाणावें समर्थी ॥ विकल्प न धरावा चित्तीं ॥हें पुराणीं बोलिलें ॥५१॥ फाल्गुणी पोर्णिमा दशमी अमा ॥ द्वादशीस घेतले नेमा ॥ पूजा करोनि पुरुषोत्तमा ॥ संतुष्ट कीजे ॥५२॥ दीप लाऊनि रात्रीसी ॥ नैवेद्य समर्पावा तुळसीसीं ॥ ऐसें केलिया नेमेसी ॥ जन्म मृत्यु तया नाहीं ॥५३॥ चैत्र मासी पोर्णिमेसीं ॥ पायसान्न भोजन

ब्राम्हणासी ॥ संतुष्ट करावें वृंदावना पासीं ॥ तरी सिद्धी प्राप्त होती ॥५४॥अक्षय्य तृतीयेचे दिवसीं ॥ तुळसी वृन्दावानी ब्राम्हणासीं ॥ दधान्य भोजन घालावें त्यासीं ॥ तरी तो वासवलोकासीं जाय ॥५५॥

इति श्री स्कंद पुराणे तुळसी महात्म्ये द्वितीयोऽध्यायः ॥१॥

॥ श्री स्वामी समर्थापणमस्तू ॥श्री गुरु दत्तात्रयार्पणमस्तू॥

॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥

❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# अथः तृतीयोऽध्यायः

॥ ॐ श्री गणेशाय नमः ॥ ॐ श्री सरस्वत्यै नमः॥ ॐ श्री गुरुभ्यो नमः ॥॥ ॐ श्री स्वामी समर्थायै नमः॥ ॐ श्री ग्रामदेवतायै नमः॥ ॐ श्री वास्तू देवतायै नमः॥ ॐ श्री स्थान देवतायै नमः॥

हा अध्याय करितां श्रवण ॥ तरी आयुष्य होय संपूर्ण ॥ सर्व रोग हरे जाण ॥ निश्र्च्चयेसीं ॥१॥ ऐश्वर्य पावे आपण ॥ अंत काळीं विष्णु पद प्राप्त जाण ॥ ऐसे बोलिले आपण ॥ देव गुरु ॥२॥ इंल्द्र प्रह्लाद अमरावतीं ॥ उभयतां बैसले असती ॥ देव गुरु तयां प्रती ॥ तुळसी माहात्म्य सांगताहे ॥३॥ सूर्यवंशी राजा दशरथ जाण ॥ तो निपुत्रिक असे बहुत दिन ॥ बहुत कष्टी होतसे जाण ॥ पुत्रा कारणें उभयतां ॥४॥ जळो जळो हें सुख ॥ निपुत्रिकाचें पाहो नये सुख ॥ पृत्रावीण मज होतसे दुःख ॥ तें काय सांगु कोसलये ॥५॥ निपुत्रिका चे घरचे अत्र ॥ नघेती भले सज्जन ॥ निपुत्रिका चें वदन ॥ अवलोकन करूं नये ॥६॥ म्हणोनियां मज निंदिती जगीं ॥ या लागीं हळ हळ होतसे आंगीं ॥ ऐसे बोलोनि ते प्रसंगीं ॥ दुःखित जाहला ॥७॥ बहुत शोक केला रायें ॥ तयासीं कोसल्या बोलत आहे ॥ म्हणे कांहीं करावा उपाय ॥ पुत्र प्राप्तीचा ॥८॥ शोक केलिया सार्थक काय ॥ ऐसा कांहीं करावा उपाय ॥ जेणे कार्य सिद्धी होय ॥ तो वीचार करावा ॥९ ॥ तुम्ही तों राया सर्वज्ञ ॥ मी काय बोलु अज्ञान ॥ ऐसे ऐकोनियां वचन ॥ राव बोलता जाहला ॥१०॥ म्हणे मी तो पुत्र न देखे निभ्रात ॥ तुज कांहीं उपाय असेल सुचत ॥ तरी मज करावा श्रुत ॥ येसमई॥११॥ परिसोन रायाचें वचन ॥ कोसल्या बोले जाण ॥ म्हणे राया चित्त देऊन ॥परि सातुम्ही ॥१२॥ श्री भगवंतासीं जावें शरण ॥ सेवा करावी आपण ॥ तो झालिया सुप्रसन्न ॥ सर्व मनोरथ पुरतील ॥१३॥ जगदीशया वेगळा कोण दाता ॥ हे सत्य निज तत्वतां ॥

म्हणोनीयां आतां ॥ हरि सेवा करावी ॥१४॥ परिसोनि कोसल्ये चे वचन ॥ रायास मानले प्रमाण ॥ म्हणे धन्य धन्य तुझे ज्ञान ॥ उत्तम उपाय सांगीतला ॥१५॥ मग राये एकनिष्ठा धरूनी ॥ बेसतां झाला एकासनीं ॥ हरि स्मरण करी मनीं ॥ राजा दशरथ ॥१६॥ तव अकस्मात भगवंत ॥ देखिलासे मूर्तिमंत ॥ शांख चक्र गदा पद्म संयुक्त ॥ देखिले श्री हरीसी ॥१७॥ पीतांबर परीधान केला ॥ कर्णी कुंडलांचा झळाळा ॥ चतुर्भुज घन सांवळा ॥ भेटता झाला वेगेसी ॥१८॥ हरी म्हणे दशारथासीं ॥ इच्छा काय आहे मानसीं ॥ राजा म्हणे पुत्र माझा होसी ॥ तरी माझी इच्छा पुरेल ॥१९॥ बहुत बरवे हरी म्हणे ॥ तुझा पुत्र मी स्वयें होईन ॥परी र् सांगतों ते करणें ॥ राया दशरथा ॥२०॥ म्हणे दशरथा परियेसी ॥ अनुष्ठान करी तुळसी पासीं ॥ एक संवत्सर अनुष्ठानासीं ॥ करी राया ॥२१॥ संतुष्ट होऊन तुळस ॥ पुत्र देईल तुह्मांस ॥ ऐंसें सांगोन हृषी केश ॥ मागुती गुप्त जाहाले ॥२२॥ रायें सांगीतलें कोसल्ये सीं ॥ दोघें अनुष्ठान करिती तुळसी पासीं ॥ राहिलीं नित्य नेमेसीं ॥ येक संवत्सर ॥२३॥ मग तुळसा देवी होऊन प्रसन्न ॥ रायासीं दिधलें वरदान ॥ चार पुत्र होतील जाण॥ राया दशरथा ॥२४॥ ऐकोनि तुळसीचें वरदान ॥ रायाचे संतोषले मन॥ सांग करोनि पुजार्चना ॥ व्रत समात्त केले तें ॥२५॥ पुढें दशरथासीं जाहाले चारपुत्र ॥ राजाधिराज श्री रामचंद्र ॥ जो नरामध्ये नरेंद्र ॥ देवाधि देव ॥२६॥ लक्ष्मण भरत शत्रुघ्न ॥ ऐसे चवघे झाले निर्माण ॥ देखोनि हरला शिण॥ राया दशारथाचा ॥२७॥ ऐसं अनुष्ठान करितां ॥ प्रचीत आली दशरथा ॥ सद्वावें तुम्ही आचरतां ॥ अनुभव त्वरित येईल ॥२८॥ ऐसे तुळसी चें महिमान ॥ गुरु सांगे आपण ॥ इंद्र प्रह्लाद परिसती जाण ॥ आनंदे करूने ॥२९॥ स्कंद पुराणी चें बोलणे ॥ तुळसी माहात्म्य परिसणे ॥ हा अध्याय करितां श्रवण पठण ॥ आरोग्य करी सर्वदा ॥३०॥ क्षत्रिय युद्धीं पावे जय पूर्ण ॥ वेश्य पठण करितां जाण ॥ तुळसी माहात्म्यॅ करून ॥ धन धान्य प्राप्त होय ॥३१॥ ब्राह्मणासी प्रसन्न झालिया होय ज्ञान॥ शूद्रासीं मुक्ति भुक्ति पावन॥ स्त्रियांसीं सौभाग्य वरदन ॥ श्रवण मात्रें होय

देखा ॥३२॥ आयुर आरोग्य होय अवघि यांस ॥ आयुष्य \वार्धमान तयांस ॥ ऐसे फळ असे विशेष ॥ तृतीयाध्यायाचें ॥३३॥ लक्ष्मी होय परि पूर्ण ॥ अंतीं विष्णु पद प्राप्त जाण ॥ म्हणोनि हाअध्याय पठण ॥ सर्वत्रांहीं करावा ॥३४॥ देव गुरू नें सांगीतले ऐसें ॥ तेंचि श्रोतयांसीं सांगतसे ॥ उदास न करावीं मानसें ॥ विठ्ठलदास रुद्र म्हणे ॥३५॥ ॥

इति श्री स्कंद पुराणे तुळसीमाहात्म्ये तृतीयोइध्यायःसमाप्त ॥

॥ श्री स्वामी समर्थापणमस्तू ॥श्री गुरु दत्तात्रयार्पणमस्तू॥

॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥

❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# अथः चतुर्थोऽध्यायः

॥ ॐ श्री गणेशाय नमः ॥ ॐ श्री सरस्वत्यै नमः॥ ॐ श्री गुरुभ्यो नमः ॥॥ ॐ श्री स्वामी समर्थायै नमः॥ ॐ श्री ग्रामदेवतायै नमः॥ ॐ श्री वास्तू देवतायै नमः॥ ॐ श्री स्थान देवतायै नमः॥

॥ सूत सांगे त्रषेश्वरां प्रती ॥ इंद्र प्रल्हादासांगे बृहस्पती ॥तेचि कथा सकळ श्रोतीं ॥ प्रीती करूनि ऐकावी ॥१॥ जयाचे द्वारीं नाही तुलसी वृंदावन ॥ त्याचें गृह स्मशान जाण ॥ त्या गृहीं न जावे आपण ॥ बैसावयासीं ॥२॥द्वारीं असावे तुळसी वृंदावन ॥ प्रातःकाळीं नमस्कार करावा आपण ॥ सव्य घालोनियां जाण ॥ कार्यासी जावें ॥३॥ जपमाळां घेऊन करी ॥ सोळा नावें निरंतरीं ॥ अनुष्ठान निर्धारीं ॥ जो करील कोणी ॥४॥ त्यासी होय वेकुंठ प्राप्ती ॥ चिर काळ राहे वैकुंठा प्रती ॥ ऐसी ऐकून गुरूची वदती ॥ प्रल्हाद बोलता जाहला ॥५॥ प्रल्हाद म्हणे गुरू प्रती ॥ सोळा नावें कोण कोण असती ॥ तीं सांगावीं मज प्रती ॥ कृपा मूर्ती कूपाळुवा ॥६॥ ऐकोनि प्रल्हादाचा प्रश्न ॥ देव गुरू बोलता झाला आपण ॥ सोळा नांवें संपूर्ण ॥ ऐका आतां ॥७॥ तुळसी नाम एक ॥ श्री नाम दुसरें देख ॥ तिसरें बोलिले आवश्यक ॥ म्हणा ऐसे ॥८॥ लक्ष्मी नाम चवथें ॥ विद्या पांचवे नेमस्तें ॥यशश्री साहावें गणितें ॥ केले आहे ॥९॥ धर्माधर्म माना ॥ सातवे नाम जाणा ॥देवी आठवें म्हणा ॥ नामें देवीचीं ॥१०॥ देव देवि ममप्रिये

॥ नववें नाव जाणती स्वयें ॥ लक्ष्मी नाम दशमहोय ॥ निश्चयेसीं ॥११॥ सखी नाम एकाश ॥ शुभ नाम द्वादश ॥ भूमि नाम त्रयोदश ॥ जाणावे पै ॥१२॥ अचळ नाम चतुर्दश ॥अमिला नाम पंचदश ॥ अमळा नाम षोडष ॥ ऐसी नामें सांगीतलीं ॥१३॥ याउपरी प्रल्हाद म्हणे स्वामी ॥ हीं नामं सांगीतली तुह्मीं ॥ तीं परिसोनियां आह्मीं ॥ समाधान पावलों ॥१४॥ आतां कृपा करून गोसावी ॥ पुढें कथा चालवावी ॥ हे विज्ञापती ऐकावी ॥ गुरुवार्या ॥१५॥ परिसोन प्रल्हादाचोचे वीज्ञापन ॥ गुरु सांगता झाला आपण । म्हणे चित्त देऊनियां श्रवण ॥ करावें पुढील कथेंसीं ॥१६॥ ऋद्राक्ष तुळसीचे मणी ॥ माळा कीजे एकत्र मेळउनी ॥ एके माळेंत मणी ओवूने ॥ अष्टाक्षरी जप कीजे ॥१७॥ सर्व पाप निरसन होय ॥ ऐसा महिमा तयाचा आहे ॥ जप केलिया पाहे ॥ मनोरथ पूर्ण होती ॥१८॥ तुळसीचा वारा प्रेता वरूनी जाय ॥ तरी तो मुक्त होऊनि राहे ॥ अंती फळ पावताहे ॥ विष्णु लोक सायुज्यता ॥१९॥ ऐसें सांगतां गुरुसीं ॥ प्रल्हाद पुसता झाला तयासीं ॥ स्वामि जे कथा सांगीतली ऐसी॥ तरी उद्धार कोणाचा जाहला॥॥२०॥ तेंचि सांगावें मजरंका ॥ श्रवण केलिया पुरे आशंका ॥ ऐसे म्हणोनियां देंखा। गुरू विनविला ॥२१॥ गुरु म्हणे प्रल्हादासीं ॥ तुवां प्रश्न केला ऐसि यांसीं ॥ तेचि कथा सांगतों तुम्हासीं ॥ सावध ऐका ॥२२॥ पोंड्रीक नामा लुब्धक देखा ॥ तो महा पापी ऐका ॥ संख्या नाहीं पातका ॥ तया चिया ॥२३॥ उपजल्या दिवसा पासूनी ॥पोट भरीना नाहिंसा करुनी ॥ अखंड हिंडे जाय वनीं ॥ श्वापदे मारावयासीं ॥२४॥प्रत्यहीं शत मृग मारी ॥ परी त्याची नव्हे पोट भरी ॥ मग दुसरा उपाय करी ॥ तोही ऐका ॥२५॥ वाट पाडी मार्गस्थाचा शिरच्छेद करी ॥ त्याची मात्रा घेऊनि जाय घरीं।तयानें उदर पूर्ति करी ॥ पोंडिक कोळी तो ॥२६॥ ऐसें करितां कोणे एके दिवसीं ॥ कांहींच न मिळेसें झाले तयासीं ॥ उपवास पडले त्यासीं ॥ पांच देखा ॥२७॥ अरण्या प्रती जंव जाय ॥ तव वनीं न मिळेतोय ॥ यास्तव श्वापदे गेलीं पाहे ॥ त्या अरण्यांतुनी ॥२८॥ पक्षी मात्र गेले तेथूनी ॥ मग कोळी आला परतोनी ॥ पिता वघू नित्याचें मांस वदनीं ॥ घालिता झाला ॥२९॥ पिता क्रमलिया ऐशापरी ॥ मग माता वधूनि पोट भरी ॥ तेहि क्रमलि यावरी

॥ स्त्री भक्षिली ॥३०॥ मग पुत्र भक्षिला तेणें ॥ तीस मग्न भक्षुन आपण ॥ हिंडता झाला वनोवन ॥ पूर्व स्थळें ॥३१॥ तव तेथें व्याघ्र होता दरींत ॥ निर्माण झाला अकस्मात ॥ तेणें कंठी धरिला निमिषांत ॥ तयासीं देखा ॥३२॥ मग प्राण गेला तेठाई ॥ तुळसीवरून वायु आला लवलाहीं ॥ तो स्पर्शला पाहीं ॥ महा पापियासी ॥३३॥ तुळसीचें पक्वपर्ण ॥ वायुवेगें उडाले जाण ॥ त्या प्रेताच्या हृदयावरी जाउन ॥ पडिले देखा ॥३४॥ मग यमदूत आले ते अवसरीं ॥ त्यासीं नेले यमपुरीं ॥ उभा केला पुढारी ॥ यम धर्मा पासीं ॥३५॥ यमें पाहूनि त्यांसीं ॥ मग पुसिले चित्रगुपतासीं ॥ याची वर्तणूक आहे केसी ॥ किती पुण्य पाप ॥३६॥ चित्रगुप्त म्हणे स्वामी । हा जन्मा पासूनी अधर्मी ॥ पुण्याचे क्रिया कर्मी ॥ प्रवर्तला चि नाहीं ॥३७॥ याचें पाप बहुत असे ॥ पुण्य तिळभरी नसे ॥ सांगतां यमधरमास ऐसें॥क्रोध बहुतची आला ॥३८॥ यम म्हणे दूतांसी ॥ आपुला पराक्रम दाखवा यासीं ॥ताडण करा महा पापि यासी ॥ यमदूतहो ॥३९॥ ताडण करूनि यासीं ॥ कुंभपाकीं टाका त्वरेसीं ॥ तेथें कित्येक दिवस का साविसी ॥ होऊं देणें ॥४०॥ मग शून्य करयो नीसीं ॥ जन्म घालावा यासी ॥ तो भोगिल्या वरी यासीं ॥ पक्षी योनींत घालारे ॥४१॥ पक्षियांत कुश्वळ असती ॥ तेथें घालावा याजप्रती ॥ ऐसि आज्ञा करिती ॥ यम रावो ॥४२॥ ऐसि आज्ञा होत पुरे ॥ तों दूत विक्राळ झाले त्वरे ॥ महा भयानक शरीरे ॥ ताडण करिते जाहले ॥४३॥ पाश अंकुश मुसळें ॥ एकत्र करूनि मारिती बळें ॥ताडण करून तये वेळे ॥ कुंभ पाका जवळी नेला ॥४४॥ जोटाकावा कुंभपाका भीतरीं ॥ तव ऐसी झाली नवल परी ॥ ते प्रल्हादा अवधारी ॥ चित्त देउनी ॥॥४५॥ अंतरव्यापक श्री हरी ॥ त्यासीं कळलें अंतरी ॥ पोंड्रीक कुंभपाका भीतरी ॥ टाका वया पै नेला ॥४६ ॥ मग महाराज होऊन कृपावंत ॥ स्वयें दूतांसी आज्ञा करित ॥तुह्मीं धांवा धांवा त्वरित ॥ पोंडरीक येथें आणावा ॥४७॥ यम दूता पासूनी ॥ बळेंच घ्यावा असडुनी ॥ युद्धांसी आले तरी युद्ध करुनी ॥ आणा वा येथें ॥४८॥ ऐसी आज्ञा दुतांसीं ॥ सांगता जाहला हषी केशी ॥ आज्ञा वंदूनि मस्तकासीं ॥ दूत तेव्हां निघाले ॥४९॥ दूत येउनी यमपुरी सीं ॥ बोलते जाहले यमदूतांसी ॥ आज्ञा

आहे ऐसी ॥आमुचे स्वामी ची ॥५०॥ हा पोंड्रीक आमुच्या हातीं द्यावा ॥ आह्मीं नेऊन भेटऊं देवा॥तुम्ही अनमान न करावा ॥ यम दूतहो ॥५१॥ यमदूत म्हणती त्यांसी ॥ जाउनी पुसा यमा पासीं ॥ त्याची आज्ञा होईल आम्हासीं ॥ तरी हातुमच्या हातीं देऊं ॥५२॥ विष्णुदास म्हणती आह्मांसी ॥ काय कारण पुसावयासीं ॥ आम्ही बळेंच नेऊं यासीं ॥ हे सत्य जाणा ॥५३॥ यासीं आमुच्या हातीं देणें ॥ तुम्ही आपुळें महत्व राखणें ॥ नाहीं तरी युद्ध करणें ॥ आह्मासीं तुम्ही ॥५१४॥ ऐसें बलोनि करीं ॥ शस्त्र धरिते झाले करीं ॥ मग यमदूत ये अवसरीं ॥ युद्धासीं प्रवात्रले ॥५५॥ परस्परं युद्ध जाहाले घोरांद्र ॥ भूमीका पिन्नली थोर ॥ मग यमदूतासीं करोनि जर्जर ॥ पोंड्रीक नेला ते वेळीं ॥५६॥ नेउनियां वैकुंठासी ॥ भेटविला श्री हरी सीं ॥ आलिंगूनीयां तयासीं ॥ हरीनें सन्निध बैसविला ॥५७॥ तो यम दुत जाऊनि यमा पासीं ॥ दंड समार्पिले त्यासीं ॥म्हणती स्वामी आम्हासीं ॥ परम पीडा जाहली ॥५८॥ विष्णू दूत येऊनि आपण ॥ आम्हासीं युद्ध केले दारुण॥ पोंडीक पापी नेला तेणें ॥ वेकुंठासी॥५९॥ परिसोन दूतांचें वचन ॥ क्रोधायमान झाला सूर्यनंदन ॥ मग चित्रगुपता कडे अवलोकुन ॥ क्ररदृष्टीने पाहिलें ॥६०॥ म्हणे पुण्यावांचून वेकुंठासी ॥ नेणार नाहीं हषीकेशी ॥ म्यां तुज पुसिले ऐसियासीं ॥ त्वां सांगीतले पुण्यनाही ॥६१॥ तरी सूक्ष्म दृष्टीने पाहणे ॥आणि याचा वृत्तांत मज सांगणें ॥ सांगावया उशीर नकरणें ॥ अद्र्ध्पळ ॥६२॥यमाची आज्ञा प्रमाण ॥ चित्र गुत्त पाहे शोधून ॥ तंव तिळाचा शातौंश दा भाग जाण ॥पुण्य निघाले ॥६३॥ चित्र गुप्त म्हणे यमासीं ॥ तिळाचा शततांशा भाग आहे यासीं ॥ऐसे ऐकतां चित्र गुत्तासी ॥ यम बोलता जाहला ॥६४॥ पहिले कां नाहीं बोलिलासीं ॥आतां ऐसें सांगसी ॥ तरी पुण्य कोणते प्रकारचें ते आह्मासीं ॥ सविस्तर श्रृतकरीं॥६५॥चित्रगुत्त म्हणे यमासीं ॥ तुळसी वन होतें अरण्यासीं ॥ ते स्थळीं देहत्याग घडला यासीं॥सत्य जाणा ॥६६॥ वायु गेला तुळसी वरूनी ॥ त्याचा स्पर्श झाला या लागुनी ॥ गळित पत्र एक उडोनी ॥ याचे हृद्यीं पडियेळें ॥६७॥ इतुके पुण्य यासीं घडले ॥ म्हणोनि विष्णु दूतीं नेळें ॥ ऐसै परिसतांच भरलें ॥ क्रोधाचें भरतें मानसी ॥६८॥ म्हणे

याचें पुण्य ते किती ॥ यासी वैकुंठीं जावयाकेंची शात्की ॥ आतां जाऊनि विष्णुप्रती ॥त्याचा अधिकार नीरऊं ॥६९॥ मग होऊनि क्रोधाय मान ॥ यम चालिला आपण ॥विष्णु भुवनीं सूर्य नंदन ॥ येता जाहला ॥७०॥ जव आला विष्णुचे द्वारीं ॥ तंव वर्जिती वेत्र धारी ॥ आज्ञा विरहित भीतरीं ॥ न जावे तुम्ही ॥७१॥ प्रविष्ट करूं समाचार ॥आज्ञे प्रमाणें जावें भीतर ॥ ऐसें म्हणोनियां स्थिर ॥ यमां सींकेले ॥७२॥ यम बाहेर बैसविला । द्वार पाळीं समाचार श्वत केला ॥ मग दूतांसी आज्ञा करिता झाला ॥ देवा धिदेव ॥७३॥ म्हणे यमासीं येऊं देणें ॥ म्हणोनि आज्ञा केली नारायणें ॥ मग द्वार पाळ सांगती येउन ॥ यम रायासीं ॥७४॥ आज्ञा झाली तुम्हासीं ॥ भीतरी जावें भेटीसीं ॥ आले तिज्या कार्यासी ॥ तें करोनि घेणें ॥७५॥ मग यमगेला भीतरीं ॥ सास्टांग नमस्कार करी ॥ तंव देखता झाला समोरी ॥ पोंड्रीकासीं ॥७६॥ हरि सन्निध बेसलासे ॥ यमदृष्टीनें देखतसे ॥ मग क्रोधें बोलतसे ॥ यम हरीसीं ॥७७॥ म्हणे हा परम चांडाळ पातकी ॥ यासीं तुम्ही आणिलें विष्णुलो कीं ॥ आणूनियांसेखीं ॥ आपुले सन्निध्य बैसविला ॥७८॥ हा तों परम चांडाळ ॥ यासीं आह्मीं दंड करावा केवळ ॥ ते नसता ये वेळे ॥ यासीं पाठीसीं घातले ॥७९॥ परे तुमच्या अधिकारासीं ॥ हा कार्य भाग सांगा आणिकासीं ॥ ऐसें बोललोनि हा तिच्यादंडासीं ॥ पुढें ठेविळे ॥८०॥ म्हणे देवादि देवा पुरुषोत्तमा ॥ ब्रह्मा दिका न कळे महिमा ॥ सर्व साक्ष आत्मारामा ॥ पूर्ण कामा सर्वेशा ॥८१॥ हें त्रिभुवन तुझ्या उदरीं ॥ तूं खेळविसी सूत्र धारी ॥ ऐसा तु परमात्मा श्री हरी ॥ अनंत व्यापक ॥८२॥ तूं देवांचाहिदेव ॥ या ब्रह्मांडाचा जीव ॥ परी तुझे करणीचा नवलाव ॥ अपूर्व देखा ॥८३॥ या चांडाळाचें पुण्य ॥॥ तिळाचा शातौंश भाग जाण ॥ यासीं तुवां वेकुंठासीं आणुन ॥ आपुले सन्निध बैसविला ॥८४॥तुळसी वरून आला वारा ॥ तो लागला याच्या शरीरा॥ तेणें याच्या पातकाचा मोडला थारा ॥ हें मज अपूर्व वाटतें ॥८५॥ आतां तुळसी वरून वारा ॥ येऊन लागेल पामरा॥ मग सर्व आणाल वैकुंठ पुरा ॥ मग दंड करावा कोणासीं ॥८६॥ तुमची आज्ञा ऐसी ॥कीं दंडकरावा पापियासीं ॥ तरी या चांडाळा सीं ॥ पाठीसीं केसें घातलें ॥८७ ऐसें बोलिला

यम॥ त्यासीं उत्तर दे पुरुषोत्तम ॥ म्हणे हा परम उत्तम ॥ परम पुण्यात्मा॥।८८॥जें तुळसी वरून आला वारा ॥ स्पर्श केला याचिया शरीरा ॥ तें पवित्र झाला सारा ॥देह याचा ॥८९॥ हा परम झाला पुनीत ॥ याच्या पुण्यासीं नाहीं मित ॥ हे तुह्मी जाणा नेमस्त ॥ यम राया ॥९०॥ आणिक सांगतों एक ॥ याचें पूर्व पुण्य असे देख ॥ या स्तव पावला विष्णुलोक ॥ पोंड्रीकहा ॥९१॥ हा मज पर मप्रिय ॥ मदना हून अधिक होय ॥ त्या पुत्रापरीस यावरी स्नेह ॥ माझा याचे ठायीं ॥९२॥ ऐसें देवाचें बोलणें॥ परिसोन चकित झाला मनें ॥ मागुती त्यासी नारायण ॥ काय बोलता जाहला॥९३॥ आतां तुम्ही आपुल्या स्थळासीं जावें ॥ आपुले कार्य करून सुखी राहावे ॥ तुळसीची सेवा करिती तिकडे न जावें ॥ यमदूतीं ॥९४॥ ऐंसं बोलोनि ते अवसरीं ॥ यमासी हृदयीं आलिंगी श्री हरी ॥ मग विडा देऊनियां करीं ॥ परम समाधान केले ॥९५॥ आज्ञा दिधली तयासीं ॥ यम जाता झाला निज स्थळासीं ॥ गुरु सांगे ईद्र प्रल्हादासी ॥ कथा पोंड्रीकाची ॥९६॥ ऐसें तुळसीचें महिमान ॥ वायू नें महापापी उडरिला जाण॥ | इंद्रप्रल्हाद ऐकती आपण ॥ देवगुरु बोलतसे ॥९७॥ हें तुळसी माहात्म्य ॥ ऐकती पढती धरून नेम ॥ तयासी श्री पुरुषोत्तम ॥ आपणा जवळी रक्षित ॥९८॥ क्षत्रिय हा अध्याय करितां पठण ॥ तरी युद्धी जय पावती आपण ॥ वेश्य पठण करितां जाण ॥घन प्रापती होय त्या ॥९९॥ ब्राह्मणा प्राप्त होय ज्ञान ॥ शूद्रासीं भुक्ति मुक्ति जाण ॥ स्त्रियांसीं सोभाग्य संपूर्ण ॥ होय देखा ॥१००॥ आरोग्य होय सकळांस ॥ आयुष्य होय बहुवस ॥ ऐसें फळ हें असे ॥ या अध्यायाचें ॥१०१॥ लक्ष्मी होय संपूणे ॥ अंतीं विष्णु पद प्राप्त जाण ॥ म्हणोनि हा अध्याय पठण ॥ करावा देखा ॥१०२॥ सूत सांगे ऋषेश्वरां प्रती ॥ त्याचीं उच्चिष्ट उत्तरे तुम्हा प्रती ॥ सांगीतलीं अल्पमती ॥ श्रवण भावें करावीं ॥१०३॥ जो श्रवण करी तुळसी माहात्म्यास ॥ तरी गणना नाहीं त्याचे पुण्यास ॥ विश्वास धरावा मानस ॥ विठ्ठल दास रुद्रम्हणे ॥१०४॥

इति श्री स्कंदपुराणे तुळसी माहात्म्ये चतुर्थो्याय ॥आ. ४॥

॥ श्री स्वामी समर्थार्पणमस्तू ॥श्री गुरु दत्तात्रयार्पणमस्तू॥

॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥

❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# अथः पंचामोऽध्यायः

॥ ॐ श्री गणेशाय नमः ॥ ॐ श्री सरस्वत्यै नमः॥ ॐ श्री गुरुभ्यो नमः ॥॥ ॐ श्री स्वामी समर्थायै नमः॥ ॐ श्री ग्रामदेवतायै नमः॥ ॐ श्री वास्तू देवतायै नमः॥ ॐ श्री स्थान देवतायै नमः॥

मुख प्रक्षाळूनि प्रातःकाळीं ॥ तुळसी वृंदावनीं जावे तये वेळीं ॥ जोडूनिया बद्धांजुळी ॥ ऐसे म्हणावें ॥१॥ ॥श्लोक॥ **यन्मूले सर्व तीर्थानि यन्मध्ये सर्व देवताः ॥ यदाग्रे सर्व वेदेभ्यो तुलसी त्वाम नमाम्यहं (तुलसी श्री शक्ति शुभे पाप हारिणी पुण्यदे ॥ नमस्ते नरदनुते नारायण मनः प्रिये।)**॥२॥ या मंत्रे करूनि याजाण ॥ प्रार्थावे तुळसीसी आपण ॥ अनन्य होऊनि शरण ॥ पाणी घालावें॥३॥ यावरी प्रल्हाद म्हणे गुरुनाथा ॥ तुम्ही सांगीतली पोंड्रीकाची कथा ॥ ते परिसोनियां चित्ता ॥ परम समाधान जाहलें ॥४॥ तुळसी रोप लाउनिया द्वारी । भावें त्याची पूजाकरी ॥ ऐसें करितां कोणी तरी ॥ उद्दरला आहे ॥५॥ ऐसें पुसतां झाला गुरूसीं॥ गुरू म्हणती तयासी ॥ ये विषयीं एका कथेसीं ॥ सांगतों तुज ॥६॥ कैलास भुवन परम सुंदर ॥ अति लावण्य मनोहर ॥ जे्थे वास्तव्य करी श्री शंकर ॥ सदा शिव जो ॥७॥ तेथें नाना वनस्पती ॥ सर्वास फळें पुष्पे येती ॥ पक्षी क्रीडा करिती ॥ आपुले आनंदानें ॥८॥ कल्पतरु असती ते ठाई ॥ वसंत तेथें वसे पाहीं ॥ नानाश्वापदें (येतही)ताही ॥ निरंतर राहाती ॥९॥ बहुत टाक सरोवर ॥ उदकीं परिपूर्ण निरंतर ॥ भितरी पद्म कमळें सुंदर ॥ विकसलीं असती ॥१०॥ ऐसे ते कैलास ॥ तेथें श्री शंभु करी वास

॥ आसन घालूनि बेसलासे ॥ देवाधिदेव ॥११॥ परम हर्ष युक्त ॥ सदाशिव बैसला तेथें ॥ तंव अकस्मात ॥ पार्वती तेव्हां पातली ॥१२॥ नमस्कार करुनि शिवासी ॥ पुसती झाली वामांगासी ॥ वाम हस्ते कवळूनि नीळकंठासी ॥ विनोद करती जाहली ॥१३॥ म्हणे सदाशिवा-समर्था ॥ धर्माचा लोप झाला तत्त्वतां ॥ सत्कर्म बुडालळीं आतां ॥ अधर्म फार प्रवर्तला ॥१४॥ आपला धर्मा टाकूनि लोक ॥ अधर्म कर्मे करती देख ॥ यांचा संहार अवश्यक ॥ करावा स्वामी ॥१५॥ तरी तुम्ही उघडोनि तृतीय नयन॥भस्म करावे अवघे जन॥ ऐसे ऐकतां पंचानन॥सदाशिव कोपला ॥१६॥ म्हणे या सकळ जनाचा घात ॥ तुवां केला की नेमस्त ॥ पाप घडले बहुत ॥ तुजलागी ॥१७॥ वाचेतून जे निघालें ॥ तें कर्म त्यासीं तात्काळ घडलें ॥ म्हणोनि न पाहिजे बोलिले ॥ विरुध्द बोलांसी ॥१८॥ माझा उघडतांच तृतीय नयन ॥ त्रैलोक्य भस्म करीन ॥ त्यासीं तु उघडोन ॥ भस्म करा म्हणतेसी ॥१९॥ या शब्दे तुज घडले महा पातक ॥ प्रायाश्चित्त घेणे लागे देख ॥ आतांचि तूं आवश्यक ॥ प्रायाश्चित्त घेई ॥२०॥ जोंवरी त्वां प्रायाश्चित्त घेतले नाही ॥ तोंवरी तूं अशुध्द आहेस पाहीं ॥ ऐसें बोलतां ते समयी ॥ परम भयाभीत जाहली ॥२१॥ परम होऊनि म्लान मुख ॥ अति चिंतातुर झाली देख ॥ बहु तारिती करी शोक ॥ मना माजी ॥२२॥म्हणे व्यर्थ या अवसरीं ॥ विनोद केला त्रिपुरारी ॥ नसतें पातक पदरीं ॥ बांधोनिया घेतलें ॥२३॥ आतां प्रायाश्चित्ता वांचुनी ॥ मज शुद्धता कैची याजनीं ॥ ऐसे अंतर्यामीं कल्पुनी ॥ मन साष्टांग पै केलें ॥॥२४॥ म्हणे कृपाळुवा सदाशिवा ॥ मज तरणोपाय सांगावा ॥ ऐसे विनवोनि देवाधिदेव ॥ मस्तक चरणीं ठेविला ॥२५॥ मग शिव कृपा करुन ॥ सांगता जाहलां आपण ॥ तुळसीची सेवा करीं जाण ॥ येणें प्रकारे ॥२६॥ तुळसी रोपे लावोनि अपार सेवा करावी निरंतर ॥ तेणें पाप जाईल समग्र ॥ सत्य जाण पार्वती ॥२७॥ ऐसें शिवे सांगतां जाण ॥ मग पार्वती पुसे आपण ॥ तुळसीची सेवा करून ॥ कोण निष्पाप जाहले ॥२८॥ हे सांगावें तत्त्वतां ॥ कृपा करोनि कृपावंता॥ म्हणोनि चरणीं

ठेविला माथा ॥ पार्वती नें ॥२९॥ शिव म्हणे भली भली ॥ बरवी प्रश्नोक्ती हे केली ॥ तेचि कथा वहिली ॥ श्रवण करीं कां॥३०॥ उज्जनी नाम नगरी॥ तेथें कौतिय ब्राम्हण राज्य करी ॥ तो पुण्य वंत झाला कवण्ये परी ॥ तें आइके ॥३१॥ ग्रामा पासोनि समीप अरण्य ॥ तेथें राहेतो ब्राम्हण ॥ तेणें तुळसी रोप परिपूर्ण ॥ लाविले देखा ॥३२॥ त्या तुळसी वना मध्ये देख ॥ अच्युत वृक्ष असे एक ॥ सदाफळ देखोनि लोक ॥ समाधान पावतीं ॥३३॥ त्या वृक्षा चे तळीं ॥ वाळूचें लिंग असेते स्थळीं ॥ अपूज्य लिंग ते वेळीं ॥ तो पूजिता होय ॥३४॥ आधीं करून तुळसीसि पूजन॥घूप दीप नैवेद्य समर्पोन ॥ मग प्रार्थना करून ॥ पत्रे मंजिरी तोडित ॥३५॥ मग लिंगासीं करुनि अभिषेक ॥ तुळसी पत्र मंजिरी समर्पी देख ॥ नैवेध समर्पितां सुख ॥ मुख वस्त्रे झांकी ॥३६॥ ऐसी पूजा ते वेळीं ॥ एक संवत्सर तेणे केली ॥ संतोष पावोनि चंद्र मौळी ॥ प्रसन्न जाहला ॥३७॥ मी जावोनि विप्रा पासी ॥ बोलता जाहलों तयासी ॥ धन्य धन्य तु होसी ॥ पुण्यवंता ॥३८॥ तु झालासि निःपाप॥ तिळभरी नसे तुज पाप ॥ आतां तुझा सर्व संकल्प ॥ सिद्धी पावेल ॥३९॥ आतां तुज मी झालो प्रसन्न ॥ आपणा सारिखा पुत्र दीधला जाण ॥ तुं सुख भोगीं संपूर्ण ॥ याच देही॥४०॥ ऐसिया सि तु या अवसरीं ॥ जावोनि त्या स्थळा भीतरीं ॥ त्याचिये समसरी ॥ सेवा कीजे तुळसी ची॥४१॥ तेथें तुझें जाईल पाप॥तूं होसील निःपाप ॥ पुजावे तुळसी रोप॥ सद्भावे करुनी ॥४२॥ ऐसे ऐकोनि ते अवसरीं ॥ उमा उठली झडकरी ॥ मस्तक ठेऊनि शिव चरणावरी॥नमन केले ॥४३॥मग येऊनि उज्जनीसीं पाहिले क्षिप्रा नदी तीरासीं॥वास्तव्य केलेले तया स्थळासी॥नदी तिरीं जाणपां॥४४॥ तुळसी रोपे लावोनि सांग॥मग एक केले वाळूचें लिंग ॥ पूजा करीतसे प्रसंगें ॥ तुळसी आणि लिंगाची ॥४५॥ आधीं करी तुळसी पूजन ॥ प्रदक्षिणा करूनि आपण॥मग प्रार्थना करूनि जाण॥तुळसी आणि मंजिरी तोडी॥ ४६॥ तीं तुळसी पत्रे समरपुनी॥ मग पूजा करी भवानी॥ श्री शिवासी नैवेध दाखवोनी॥नमस्कार घालीतसे॥४७॥ पायसान्नाचा नैवैध

नित्यानी॥।शिवासीं समर्पी भवानी ॥तेणें शिव संतुष्ट होउनी॥ नाव ठेविलें अन्नपूर्णा॥४८॥त्या दिवसा पासुनी देख॥ अन्नपूर्णा म्हणती लोक॥। आणिक ही आइक॥प्रल्हादा तूं ॥४९॥ सहस्त्र पत्रें तुळसीचीं ॥ मोजुन पूजा करी शिवाची ॥ सहस्त्र नामॅ करुनी पत्रीची ॥ पूजासर्मी ॥५०॥शिव सहस्त्र नामे समर्पिलें अपर्णा ॥ म्हणोनि नांव ठेविले अपर्णा ॥ ऐसे एक संवत्सर जाणा अनुष्ठान केलें तुळसीचे ॥५१॥ तुळसी होऊनि प्रसन्न ॥ पार्वतीस दीघले आलिंगन॥शिवासारखा पुत्र होईल जाण ॥ उमा देवी ॥५२॥ तू पुत्र फळ पावसी ॥ आणिक वचन परियेसी ॥ तूंनिःपाप झाली सनिश्चयेसी ॥ सत्य जाण ॥५३॥ तु शिवाची वल्लभा होसी ॥ मी प्रिय होय विष्णुसीं ॥तुज मज भिन्नता कोणेविशी ॥ नाहीं देखा ॥॥५४॥ तैसैचि शिव-विष्णुसीं तत्वता ॥ भिन्नता नसे सर्वथा ॥ भिन्नताधीरि तीते कोणे पंथा ॥ जातील तें आइका ॥५५॥ भिन्नता धरिती मानसीं ॥ ते जाती कुंभपाकासीं ॥ रवरव भोगणें लागे त्यांसीं ॥ यावत चंद्र सूर्य ॥५६॥ **शिवस्य-हृदयं-विष्णु विष्णोश्र्व-हृदयं-शिवः** ॥ ऐसा ज्याचा पूर्ण भाव ॥ एकचि मानी उभय देव ॥ त्यासी मुक्तीचा उपाव ॥ करणेंचनलगे ॥५७॥ तो सहज चि जीवन्मुक्त ॥ एकविध-परम-भक्त॥आनंद रूप-सदोदित ॥ असे सर्व काळ ॥५८॥ ऐसे सांगूनि पार्वतीसी ॥ अदृश्य झाली श्री तुळसी ॥ उमा परम उंल्हासे सीं ॥ गमन करिती जाहली ॥५९॥ उमेनें केलीया गमन ॥ कैलासासीं गेली जाण ॥ ऐकोनि पार्वतीचें आगमन ॥ श्री शिव संतोषला ॥६०॥ म्हणो निःपाप झाली पार्वती ॥ सामोरे जावें तिये प्रती ॥ ऐसें बोलुनि उमापती ॥ वृशभारूड पै झाले ॥६१॥ सवें घेऊनि गणाचा मेळा ॥ कार्तीकस्वामी गणेश वीरभद्र सकळां ॥ बोलाऊनि तये वेळां ॥ सामोरे चालिले ॥६२॥सन्मूख देखतां चि उमेसीं ॥ संतोष जाहला सदाशिवासीं ॥ मग उमेनें त्या समयासीं॥मस्तक चरणीं ठेविला ॥६३॥ शिवें उचलोनि ते अवसरीं ॥ अर्धंगी बैसविली सुंदरी ॥ संतोष पावले

त्रिपुरारी ॥तये समयी ॥६४ ॥ ऐसे तुलसीचे महिमान ॥इंद्र प्राह्लादासी गुरु संगे आपण ॥तेच केले निरोपण ॥श्रोतयालागी ॥६५॥ श्रवण करितां तुळसी महात्म्यास ॥ तुटती भवरोग पाश ॥ आणि प्राप्त होती चतुर्दश प्रकाश॥ विठ्ठल दास रुद्र म्हणे ॥६६॥

इति श्री स्कंद पुराणे तुळसी माहात्म्ये पंचमोऽध्याय:॥५॥

॥ श्री स्वामी समर्थापणमस्तू ॥श्री गुरु दत्तात्रयार्पणमस्तू॥

॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥

❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# अथः षष्टमोऽध्यायः

॥ ॐ श्री गणेशाय नमः ॥ ॐ श्री सरस्वत्यै नमः॥ ॐ श्री गुरुभ्यो नमः ॥॥ ॐ श्री स्वामी समर्थायै नमः॥ ॐ श्री ग्रामदेवतायै नमः॥ ॐ श्री वास्तू देवतायै नमः॥ ॐ श्री स्थान देवतायै नमः॥

॥ब्रृहस्पति इंद्रप्रल्हादासीं ॥ सांगतां कथा ऐसी ॥ श्रवण केले पार्वतीच्या कथेसीं स्वामीचेनिमुखें ॥१॥ तुळसीची सेवा करुनी ॥ निःपाप झाली भवानी ॥ पुढे आणिक कोणी ॥ अनुष्टान पै केलें ॥२ ॥ हे आतां आम्हा प्रती ॥ सांगावे गा कृपामूर्ती ॥ ऐसी केली विज्ञांप्ती ॥ गुरुवर्या सीं ॥३॥ परसोनि उभयतांची प्रश्नोक्ती ॥ बोलता झाला ब्रृहस्पती ॥ पुढील कथा तुम्हा प्रती ॥ सांगतों ती ऐका ॥४॥ भूमि देवी चें अनुष्ठान ॥ दुर्वास देव करी आपण ॥ करूनि पूजा अर्चन ॥ पुष्पांजळी समर्पी ॥५॥ ऐसी सेवा कारितां ऋषी ॥ तंव समस्त ऋषी आले त्या स्थळासीं ॥ मग विनंती करिते झाले ऐसी ॥ ते आइका ॥६॥ आम्हासीं गमन नाहीं सत्य-लोकासी ॥ आपण जावें ब्रम्ह भुवनासीं ॥ ब्रम्ह देवाची स्थिती आहे कैसीं ॥ ते दृष्टीसीं पाहावी ॥७॥ आमुची हे चि विज्ञांप्ती ॥ पुरवावी जी कृपामूर्ती ॥ ऐसें बोलोनियां पुढतीं ॥ नमस्कार केला ॥८॥ जाणोनि ऋषेश्वरांचा भावो ॥ तात्काळ उठिला दुर्वास देवो ॥ क्षणांत पातला ठावो ॥ सत्य लोकींचा ॥९॥ तंव ब्रम्हा ते अवसरी ॥ सावित्री समवेत क्रीडा करी ॥ सारी पाट मांडूनि करीं ॥ ढाळीत फांसे ॥१०॥ जो हा तीघरी फासा ॥ तो फांसाच पडे अपैसा ॥ ब्रम्ह देव ऐसा ॥ देहा वरी नाहीं ॥११॥ सन्मुख उभे असती ॥ ब्रह्मा न पाहे त्यासीं ॥ मग्न झाला द्युत कर्मासी ॥ तये अवसरीं ॥१२॥ ऐसे देखोनिया त्या समयासीं ॥ कोपाय-मान झाले ऋषी

॥ कमंडलांतुन उदकासीं ॥ टाकीते झाले ॥१३॥ उदक शिम्पिले ब्रह्मयावरी ॥ आपण चालिले झडकरी ॥ मग चतुरानन धांवो द्वारीं ॥ येता जाहला ॥१४॥ दृष्टीं देखिलें ब्रम्हयासीं ॥ प्रगट शाप बोलिले ऋषी ॥ त्वां गर्व धरिला मानसीं ॥ सृष्टि करता म्हणोनि ॥१५॥ तरी तुझें समूळ जाइल ज्ञान ॥ तुं होसील परम अज्ञान ॥ सत्य मानी आमुचे वचन॥ मिथ्या नव्हे सर्वथा॥१६॥ मग भयाभीत होऊनि ब्रम्हा ॥ म्हणे मज दीनावरी करी क्षमा॥तरुणोपाय सांगावा आम्हा ॥ कृपावंता ॥१७॥ नाना प्रकारी भाकी कींव ॥ मग बोलिले दुर्वांस देव ॥ सेवा करूनिया केशव ॥ संतुष्ट करावा ॥१८॥ तो तुज होईल सुप्रसन्न ॥ जे् जे मागसी वरदान ॥ ते तें पावोनि अज्ञान ॥ निरसेल तुझें॥ १९॥आतां तुं जाई नैमिष अरण्यात ॥

अनुष्ठान करावें शीघ्रगत ॥ ऐसें सांगोनियां त्वरित ॥ ऋषी गेला पूर्व स्थळा ॥२०॥ मग ब्रह्मा जावोनि नैमिष अरण्यात ॥ अनुष्टान करी विष्णु प्रीत्यर्थ ॥ ऐसें करितां दिवस बहुत ॥ क्रमिले देखा ॥२१॥ देखोनि चतुराननाचे कष्ट ॥ श्री भगवंत झाले प्रगट ॥ रूप दाखविलें स्पष्ट ॥ तये वेळीं ॥२२॥ चतुर्भुज पीतांबर धारी ॥ रत्न जडीत मुगुट शिरीं ॥ शंख चक्र गदा पद्म शोभे करीं ॥ नारायणाच्या ॥२३॥ सन्मुख देखिला श्री हरी ॥ आनंद जाहला हृदयांतरीं ॥ स्तूति करिता झाला ते अवसरीं ॥ नारायणाची ॥२४॥ जय जयाजी परम पुरुषा॥अव्यक्त-व्यक्ता-परम-परेशा॥ सर्व व्यापक जगदीशा ॥ तुज नमस्कार माझा ॥२५॥ तुंचि दानंद चिन्म-यचिद्धन ॥ तुं याब्रह्मांडाचे जीवन ॥ तुं परमात्मा परिपूर्णा तुज नमस्कार माझा॥२६॥ तु स्थूळ ना सूक्ष्म॥तूं परमात्मा परब्रह्म ॥ सकळ सुखांचा विश्राम ॥ तुज नमस्कार माझा॥२७॥ तुं सदा आनंद भरित ॥ तूं सर्वाठायीं सदोदित ॥ भूत मात्रीं प्रकाशवंत ॥ तुज नमस्कार माझा॥२८॥ तूं सगुण निर्गुण निराकार ॥ ब्रह्मादिकासीं न कळे तुझा पार ॥ तु परमात्मा सर्वेश्वर ॥ तुज नमस्कार माझा ॥२९॥ तूं परमेश्वर पद्मनाभ ॥ तूं सगुण रूप रमावल्लभ ॥ तु भक्तालागीं सुलभ ॥ तुज नमस्कार माझा ॥३०॥ मी जन्मलो

तुझे नाभि कमळीं ॥ परी तुझा पार न कळे वनमाळी ॥ ऐसें बोलोानि बद्धांजुळी ॥ कर जोडूनि उभा राहिला ॥३१॥ मग श्री हरी झाला प्रसन्न ॥ म्हणे माग मागरे वरदान ॥ जे अपेक्षित असेल मनि ॥ तें देईन ये काळीं॥३२॥ ब्रह्मा म्हणे नारायणा ॥ दुर्वास देवें शापिलें जाणा ॥ त्या पासोनि मज दीना ॥ रक्षिले पाहिजे ॥३३॥ ऐकोनि ब्रह्मयाचें उत्तर ॥ बोलता झाला शार्डघर ॥ चतुरानना ऐक सादर ॥ चित्त देऊनियां ॥२४॥ मी समर्थ या चराचरीं ॥ मी सकळ सृष्टी करीं ॥ऐसी गर्वता मनांतरी ॥ घरलि तुवां ॥३५॥ उत्पत्ती करिता मी एक॥ निर्माण करिता मी सकळिक ॥ माझे कर्तव्ये त्रैलोक्य ॥ निर्माण जाहलें ॥३६॥ धन्य धन्य मी समर्थ थोर ॥ माझीया माग्यासी नाही पार ॥ ॥ ऐसा अभिमान परम दुर्धर ॥ त्वां हृदयीं धरियेला ॥३७॥ तुज शाप जाहला प्राप्त ॥ तेणे कष्टी झालासी बहुत ॥ ब्रह्म देवा ॥३८॥ जेथे अभिमान वसे ॥ तेृथे ज्ञान सर्वथा नसे ॥ ज्ञात्यास लाविलें पिसें ॥ ज्ञानाचे अभिमानें ॥२९॥ अभिमान ज्ञानाचा करी क्षय॥ अभिमानें देव दूरी होय ॥ अभिमानें न जोडती पाय ॥ भगवंताचे ॥४०॥ मख्य अहंकार ऐसा वैरी ॥ बेसला असतां उरावरी ॥ तो ज्ञानाचा नाश करी ॥ क्षण मात्र न लगतां ॥४१॥ जोवरी निरसला नाहीं अभिमान ॥ तोंवरी सर्व कर्मे निरफळ जाण ॥ अभिमाने धर बडवण ॥ तात्काळ होय ॥७२॥ अभिमान असतां अंतरीं ॥ उदंड ज्ञान चर्चा करी ॥ ते पोकळ ज्ञान निर्धारी ॥ ब्रम्ह देवा ॥४३॥तुझा निरसला नाहीं अभिमा<u>न</u> ॥ म्हणूनि ऐसे प्राप्त जाहलें जाण ॥ आतां सोडून अभिमान ॥ निराभिमान तूं होय ॥४४॥ अरे माझी वैष्णवी माया जाण ॥ तिचा पार नेणें शंकरादि आपण ॥ तेथें तूं जाणावया कवण ॥ अभिमान सांडीं आतां ॥४५॥ या अभिमाने करून ॥ ठकला विश्वामित्र आपण ॥ मदन अंग जाळून ॥ भस्म जाहला ॥४६॥ रावण निमाला सहकुळे ॥ दर्योधन गेला बंधु सबळें ॥ इंद्र चंद्र-काम बळें ॥ भुलोनि गेळे ॥४७॥ तुवांमाझे केले अनुष्टान ॥ म्हणुनी मी जाहलो सुप्रसन्न ॥ तुज सांगतों मी प्रमाण ॥ तें करीं आतां ॥४८॥ तुळसी रोप लाऊन ॥ सुंदर बांधीं वृंदावन ॥

त्याचें करूनि पूजन ॥ प्रदक्षिणा करीं कां ॥४९॥ धूप दीप समर्पुनी नैवेध ॥ वृंदावनीं करावा ब्रह्मानंद ॥ तेणें करोनि गोविंद ॥ संतुष्टहो ईल ॥५०॥ तुळसी होऊनि सुप्रसन्न ॥ करील तुझें शाप मोचन ॥ ऐसं ब्रह्मदेवासीं नारायण॥ स्वयें सांगे ॥५१॥ मज वैष्णवी माया व्हावया प्रात्त ॥ तुळसीचें अनुष्ठान केले दिवस बहुत ॥ मग मीं पावलो त्वरित ॥ वरदान॥५२॥ म्हणोनि सांगीतल्या प्रमाणें ॥ तुळसी चेअर्चन करणें ॥ ऐसें सांगोनि नारायण ॥ अदृश जाहला ॥५३॥ आज्ञे प्रमाणें विधाता ॥ अनुष्ठान जाहला करिता ॥ तुळसी प्रसन्न होऊनि तत्वतां ॥ शाप विमोचन केलें ॥५४॥ बहुत दिवस पर्यंत ॥ स्वाहा स्वधाकार राहिले होते ॥ यज्ञ कर्मे समस्तें ॥ मागुतीं चालों लागलीं ॥५५॥ ऐसी कथा इंद्रप्रल्हादासीं ॥ गुरूने सांगीतली रायासीं ॥ आणिक सांगतो तुम्हा पासीं ॥ तें आइका ॥५६॥ वामदेवाची कन्या सुमालिनी ॥ तिची ऐका करणी ॥ निरंतर हृदयीं चक्र पाणी ॥ हरि स्मरण करीतसे ॥५७॥ श्री कृष्णावांचूनि आणिक देव ॥ तेथें कधीच न धरीभाव ॥ निरंतर केशव ॥ हेंचि स्मरण जियेचे ॥५८॥ पूजा अर्चन ध्यान धारणा ॥ धरुनी हृद्यी नारायणा ॥ तेणें करोनि पुण्य परायणा ॥ परम जाहली ॥५९॥ ऐसें असतां एके दिवसी ॥ पुसती जाहली पितयासीं ॥ माझी गती होईल कैसी ॥ ते सांगिजे मज आतां ॥६०॥ परिसोनि बोले वामदेव ॥ याचा तुज सांगतों उपाय ॥ त्यासीं धरुनि एक भाव ॥ सांगीतले ते करीं ॥६१॥ तुळसी रोपा लाउन ॥ त्यासीं बांधी वृंदावन ॥ नित्य करूनियां पूजा अर्चन ॥ प्रदक्षिणा कराव्या ॥६२॥ द्वादश करितां प्रदक्षिणा ॥ तेणे पुरती मन कामना ॥ चतुविम्श्ती जाणा ॥ शतृ पराजय ॥६३॥ करितां अष्टोत्तर शत ॥ धन धान्य प्राप्त होत ॥ सहस्र करितां गाणित ॥ पुत्र कन्या प्राप्त होती ॥६४॥ लक्षाचे करितां प्रमाण ॥ भुक्ति मुक्ति सदा कल्याण ॥ द्वीतीय लक्षें जाण ॥ यश कीर्ती होय तेणें ॥६५॥ पंचलक्ष प्रदक्षिणा करितां ॥ त्रिभुवनीं चे ज्ञान होय त्वरिता ॥ दशलक्ष प्रदक्षिणे तत्वतां ॥ सर्व सिद्धी पावेतो ॥६६॥ द्वादशें होय शाप वीमोचन ॥ त्रयो दशे मोक्ष प्राप्त जाण ॥ चतुर्दशे कळा प्रवीण ॥

होय देखा ॥६७॥ प्रत्य हीं धूपदी पनैवेध ॥ समर्पोनि करी ब्रह्मानंद ॥ तेणें संतुष्ट होईल गोविंद ॥ तुळसी द्वारें॥६८॥येणे तुळसी होईल प्रसन्न॥| तुझी गती सांगेल आपण ॥ ऐसें सांगीतले तेच क्षणीं जाण ॥ पित्यानें कन्येसीं॥६९॥ पित्याच्या आज्ञे प्रमाणें ॥ सुमालिनी करी आचरण ॥ बहुत दिवस पूजार्चन ॥ करती जाहली ॥७०॥ करितां अनुष्ठानासीं ॥ सोळा पुत्र जाहले तियेसीं ॥ परंतु तुळसीच्या पूजेसीं ॥ सोडिलेंचि नाहीं ॥७१॥ तंव सोळाही पुत्र अरण्यासीं ॥ गेले ॥ समिधा आणावयासीं ॥ तंव देखिले आश्रमासी ॥ ऋषि गौतमाच्या ॥७२॥ उत्तम देखिले सरोवर ॥ भीतरी कमळें मनोहर ॥ त्यांत प्रवेशले कुमर ॥ सुमालिनी चे ॥ ॥७३॥ स्नाने करुनी डहुळिलें उदक ॥ कमळिणी दुखविल्या निष्टंक । तो तेथें गौतम आलेदेख ॥ स्नाना लागीं ॥७४॥ विच्छिन्न देखिले जलासी ॥ शाप देता जाहला ऋषी ॥अंध व्हालरे निश्चयेसीं॥येच क्षणीं॥७५॥शाप होतांचि तात्काळ॥अंध जाहले सकळ ॥मार्ग न दिसे केवळ॥चालतां ठोकर लागती ॥७६॥ माता पुत्रांची वाट पाहे ॥ तंव त्यांसी वेळ लागला आहे॥मग हळु हळु लवलाहे॥ आश्रमापासीं पातले॥७७॥ पुत्रांची दशा ते अवसरी॥देखोनिआ क्रंदों लागली भारी ॥ ताता धांव धांव ये झडकरी॥ म्हणानी बोभाइली ॥॥७८॥ वामदेव बैसले होते ध्यानीं ॥तंव शब्द ऐकिला श्रवणी ॥॥ मग उठोनियां तेच क्षणीं ॥ कन्येजवळीं पातला ॥७९॥ म्हणे नवल झाले जी ताता ॥ पुत्र अंध झाले करुं काय आतां ॥ तंव ज्ञानी जाहला पाहता ॥ वामदेव ॥८०॥ शाप घडला गौतमाचा ॥ यासीं उपाय न चले कोणाचा ॥ मग तो बोलता झाला वाचा ॥ कन्ये प्रती॥८१॥मी परतोनिया येतों तोवरी ॥ तुवां धीर धरावा मनांतरी ॥ तुळसीची सेवा करी॥दुश्चित न व्हावें ॥८ २॥॥ तुळसीची सेवा करितां जाण ॥॥ अवघेचि होईल कल्याण ॥ भाव असो द्यावा संपूर्ण ॥ तुळसीचे ठाई ॥८३॥ ऐसें सांगोनि कन्येसीं ॥ वामदेव चालिले गौतमाश्रमासीं ॥ तंव ध्यानस्थ होते गौतम ऋषी ॥ त्यास अंतरीं जाणवले॥८४॥कष्टी न करावें वाम देवासीं ॥ श्रम पावोन येती आश्रमासी ॥ तरी

आपण त्याचिये भेटीसी॥ जावें बरे ॥८५॥ ऐंसें कल्पूनियां मनीं ॥ वामदेवा जवळी आले तेचक्षणीं ॥ मग वामदेवें मस्तक चरणीं ॥ गोतमाच्या ठेविला ॥८६॥ पुढती उठोनि सत्वर ॥साष्टरांग केला नमस्कार ॥ धन्य आजिचा दिवस थोर ॥ तुमचे चरण देखिले ॥८७॥ पुण्याचा प्रवाह जोडे ॥ तरी तुमचें दर्शन घडे ॥ तुटे संसार सांकडे ॥ ऋषि वर्या ॥८८॥ ऐसें बोलोनि ते अवसरी ॥ गोतमाचे पाय अर्ची करीं ॥ चरणोदक वंदोनि मस्तका वरी ॥ षोडषोपचारी षूजा कली ॥८९॥ परम संतोषला ऋषी ॥ म्हणे वामदेवा परियेसी ॥ तूं ईश्वरी पुरुश होसी ॥ परम ज्ञानी ॥९०॥ तुज देखोनि जाहले समाधान ॥ धन्य धन्य तुझे ज्ञान ॥ भूत भविष्य वतंर्तमान ॥ सर्व जाणसी ॥९१॥ वामदेव म्हणती स्वामी ॥ तुमचे आज्ञा धारक आम्ही ॥ जे आज्ञा कराल स्वामी ॥ ते आह्मास वंद्य असे ॥९२॥ तेव्हां गौतम ऋषी म्हणती ॥ वामदेवा काय इच्छिले चित्ती ॥ ते सांगावे मज प्रती ॥प्रीती पूर्वक ॥९३॥ परिसोनि ऋषीची प्रश्नोक्ती ॥ वामदेव प्रत्युत्तर देती ॥ एक मागणे तुम्हा प्रती ॥ आहे तितुकें द्यावेंजी ॥९४॥ आमचे नातू स्वामीचे विद्यार्थी ॥ त्यांसीं तुम्ही शापिलें कृपामूती ॥ यास्तव ते अंध असती ॥सोळाही जण ॥९५॥ दया करूनि त्यांवरी ॥ अंधकार द्वडावा दिगंतरीं ॥ ऐसी अनाथासीं कृपा करीं ॥ कृपा वंता ॥९६॥ ऐकोनि वामदेवाचें बोळणं ॥ गौतम म्हणती मी बोललांयाचे कारणें ॥ सुमालिनी चा भावपाहणें ॥ सेवा करिते कीं नाहीं ॥९७॥ आपुलें आराध्य दैवत ॥ विपत्ति काळीं सोडोन देत ॥ तैसा नव्हे पूर्ण भावार्थ ॥ सत्य जाणा ॥९८॥ देह जावो अथवा राहो ॥ परंतु एकनिष्टा एक भावो ॥ तरी तयासी देवाधि देवो॥सर्वथा हीन उपेक्षी॥९९॥ तरी धन्य सुमालिनीची भक्ती ॥ पुत्राचें अंधत्व-नाठवे चित्तीं ॥ तुळसी ची सेवा सर्वांथी ॥ सोडिलीच नाहीं ॥१००॥ येणे मी जाहलों हर्षाय मान ॥ त्याचें शाप मोचन जाहलें जाण ॥ पूर्वी नेत्र होते तैसेचि पूर्ण ॥ तात्काळ जाहळे ॥१॥ ऐसें ऋषी बोलिला आपण ॥ तंव पाहते जाहले सोळा जण ॥ पूर्वी नेत्र होते तैसेचि पूर्ण ॥ तात्काळ जाहले॥ २॥ऐसे ऋषीचे सामर्थ्य ॥

क्षणे अंध क्षणें देखत ॥ ऐसे झाहले त्वरित ॥तेचि समयी ॥३॥ मग गौतमदेव गेले निज स्थाना॥ पुत्रा सहित सुमालिनी वृंदादावना॥ सेवा करूनियां जाणा ॥ निष्ठा धरोनि राहिली ॥४॥ तुळसीची सेवा पुनरावृत्ती ॥ सद्भावे करोनि परम प्रीती ॥ हे कथा सांगती बृहस्पती ॥ इंद्र प्रल्हादासीं ॥५॥ तींच उचिष्टें श्रोतयांसी ॥ वकत्याने सांगीतली पर्येसी ॥ दुजा भाव मानसी ॥ न धरावा ॥६॥ भावें तुळसी माहात्म्यास ॥ श्रवण करितां हरती क्लेश ॥ संतोष पावे जगदीश॥विठ्ठल दास रुद्र म्हणे ॥१०७॥

॥ इति श्री स्कंद पुराणे तुळसी माहात्म्ये षष्टमोऽध्यायः ॥

॥ श्री स्वामी समर्थापणमस्तू ॥श्री गुरु दत्तात्रयार्पणमस्तू॥

॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥

❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# अथः सप्तमोऽध्यायः

॥ ॐ श्री गणेशाय नमः ॥ ॐ श्री सरस्वत्यै नमः॥ ॐ श्री गुरुभ्यो नमः ॥॥ ॐ श्री स्वामी समर्थायै नमः॥ ॐ श्री ग्रामदेवतायै नमः॥ ॐ श्री वास्तू देवतायै नमः॥ ॐ श्री स्थान देवतायै नमः॥

॥प्रल्हाद् आणि इंद्र ॥ गुरूसीं कारेनी नमस्कार ॥ जोडो नियां दोन्ही कर ॥ विनविते जाहले ॥१॥ सुमालिनी ची कथा ॥ श्रवण जाहली जी गुरुनाथा ॥ पुढे कोणें चालविले व्रता ॥ तें समर्था सांगणें ॥२॥ गुरु म्हणती सावधान स्वस्थ चित्ते करा श्रवण ॥ जेणें हरेल भवरोग दारुण ॥ ते सांगतों तुम्हासीं ॥३॥ उरगाक्षी नाम नगरीं ॥ सुशीळ राजा राज्य करी ॥ पवित्र आणि परोपकारी ॥ पुण्य वंत ॥४॥ सुशीला नांवे त्याची स्त्री ॥ परम पतिव्रता सुंदरी ॥ एक कन्या उभयतां उदरीं ॥ असे देखा ॥५॥ तिचें नाम देवसेना ॥ हरि भक्तीसीं तत्पर जाणा ॥ तुळसीची सेवा करूनि प्रदक्षिणा ॥ नित्यानित्य करीतसे ॥६॥ तिच्या सौंदर्याची स्थिती ॥ इंद्र प्रल्हादा प्रती ॥ सांगता जाहला बृहस्पती ॥ तें ऐका आतां ॥७॥ जितुकें सुलक्षण ॥ तितुकें देहीं असे जाण ॥ मुख चंद्राकार पूर्ण ॥ नेत्र कमळा सारिखे ॥८॥ तेज सूयाच्या तेजा सारिखें ॥ नखें आरक्त सुरेख ॥ अधर कुंकुमा सारिखे ॥ दंत दाडिमी बीजोपम ॥९॥ माज सिंहाचे माजा सारिखा ॥ जानु कर्देळीचा गाभादेखा ॥ आंगोळिया समान सारिख्या ॥ हस्त पादादिकांच्या ॥१०॥ ऐसी सुंदरते सकुमारी ॥ द्वादश वर्षाची झाली ते अवसरीं ॥ पिता वर-विचार करी ॥ कोणासीं द्यावी ॥११॥ हिच्या योग्य कैसा मिळेल वर ॥ म्हणोनि पिता चिंतातुर ॥ मग करिता जाहला स्वयंवर ॥ राजा सुशीळ तो ॥१२॥ पृथ्वीचे समग्र भूपती ॥ ते आणिले स्वयंवरा प्रती ॥ ऋषीश्वरा सहित भूपती ॥ येते जाहले ॥१३॥ राजे आणि ऋषेश्वर ॥ स्वयंवरासीं मिळाळे समग्र ॥ मग बोलता

जाहला नृपवर ॥ कन्ये प्रती ॥१४॥ याज मध्यें तुज मानेल जोवर ॥ त्याचा करीं तूं अंगिकार ॥ ऐसी आज्ञा सत्वर ॥ करिता जाहला ॥१५॥ परिसोन पित्याचें वचन ॥ देवसेना बाले आपण ॥ श्वेत दीप देखिलें असेल जेणे ॥ तेणे मज वरावें ॥१६॥ पारिसोन तिचे वचन ॥ तटस्थ जाहले अवघे जण ॥ मग धरोनियां मौन्य ॥ अधो मुख राहिले ॥१७॥ एक गेले आपुयुलिया देशा ॥ एक धरोनि राहिले आशा॥ कित्येक पाहावया तमाशा ॥ विचार करोनि राहिले ॥१८॥ एकासीं आला शीतज्वर ॥ एक झाले चिंतातुर ॥ एक म्हणे हिची प्राप्ती होणें दुर्धर ॥ कोणासही दिसेना ॥१९॥ ऐसे होतां ते समयीं ॥ तंव जमद्ग्नी आले पाहीं ॥ त्यासी देखोनि लवलाही ॥ देवसेना बोलत ॥२०॥ तुम्ही श्वेत दीप देखिले आहे ॥ ऋषी म्हणे होय ॥ मग खुणा पुसताहे ॥ तये स्थानींच्या ॥२१॥ ते स्थानी वस्ती कोणासी। तेथील रचना आहे कैसी ॥ ते सांगा मज पासी ॥ ऋषि वर्या ॥२२॥ ऋषि म्हणे आम्हासीं तेथे नसे गमन ॥ आम्ही येऊन पाहिलें तुझे मन ॥ तुज कैसें आहे ज्ञान ॥ तेंच आम्ही पाहिले ॥२३॥ आम्ही वसतों बद्रिका वना ॥ आता जातों तया स्थाना ॥ ऐसें बोलोनि त्याच क्षणा ॥ ऋषि गेले ॥२४॥ तंव देवदत्त नामें ब्राह्मण ॥ तो तेथें आला तेच क्षण ॥ देवसेना म्हणे तया लागुन ॥ कोठोन येणें जाहलें ॥२५॥ तो म्हणे श्वेत दीपी हुन ॥ येथे झाले आगमन ॥ मग हास्य वदन करुन ॥ पुसती जाहली ॥२६॥ म्हणे कैसी तेथील रचना ॥ तेथें वास्तव्य कोण कोणा ॥ हे मज सांगावें ब्राह्मणा कृपा करोनी ॥२७॥ ऐकोनि प्रस्नोक्तीचा आदर ॥ सांगता जाहला द्वीजवर ॥ म्हणे चित्त देऊनियां सादर ॥ परिसें आतां ॥२८॥ तेथें वास्तव्य श्री नारायणा ॥रहावयाचें मंदिर शत योजन जाणा ॥ गोमेद रत्नें पाचू खणो खणा ॥ रत्न कलश शोभती ॥२९॥ मध्ये अष्टकोणी मंडपथोर ॥ त्यासी अष्टद्वारे रत्न खचीत परीकर ॥ अष्ट दिकपाळ तिष्ठती निरंतर ॥ अष्ट दिशा धरोनि उभे ॥३०॥ प्रवाळ स्तंभाची मांडणी ॥ भुमी काच बंद आंगणीं ॥ देवांगना चौघी जणी ॥ नृत्य करिता नित्याने ॥ ॥३१॥ गंधर्व करिती गायन ॥ नारद वीणा वाजवी आपण ॥ सरस्वती आलाप करी जाण ॥ समया सारिखी ॥३२॥ विष्णु भक्त वैष्णव समस्त ॥ जय जय-कारें कीर्तन करित ॥ गरुड द्वारीं उभा तिष्ठत ॥ सन्सुख असे॥३३॥शयन करावया नारायणा सीं॥ शेष राहिला तया स्थळासीं ॥ तुळसीची सेवा

अहर्निशी ॥ नर नारी करिती तेथें॥ ३४॥ क्षीर समुद्राचे पैलतीरा समीप ॥ उत्तर भागीं आहे श्वेत द्वीप ॥ ऐसें ऐकतां विकल्प ॥ सांडिला चित्ते ॥३५॥ म्हणे सत्य बोलिला ब्राह्मण ॥ यथार्थ सांगीतली खुण ॥ ऐसें असतां तेचि क्षण ॥ चित्र मुनी तेथें आला ॥३६॥ तो म्हणे तुझा भाव धन्य धन्य ॥ तुळसीची सेवा करिसी नित्याने ॥ तुज तुळसी आहे सुप्रसन्न ॥ सदा सर्व काळ ॥३७॥ जे जे तुझे मनोरथ ॥ ते तुळसी पुरवील यथार्थ ॥ परी मी सांगतों त्यास चित्त ॥ देऊनियां ऐकावें ॥३८॥ दैवत असे मंत्रा धीन ॥ शास्त्र बोले प्रमाण ॥ तरी तुं मंत्र जपोन ॥ प्रूजा करणें ॥३९ ॥ ऐकोनि देवसेना बोले ऋषी देवा ॥ मंत्र कोणा जवळी पुसावा 1 येरु म्हणे प्रश्न केलासी बरवा ॥ त्याचे प्रत्युत्तर ऐकावे ॥४०॥ आम्ही होऊनि कृपावंत ॥ तुजला मंत्र सांगतों नेमस्त ॥ जप करावा एकचित्ते ॥ सप्तकोटी ॥४१॥ ऐसें बोलोनि तीयेसी ॥ मंत्र सांगता झाला ऋषी ॥ मंत्राचा जपकरी अहर्निशी ॥ बत्तीसाक्षरांचा ॥४२॥ ॥ मंत्र ॥ **तुलसि श्री सखि पाप शुभे हारिणि पुण्यदे ॥ नमस्ते नारदनुते नारायण मनःप्रिये** ॥१॥ हा मंत्र जप करीं अहर्नीशी ॥ तुज प्रसन्न होईल तुळसी ॥ मनोरथ सिद्धी पावसी ॥ अंती जासील विष्णुपदी ॥४३॥ ऐसे सांगुनि तियेसीं॥आपण सर्प झाला त्या क्षणासी ॥ देखोनि भयाभीत झाले ऋषी। चळ चळां कांपो लागले ॥४४॥ जिव्हा लवथवीत विक्राळ॥ भासे गिळील हा भूमंडळ घाके पळाले सकळ ॥ राजे आणि ऋषी ॥४५॥ राजे ऋषी समस्त ॥ स्वयंवरासी आले होते ॥ धा्के पळोनियां त्वरित ॥ समस्त गेले ॥४६॥ ऐसें जाहलि यावरी ॥ सर्प अवलोन करी ॥ सांमुख वृक्ष देखिला ते अवसरीं ॥ महा प्रचंड ॥४७॥ त्याचे ढोलींत आपण ॥ निघोन फुंपारला जाण ॥ तंव गुरुडाचे आगमन ॥ अकस्मात जाहलें ॥४८॥ गरुड विचारी अंतकरणें ॥ म्हणे हा भक्ष दीधला नारायरणे ॥ आतां याच क्षणें ॥ भक्षूं यासीं ॥४९॥ ऐसें म्हणोनि सरसावला ॥ तंव सर्प सहस्रफणी जाहला ॥ धुंदकारूनि युद्धासी निघाला ॥ मग लोटला बाहेरी ॥५०॥ गरुडासीं तात्काळ दंश केला ॥ मागुती ढोलींत निघाला ॥ मग गरुडासीं क्रोध आला ॥ ते समयीं ॥५१॥ क्रोधें धरिला चंचु पुटीं ॥ अगदींच सामावला पोटीं ॥ उपजला नव्हता सृष्टीं ॥ ऐसे केले ॥५२॥ ऐसा तो सर्प भक्षिला ॥ मग गरुड बोलता जाहला ॥ येणें त्रास फार दीधला ॥ होता लोकांसी ॥५३॥ हा पापी म्या

मारिला जाण ॥ आतां तुझी असा क्षेम कल्याण ॥ ऐसे बोलोनीया आपण ॥ जाता जाहला ॥५४ ॥ गरुडे कलीयागमन ॥ देवदत्त निघता जाहला आपण ॥मग देवसेने प्रती वाचन ॥बोलता जाहला ॥५५ ॥ देवदत्त म्हणे देवसेनेसी ॥तु जरी माझे समागमेयेसी ॥तरी तुज नेईन श्वेत द्वीपासी ॥ सत्यजाण ॥५६॥ ऐकोनी देवदत्ताचे वचन ॥देवसेना निघाली जाण ॥ तीस समागमे घेऊन ॥ श्वेत द्वीपासी गेला ॥५७ ॥उभयंता श्वेतद्वीप आपण ॥देवसेने ने देखिला नारायण ॥चतुर्भुज पितांबर धारी ॥ सांवळा वर्ण ॥॥ देवाधी देव ॥५८॥ विस्तीर्ण द्वारी तूळसी वृंदावन ॥तेथे बैसला लक्ष्मी नारायण ॥सन्नीध रखमा देवी आपण ॥ विडीया देत ॥५९॥सत्यभामा चवरे ढाली ॥ नारद वीणा वाजवी जवळी ॥ ब्रह्मानंदाचे कळोळीं ॥ हरिंदास गर्जती ॥६० ॥लक्ष्मीनारायण ॥ सन्चिधरखमाद ॥ रंभा उर्वशी मेनिका ॥चौथी तिल्लोत्त्मा देखा ॥नृत्य करि अनेका ॥ प्रकार प्रकारीचें ॥६१॥ सरस्वती अलाप करी ॥ गरुड सन्सुख उभा द्वारीं ॥ ब्रह्मा नंदाचे कल्लोळ गजरीं ॥ भक्त वैष्णव गर्जती ॥६२॥ रत्न जडीत मुगुट शिरीं ॥ शंख चक्र गदा शोभे करीं ॥ वेजयंतीहृदयावरी ॥ शोभतसे ॥६३॥ कर्णी कुंडलांचा झळाळ ॥सभे विराजमान गोपाळ ॥ ज्याचें ध्यान करिती सकळ ॥ सुर वर स्वर्गींचे ॥६४॥ऐसा देखिला शारंगधर ॥ देवसेने ने केला नमस्कार ॥ सद्गतीत होऊन परमपूर ॥प्रेमाचा लोटला ॥६५॥ देखोनि तन्मय झाली आपण ॥ मग प्राणें केलें प्रयाण ॥धन्य धन्य तुळसी चे महिमान ॥ याच देहीं नारायण दाखविला ॥६६॥ देवदत्ते देखिला हरी ॥ मग सास्टांग नमस्कार करी ॥ त्याच क्षणामाझारी ॥ त्याचिया प्राणे प्रयाण केलें ॥६७॥ तोहि झाला दिव्य देही ॥ हे भगवंता ची कृपा पाही ॥ धन्य धन्य पुरुष तेही ॥ जे तत्पदी मिळाले ॥६८ ॥नारद वदे बद्रिकाश्रमासी श्रमासी॥जमदग्नी नें देखोनि त्यासीं॥नमस्कार केला॥६९॥बहुत तार तम्य केलें त्याचे पुजार्चन केले मुनीचें ॥ म्हणे धन्य धन्य भाग्य आमुचें ॥ तुमचे चरण देखिले ॥७०॥ कोठोनि आलेति स्वामी ॥ तुमचे शब्दाचेआतभूतआम्ही ॥ सांगीतटेंपाहिजेतुझी ॥ कृपाकरूनियां ॥७१॥ देखोनि जमदग्नीचा आदर ॥ सांगता जाहला मुनेश्वर ॥ श्वेतदिंपी होनि सत्वर ॥ आलो आतां ॥७२॥ उभयतां चें होतां एसे भाषण ॥ तव देवसेना आली आपण॥नारदासीं नमस्कार करून॥ मस्तक चरणीं ठेविले॥७३॥ नारद उठवी

जंव तियेसीं ॥ तंव देवदत्त आले त्या समयासीं ॥ नमस्कार करूनि नारदासीं॥ सन्निध बैसले ॥७४॥ उभयतांसी देखोनि नयनी ॥ बोलता जाहला नारद मुनी ॥ म्हणे ऐके हो जमद्ग्नी ॥ उभयतांचें लग्न लावावें ॥७५॥ जमदग्नी म्हणे मुनी समर्था। जेंमानले तुमचिया चित्ता ॥ तेंचि करणे आतां॥उशीर न करावा ॥७६॥ मग देव दत्त आण देवसेनेचें ॥ मंत्रोक्त लग्न लाविले दोघांचें ॥ मनोरथ पूर्ण केले त्यांचे ॥ नारद मुनीने ॥७७॥ देवसेने चें मनोगत ॥ भ्रतार व्हावा देवदत्त ॥ तिचा ही पुरविला हेत॥ तुळसी देवीने ॥७८॥ आतां भाव पूर्वक नारी ॥ एकनिष्ठ सेवाकरी जरीं ॥ तरी मनकामना होईल पुरी ॥ सत्य जाणा ॥७९॥ तुळसी नारायणासी कांही ॥ भिन्नता नसे पाहीं ॥ भाव धरूनियां हृदयीं ॥ सेवा करावी ॥८०॥ जेवस्त भगवंतासीं प्रीय॥ तेथे भगवंत सर्वदा राहे ॥ त्या वस्तूची सेवा केलीया पाहे ॥ अवश्य मनोरथ पुरती । ॥८१॥ नित्या-नित्य तुळसीचें भजन ॥ करिती पूजन अर्चन ॥ नारीं अथवा पुरुष जाण ॥ त्याची ऐका फळश्रुती ॥८२॥ नारी सद्वावें पूजन करितां ॥ सोभाग्य वर्धन होय तत्वतां ॥ पुरुषें जरी आचरतां ॥ आयुष्य वर्धदमान पावे ॥८३॥ ऐसें बदरिकावनी झालिया वरी ॥ नारद आला उरगाक्षी नगरी ॥ सुशील रायासीं ते अवसरीं ॥ भेटता जाहला ॥८४॥ नारदासीं दिखोनि ते क्षणी ॥ राजा सुशील लागला चरणीं ॥ मग पाद प्रक्षालुनी ॥ चरण तीर्थ घेतलें ॥८५॥ म्हणे धन्य धन्य भाग्य माझें ॥ आजि चरणं देखिले तुझे ॥ निरसलें संसार ओझें॥मुनि राया ॥८६॥ मग षोडशोपचारें केली पूजा॥ नारदासीं पुसता जाहला राजा ॥ कोठोनिया ब्रह्मात्मजा ॥ येणें जाहले॥८७॥ बद्रिका वनाहून ॥ प्रस्तुत आलो तेथुन ॥ तेथील काय वर्तमान ॥ तें सांगे स्वामी ॥८८॥ परिसोनि रायाचा आदर ॥ बोलता जाहला मुनेश्वर॥म्हणे होऊनि सादर ॥ ऐकें राया ॥८९॥ देवदत्तासीं समर्पिली तुमची कन्या ॥ उभयतां चे लग्न लाविले जाणा ॥ ऐसें करूनियां बद्रिकावना ॥ आम्ही येथें पावलो ॥९०॥ ऐसे सांगत नारद ऋषी ॥ तव देवदत्त आला त्या समयासीं ॥ समागमें घेवोनि देवसेनेसीं ॥ उभयतां आलीं ॥९१॥ देवसेना भेटली माता पितयां सीं ॥ समागमें देखोनि उभयतां सी ॥ परम हर्ष झाला रायासीं ॥ मग बोलता जाहला ॥९२॥ म्हणे धन्य धन्य नारद मुनी ॥ काय सांगावी तुमची करणी ॥ देवसेना येच क्षणी ॥ आम्हा लागोनी भेटविली ॥९३॥ जामात आणि कन्या ॥ आम्हासी

तुम्ही दिधली जाणा ॥ ऐसें म्हणोनियां चरणा ॥ लागला नारदाच्या ॥९४॥ नारद म्हणे तुझे कन्येंचें बहुत पुण्य ॥ यास्तव तुमचा उद्धार झाला जाण ॥ आतां वास्तव्य वैकुंठ भुवन ॥ तुम्हा लागीं होइल ॥९५ ॥आपुलिया वंश भीतरी ॥ पुत्र अथवा पुत्री ॥ तुळसीची सेवा करीं जरी ॥ तरी माता पिता उद्धरती ॥९६॥ तुळसी ची सेवा संपूर्ण ॥ तुझे कन्येनें केली जाण ॥ अगाध पुण्याचे आचरण ॥॥घडले तियेसी ॥९७॥ ऐसें सांगूनिया नारद मुनी ॥॥ गमन करिता झाला ते क्षणी ॥ प्रवेशला स्वर्ग भुवनीं ॥ निमिषा मध्यें ॥९८॥ नारद गेलिया वरी॥ देवदत्त रायासीं विज्ञांप्ती करी ॥ म्हणे वैकुंठ भूवना भीतरी ॥ जाऊं चला ॥९९॥ राजा राणी देवसेना ॥ चवथा देवदत्त जाणा ॥ चौघें गेलीं विष्णु भुवना ॥ देवसेनेचे प्रसादे ॥१०० ॥ संताची संगती घडे ॥ रायासीं प्राप्त जाहलें वैकुंठ ॥१०१॥ ऐसी कथा इंद्र प्राह्लादासी ॥ देवगुरूनें सांगीतली ऐसी ॥ तेचि कथा तुम्हासी ॥ वक्त्याने सांगितली ॥॥१०२॥ येथें नाहीं जोडा जोडी शब्दाची ॥ शुद्ध टीका संस्कृताची ॥ कृपा झाली ज्ञानेश्वराची ॥ त्याही हे मज बोलिले ॥१०३॥ जरी धराल मानसी ॥१०४ ॥सद्भावे श्रवण कराल ग्रंथासी ॥ तरी चुकाल भवरोगासीं ॥ विठ्ठल दास रुद्र म्हणे ॥१०५॥

इति श्री स्कंद पुराणे गुरु-इंद्र-प्रह्लाद संवादे तुळसी महात्मे सप्तमोऽध्यायः ॥७॥

॥ श्री स्वामी समर्थार्पणमस्तू ॥श्री गुरु दत्तात्रयार्पणमस्तू॥

॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥

❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀

# अथः अष्टमोऽध्यायः

॥ ॐ श्री गणेशाय नमः ॥ ॐ श्री सरस्वत्यै नमः॥ ॐ श्री गुरुभ्यो नमः ॥॥ ॐ श्री स्वामी समर्थायै नमः॥ ॐ श्री ग्रामदेवतायै नमः॥ ॐ श्री वास्तू देवतायै नमः॥ ॐ श्री स्थान देवतायै नमः॥

॥ प्रल्हाद इंद्र म्हणती ॥ गुरु देवा ऐक विज्ञांप्ती ॥ देवसेने ची कथा आम्हा प्रती ॥ सांगीतली तुम्ही ॥१॥ ऐकोनि पावले समाधान ॥ परी पुढे कैसें कथा अनुसंधान ॥ अणखी कोण उद्धरला करितां अनुष्ठान ॥ तुळसी देवीचें ॥२॥ते सांगावे स्वामी ॥ श्रवणें पुनीत होऊं आम्ही।कूपा करावी तुम्ही ॥ उभयतां वरी ॥३॥ ऐकोनि त्यांची प्रश्नोक्ती ॥ बोलता जाहला ब्रृहस्पती । म्हणे सावधान असा चित्ती ॥पुढिले अनुसंधानासी ॥४॥ उदयन राजा उज्जनींत ॥ राज्य करी परम पुण्यवंत ॥प्रजा पाळण यथा युक्त ॥ धर्म न्यायें करीतसे ॥५॥ हरि भक्तीस तत्पर ॥ विष्णूची सेवा करी निरंतर ॥ ब्राह्मणाची शुश्रुषा अग्नीहोत्र ॥ चालवी सर्व काळ ॥६॥ संपत्तीसीं नाहीं मिती ॥ दया असे सर्वाभूतीं ॥ आनंदमय प्रजा नांदती ॥ दुःख कोणा प्रती असेना ॥७॥ त्याची भार्या सुशीळा ॥ धर्मासीं न टळे कोणे वेळा ॥ स्मान्दृष्टी ने सकळां ॥ सर्वदा पाहे ॥८॥ ऐसे असतां कित्येक दिवस ॥ वार्धक्य प्राप्त जाहले उभयतांस ॥ परी वाढला नाहीं वंश ॥ निपुत्रीक असे देखा ॥९॥ राजा निघाला पार धीमिसे ॥ समागमें मंत्री समुदाय असे ॥॥ लोकपाला समवेत जातसे ॥ व्यहाळीं खेळावया ॥१०॥ आपणं बैसला रथावरी ॥ ध्वज पताका हारो हारी ॥ सप्त तुरंगम रथास तरी ॥ जुपिलें असती ॥११॥ ऐसा खेळ खेळता वनासी । रवी आला भर मध्यान्हासीं ॥ तव उद्वेग उठिला मानसीं ॥ तो ऐका ॥१२॥ म्हणे जळो जळो

हे संपत्ती ॥ मजला नाहीं पुत्र प्राप्ती ॥ ऐसा उद्वेग करितां चित्ती ॥ यमुना तीरासीं पावला ॥१३॥ तंव तेथें आठ्यांशी सहस्त्र ऋषेश्वर ॥ अनुष्ठान करिती समग्र ॥ मध्य वसिष्ठ मुनेश्वर ॥ बैसला असे॥१४॥दैदीप्य तेजो मय ॥ जयाचे तेजे अंधकार जाय ॥ जाचे स्मरणें लोकत्रय ॥ पुण्यवंत होती ॥१५॥ जवळी बैसली अरुंधती कांता ॥ जे परम पावन पतिव्रता ॥ हष्टीसीं दिखोनि उभयतां ॥ राजा रथा खाली उतरला ॥१६॥ साष्टांग घातलें दंडवत ॥ हात जोडोनि उभातिष्ठत ॥ तंव वशिष्ट मुनी अकस्मात ॥ वचन काय बोलिले॥१७॥म्हणे तुझी काय इच्छा आहे मानसीं ॥ तेसांग आम्हा पासीं ॥ ते सिद्धी पावसी निश्चयेसीं ॥ चिंता न करावी ॥१८॥ परिसोन ऋषी चे वचन ॥ राजा बोलता जाहला आपण ॥ मी आहे पुत्र कृपण । अनाथ दीन तुमचा ॥१९॥ तुमच्या आशिर्वादाची प्राप्ती ॥ मज आहे सर्व संपत्ती ॥ परी पुत्रावीण चित्तीं ॥ दुःखित आहें ॥२०॥ जेणें होय पुत्र प्राप्ती ॥ तें करीं कृपा मूर्ती ॥ ऐसें बोलोनि ऋषी प्रती ॥ पुन्हा साष्टांग नमस्कार केला ॥२१॥ जाणोनि रायाचा अभिप्रावो ॥ बोलता जाहला ऋषी रावो ॥ तुज सांगतो उपावो ॥ तो तू करी राया ॥२२॥ उत्तम करीं तुळसी वृंदावन ॥ दशशत रोपे लावीं संपूर्ण ॥ तेथें शत शाळिग्रामाचें पूजन ॥ एक संवत्सर करावें ॥२३॥तुळेसीचे पूजन करावयाची युक्ति ॥ जे सांगतों ती धरावी चित्तीं ॥ सद्वावे तूं निश्रित्ती॥ जपकरी ॥२४॥ ॥ मंत्र ॥ ॥ **तुळसि श्री सखि शुभे पाप ह्मारिणी पण्यदे ॥ नंमस्ते नारदनुते नारायण मनःप्रिये** ॥१॥ हा मंत्र बत्तीस अक्षरीं ॥ एक निष्ट जपकरीं ॥कामना होय पुरी ॥ सत्य जाणा ॥२५॥ शाळिग्रामासीं करी तुळसी अभिषेक ॥ ऐसें करुनी घाली उदक ॥ विष्णु सहस्त्र नामें देख ॥ पक्कपानें समर्पी ॥२६॥ ज्याज्या ऋतू चे ठाई पुष्पें येती ॥ तींच पुष्पें शाळीग्राम प्रती ॥ समरपी यथा निगुती ॥ सांगीतल्या प्रमाणें ॥२७॥ धूप दीप दाखऊनि नैवेध ॥ समर्पोनि दक्षिणा भाव शुड ॥ ऐसें करीयेकविध ॥ भाव धरोनी ॥२८॥ स्त्री सह वर्तमान ॥ तुळसी चे करी पूजन ॥ प्रदक्षिणा करोनि नित्याने ॥ एक संवत्सर ॥२९॥ नित्याने त्यजाण ॥

ब्राहाणसी उत्तम भोजन ॥ तुळसी वृंदावनीं तृप्त करी पूर्ण ॥ द्विज वरांसीं ॥३०॥ येणें मनोरथ होतील पूणे ॥ पुत्र फळपावसी जाण ॥ एक पुत्रहोईल सुलक्षण तुज लागीं॥३१॥ पुत्र होईल त्याचें नावठेवीं भरत॥तो परम पुरुषार्थी होईल विख्यात ॥ त्याचे नि तूं सुख पावसी बहुत ॥ चिंता न करीं ॥३२॥ तुम्ही दोघें स्त्री-पुरुषें ॥ तुम्हास वार्धक्य दशा प्राप्त झालीसे ॥ तुळसी चे सेवेनें होईल ऐसे ॥ तें आइका ॥३३॥ तारुण्य येईल उभयतांसीं ॥वार्धक्य जाईला नोश्वियेसीं॥ ऐसें बोले ऋषी॥राजा प्रती ॥३४॥ राजा म्हणे स्वार्मीप्रमाण ॥ मी करीन आचरण॥मग वंदोनि ऋषि चरण।नमन साष्टांग पै केले ॥३५॥ तेथेंचि राहिला यमुने तीरी ॥ स्त्री पाचारोनि आणिली झडकरी ॥ सुमुहूर्त पाहोनि ते अवसरीं ॥ आरंभ केला ॥३६॥ उत्तम बांधिलें वृंदावन ॥ तुळसी रोपे सहस्र लाविले जाण ॥ मग शत शाळिग्राम आाणुन ॥ पूजार्चन करिता जाहला ॥३७॥ ऋषीनें जैसी आज्ञा केली होती ॥ त्या प्रमाणे करी नृपती ॥ राजा राणी सेवा करिती ॥ सांगीतल्या प्रमाणें॥३८॥उभयंतां चें गेले बार्धक्य ॥ दोघे तरुण जाहली देख॥ नवल करिती सकळ लोक ॥ मंत्री आणि महाजन ॥३९॥ उभयतां जाहलीं द्वादश वर्षाची ॥ चिंता हारली मनाची ॥ सेवा करितां तुळसी ची ॥ ऐसें जाहले ॥४०॥ राजा पावला तारुण्य ॥ हर्षायमान जाहले प्रधान ॥ नगरींचे सर्वही जन ॥ आनंदमय जाहले ॥४१॥ तंव गर्भ राहिला राणीसीं ॥ प्रसूत झाली नववे मासीं ॥ पुत्र जाहला तियेसीं ॥ महा सुलक्षण ॥४२॥ राजा पुत्रावणकरी ॥ दान धर्म केला ते अवसरीं ॥ ढोल दमामेत्र हाटिल्या भेरी ॥ निशाणी घाव दीधला ॥४३॥ धन्य धन्य ऋषिदत्त ॥ निपुत्रीक जाहला पुत्रवंत ॥ वार्धक्य जाऊन तारुण्य प्राप्त ॥ ऋषि वाक्यें जाहले सत्य ॥४४॥ ऐसी संताची संगती ॥ आशिर्वादें मनोरथ पूर्ण होती ॥ म्हणोनि ईश्वरा प्रती ॥ संत समागम मागावा ॥४५॥ पुत्राचे नाम करण करी नृपनाथ ॥ नाम ठेविलें राजा भरत॥जातक वर्णिले नेमस्त ॥ तये वेळीं ॥४६॥ मग तेथूनी आला नगरासी ॥ उत्साह जाहला सकळ जनासीं ॥ उदंड द्रव्य दीधले याचकांसीं ॥ रायें उदारपणें

॥४७॥ जरीं पावला पुत्र प्राप्ती सीं ॥ तरीं सोडिले नाहीं हरि भक्तीसीं॥नित्य पूजी शाळिग्रासी ॥ पूर्व स्थितीसीटळेना ॥४८॥ ऐसें तुळसी चें महिमान ॥ गुरु सांगे आपण ॥ परिसतां इंद्र प्रल्हाद दोघे जण ॥ परम सुख पावले ॥४९॥ तें मी सांगीतले श्रोते जनास ॥ तुळसी माहात्म्य परम सुरस ॥ श्रवण करितां हरतील क्लेश ॥ विठ्ठल दास रुद्र म्हणे ॥ ॥५०॥

इति श्री स्कंद पुराणे तुळसी माहात्म्ये अष्टमोऽध्यायः ॥८॥

॥ श्री स्वामी समर्थार्पणमस्तू ॥श्री गुरु दत्तात्रयार्पणमस्तू॥
॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥

❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# अथः नवमोऽध्यायः

॥ ॐ श्री गणेशाय नमः ॥ ॐ श्री सरस्वत्यै नमः॥ ॐ श्री गुरुभ्यो नमः ॥॥ ॐ श्री स्वामी समर्थायै नमः॥ ॐ श्री ग्रामदेवतायै नमः॥ ॐ श्री वास्तू देवतायै नमः॥ ॐ श्री स्थान देवतायै नमः॥

॥ कृत युगीं नैमिषारण्या प्रती ॥ अठ्यायसी सहस्र ऋषी बेसले असती ॥ त्यां प्रती सूत सांगती ॥ तुळसी माहात्म्य ॥१॥ स्वर्गी इंद्र प्रल्हादा प्रती॥सांगता हे ब्रृहस्पती ॥ ते चि कथा श्रोतयां प्रती ॥ वक्ता सांगताहे ॥ २॥ प्रल्हाद म्हणे गुरुनाथा ॥ उदडयन रायाची श्रवण केली कथा ॥॥ तुळसी कवच आतां ॥ सांगणें स्वामी ॥३॥ तुळसी कवच श्रवण करावयासीं ॥ इच्छा आहे आमुचे मानसीं ॥ तरी सांगावें आम्हा पासीं ॥ कृपा करूनियां ॥४॥ ऐसे प्रल्हाद बोलला ॥ गुरुम्हणे भला भला ॥ बरवा प्रश्न तुवां केला ॥ तरी तुळसी कवच सांगतों ॥५॥ तारकासुर पाप मूर्ती ॥ पीडा करी ब्राम्हणा प्रती ॥ उपद्रव देत नाना रीती ॥ ब्राह्मणा सीं देखा ॥६॥ ब्राम्हण परम झाले कष्टी ॥ कैलासीं गेले उठाउठी ॥ जाऊनि घेते जाहले भेटी ॥ श्री शंकराची ॥७॥ स्कंदासी विनवि ते अवसरीं ॥ म्हणे स्वामी विनंती अवधारी ॥ आम्हासीं पीडिले भारी ॥ तारकासुरानें ॥८॥ म्हणोनि आलो कैलासा सी ॥ परंतु आंमुचेनि न बोलवें शंकरासी ॥ तुम्ही कृपाळु होऊनि आह्मासीं ॥ आहासी ॥ श्री शिवासी श्रुत करावें ॥९॥ तयांची ऐकोनि दीन वाणी ॥ स्कंद कवळीला मनी ॥ मंग श्री शीव प्रती तेची क्षणी ॥ सांगता जाहला ॥१०॥ म्हणे ताता अवधारी ॥ ब्राह्मणासी पीडा

झाली भारी ॥ तारकासुर ये अवसरीं ॥ परम त्रास दीघला ॥११॥ ब्राम्हण होऊनि भयभीत तुम्हासीं आले शरणा गत ॥ सांगावयासी वृतांत ॥ येथे आले ॥१२॥ तुम्हा सन्मुख न बोलवे त्यांसी ॥ हा वृत्तांत सांगीतला मज पासी ॥ म्या निवेदन केले तुम्हासी स्वामी नाथा ॥१३॥ तरी हा मरे तारकासुर ॥ ब्राह्मण सुखी राहती निरंतर ॥तो ची मज विचार ॥ सांगा स्वामी ॥१४॥ माझेनितंव न मरे तारकासुर ॥ तो तपोनिधी अपार ॥ शस्त्र विद्या जाणे फार ॥ नाना प्रकारच्या संपूर्ण ॥१५॥ माविक विद्यासमस्ता ॥ तो जाणे जी तत्त्वतां ॥ त्यासीं युद्ध करितां ॥ पुरा कोणी न पडेची ॥१६॥ सर्व जिणोनि भूमंडळ ॥ भाग्ये करूनि अति प्रबळ ॥ त्रासे पळाले सकळ ॥ देवआणि राजे पृथ्वीचे ॥१७॥ त्याच्या तपाच्या सामर्थ्ये ॥ कोणी पराभवू न शके त्याते ॥ माझे तो सामर्थ्ये न चाले तेथें ॥ ऐसिया सीं काय युक्ती करावी ॥१८॥ परिसोन स्कंदाचें वचन॥तुजा अपराध तेणे काय केलासे ॥१९॥ तो माझा परम भक्त ॥ माझी विद्या त्यासींदत्त ॥ त्यावरी माझी कृपा बहुत ॥ त्याचा द्वेष तूं कां करितोसी ॥२०॥ हे ऐकोनि शिवाचें वचन ॥ स्कंदें धरिले दोनी चरण ॥ म्हणे परम पीडा दारुण ॥ गो-ब्राम्हणासी केलें पै ॥२१॥तूं तव गोब्राम्हण पालक॥ दुष्टांचा संहार करिसी देख ॥ भूपाळ अलोलीक तु एक ॥ ऐसें श्रृति बोलती ॥२२॥ तरीहे विज्ञाप्ती करावी मान्य ॥ त्याच्या वधाचा सांगावा यत्न ॥ एसें बोलोनियां आपण ॥ साष्टांग नमस्कार केला ॥२३॥ परिसोनी स्कंदाचे वचन ॥ कृपाळु जाहला त्रिनयन ॥ म्हणे ऐक सावधान ॥ ममात्मजा ॥२४॥ माझें परम गुह्य- गुज । तें मी सांगतों तुज॥ तेणे सिद्धी पावेल काज ॥ सर्व तुझे ॥२५॥ पूर्वी त्रिपुर मारावया कारणे ॥ हेचम्यां केलें अनुष्ठान ॥ तोचि गुह्यार्थ तुज कारणे ।॥ सांगतसे ॥२६॥ तुज मंत्र सांगतो आपण ॥ त्यामंत्रे करी अनुष्टान ॥ सर्व मनोरथ होतील पूर्ण ॥ सत्य जाण पुत्रोत्तमा॥२७॥ ऐसें बोलतां स्कंदासीं ॥ मंत्र उपदेशीला त्यासी॥श्री शीव स्वसुखेसी ॥ हा मंत्र सांगीतला ॥२८॥ ॥ मंत्र ॥ **तुलसि श्रीसखि शुभे पापहारिणि पुण्यदे ।**

**नमस्ते नारदनुते नारायणमनःप्रिये** ॥१॥ ऐसें बत्तीस अक्षरी मंत्रासी ॥ शिवे सांगीतले स्कंदासीं ॥ याची फळश्रुती आहे ऐसी ॥ ते ऐका ॥२९॥ कोण कोणा कार्या सीं ॥ जपावे या मंत्रासी ॥ तेंही सांगतों तुजपासीं ॥ सावधानण ऐकावे ॥३०॥ परम प्राप्त होईल संकट ॥ तेव्हां हा जपकरावा एकनिष्ठ ॥ तेणें हरेल अवघें दुर्घट ॥ हा जप केलियाने ॥३१॥ विषम काळ जे येई ॥ तेव्हां हा जपकरावा पाही ॥ विषम काळतो शुभ होई ॥ ऐसें पुण्यलाहे जपे करूनी ॥३२॥ दुर्गम प्राप्त होय जेव्हां ॥ हा जप करावा तेव्हां ॥ येणे हरेल आघवा ॥ दुर्गम प्रकार ॥३३॥ भय प्राप्त झालिया वरी ॥ हा जप करावा निर्धारी ॥ भय निवारेल तेचि अवसरीं ॥ हे सामर्थ्य मंत्राचे ॥३४॥ वाद प्राप्त होय जेव्हां ॥ या मंत्रे जप करावा तेव्हा ॥ वाद तुटेल जाणावा ॥ निश्चयेसी ॥३५॥ महाहव्य व्हावे मानसीं ॥ तरी जप करावा अहिर्निशी ॥ हव्य होईल निश्र्येसी ॥ जपकरितां ॥३६॥ मोक्ष पाहिजे जयासीं ॥ तरी पठण करावें या मंत्रासीं ॥ सत्वर मोक्ष होईल तयासीं ॥ संदेह नाहीं ॥३७॥ लक्ष्मि प्राप्त व्हावया लागुनी ॥जो ईच्छित असेल मनी ॥ तेणें जप करावा नित्यानी ॥ लक्ष्मी प्राप्त होईल ॥३८॥ जयासी उत्तम प्रीया पाहिजे ॥ तेणें हा जप कीजे ॥ उत्तम प्रिया पाविजे ॥ हें सामर्थ्य मंत्राचे ॥३९॥ यशस्वी सदा व्हावे ॥ ऐसी इच्छा असेल भावें॥ तेणे अहर्निश जपावें ॥ सिद्दी होय ॥४०॥ शत्रु पराभवोनि विजय ॥ सर्वदा व्हावा जय ॥ ज्याची ऐसी वासना पाहे ॥ तेणें हा जप करावा ॥४१॥ व्याधि नसावी आपणासी ॥ ऐसी मनकामना ज्यासी ॥ तेणें यामंत्रासीं ॥ जपावें जाणा ॥४२॥ शिरोरोग असेल ज्यासी॥ त्यानें जपकरावा निश्चयेसी ॥ रोग हरेल क्षण मात्रेसी ॥ मुक्त होईल जाणपां ॥४३॥ वशीकरण जरीकरणें ॥ तरी हा मंत्र जपावा नित्यानें ॥ सिद्धी पावेल जाण ॥ मनकामना ॥४४॥ विद्या पाहिजे मज लागुनी ॥ ऐसें असेल जया चे मनी ॥ तेणें जपकरावा सद्भाव धरूनी ॥ मुर्खासी विद्या प्राप्त होय ॥४५॥ दरिद्र नसावें जन्मवरी ॥ ऐसें असेल ज्याचे अंतरीं ॥ तेणें हा जप करावा निर्धारी ॥ दरिद्र विच्छिन्न होय ॥४६ ॥ माझें पाप जावे सकळ

॥ म्या पुनीत व्हावे तात्काळ ॥ ऐसा ज्याचा भाव असे भबळ ॥त्यासीं जपाचेनि सिद्धि होय ॥४७॥ याच देहीं म्या जावें स्वर्गासी ॥ ऐसी कल्पना असेल मानसीं ॥ तेणे जपावे या मंत्रासीं ॥ जाय स्वर्गासीं संशय नाही ॥४८॥ मज पशूची व्हावी प्राप्ती ॥ ऐसें असेल ज्याचे चित्तीं ॥ तेणें जप करावा एकाग्रचित्तीं ॥ पशु अपार प्राप्त होती ॥४९॥ पुत्र प्राप्ती कारणें ॥ जप करावा एकाग्र मनें ॥ पुत्र प्राप्ती होय जाण ॥ जपकर्त्या सीं ॥५०॥ राज्यां भ्रस्ठ झाला नर ॥ तेणें जप करावा धरुनी निर्धार ॥ राज्य पावेल सत्वर ॥ पुनरा वृत्ती नाही अंतीं ॥५१॥ अशक्त असेल शरीरीं ॥ तो जरीं निष्ठा धरूनि जप करी ॥ बलाढ्य होईल ते अवसरीं ॥ शक्ति वंत ॥५२॥ विष्णु भक्तीचे ठाई भाव असावा ॥ हेंच देई मज देवाधिदेवा ॥ ऐसी कल्पना धरुनि जपावा ॥हाचि मंत्र ॥५३॥ ज्याचा भावं बैसे भक्तीचे ठाई ॥ श्री हरी कृपा करील पाही ॥ तो विंष्णूसा प्रीय होईल याच देहीं॥यां मंत्राच्या जपानें॥५४॥ज्याची जे वासना ॥ त्यांच्या पुरतील कामना॥सद्भाव घरोनियां जाणा ॥ प्रचीत तयाची पहावी॥५५॥ तुळसीबन असेल अपार ॥ तेथे उभा राहोनि जप करी नर॥ त्यासीं वैकुंट प्राप्त होईल सत्वर ॥ कर्त्या पुरुषासी ॥५६॥ जे स्त्रीचींबाळके मरतीं ॥ तिनें जप करावा एक चित्ती ॥ तिची बाळकें वांचती ॥ निश्चयेसीं ॥५७॥ जे वंध्या असेल नारी ॥ ब्राह्मणे दर्भ घेऊनि करीं ॥ या मंत्रे तिच्या मस्तका वरी ॥ उदक टाकावें ॥५८॥ तेणें वंध्या होय पुत्रवंती॥ भ्रांती नं धरावी चित्तीं ॥ ऐसें स्कंदा प्रती ॥ शिवे सांगीतले ॥५९॥ पालाश मुळावरी॥बैसोनियां जपकरी ॥ तरी कोड जाय निर्धारी ॥ नर आणि नारीचे ॥६०॥ एक संवत्सर ॥आदित्य वारीं ॥ पिंपळा सन्नीध जप करी ॥ तरी पूर्ण विद्यावंत होय सत्वरी ॥ करता देखा ॥६१॥ कन्येची इच्छा असेल मानसीं ॥ तिणें हा जप करावा निश्चयेसीं ॥ सुलक्षण कन्या होईल तीसीं ॥ एणेंमंत्रें ॥६२॥ स्त्रीसी भ्रतार असेल वश्य करणें ॥ तरी यामंत्राचा जप करावा तिणें ॥ तरी निश्चये करून ॥ भ्रतार वरश्य होईल॥६३॥ जारण मारण आणि स्तंभन ॥ उच्चाटण आणि संहारण ॥ याच मंत्रें होतीलसे जाण ॥ जप

करणें म्हणोनि हा ॥६४॥ रायाची कृपाव्हावी आपणावरी ॥ म्हणोनि या मंत्राचा जप करी ॥ तरी रायाची कृपा निरंतरी ॥ कर्त्या वरी होतसे॥६५॥एंसे श्री शिव स्वसुखेसी ॥ सांगीतले कार्तिक स्वामीसीं ॥ या मंत्रें तु जयासीं ॥ पावसी जाणा ॥६६॥ श्री शिवें स्कंदासीं ॥ निज गुज सांगीतले परियेसी ॥ हे करावे निश्चयेसी ॥ तारकाचे वधा लागीं ॥६७॥ आतां तूं करी अनुष्ठान ॥ या मंत्रे जप करी पूर्ण ॥ ऐसे शिवे आपण ॥सांगीतले ॥६८॥ तंव स्कंदानें दुराम्यास ॥ अनुष्ठान करूनि रात्र दिवस ॥ संहारिले तारकासुरास ॥ गो-ब्राम्हणासीं रक्षिले ॥६९॥ सूत सांगती ऋषेश्वराप्रती ॥इंद्र प्रह्लाद प्रती सांगे बृहस्पती गुरु म्हणे कवच समाप्ती ॥ सांगितली तुज ॥७० ॥पुराणी चा इतिहास ॥वक्त्या ने सांगितले श्रोतीयास ॥तुलसी महात्म्य अगाद विशेष ॥विठ्ठल दास रुद्र म्हणे ॥७१ ॥

इति श्री स्कंद पुराने तुलसी महात्म्मे नवमोऽध्याय

॥ श्री स्वामी समर्थापणमस्तू ॥श्री गुरु दत्तात्रयार्पणमस्तू॥

॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥

❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀

# अथः दशमोऽध्यायः

॥ ॐ श्री गणेशाय नमः ॥ ॐ श्री सरस्वत्यै नमः॥ ॐ श्री गुरुभ्यो नमः ॥॥ ॐ श्री स्वामी समर्थायै नमः॥ ॐ श्री ग्रामदेवतायै नमः॥ ॐ श्री वास्तू देवतायै नमः॥ ॐ श्री स्थान देवतायै नमः॥

॥ महाराष्ट्र म्हणोनि न करावा अव्हेर ॥ अवघ्यांस संस्कृताचा आधार ॥ बीजा वीण विस्तार ॥ मी काय बोलु जाणें॥१॥तुम्ही तों जाणते श्रोते जन ॥ मी तंव बोलुन जाणें तुमचा दीन ॥ मजवरी कृपा करोनि आपण ॥ श्रवण केलें पाहिजे ॥२॥ इंद्र प्रल्हाद पूच्छाकरिती ॥ गुरु सांगे तया प्रती ॥ तेंचि बोलिलो याग्रंथीं ॥ तुळसी माहात्म्य ॥३॥ पद्म पुराणीची कथा ॥ सावधान परिसावी श्रोतां ॥ दुश्रित न व्हावें सर्वथा । ऐसी विज्ञाप्ती तुम्हासी ॥४॥ सद्भावे कराल पठण ॥ तरी अगाध घडेल पुण्य ॥ महा दोष होती दहन ॥ तुळसी माहात्म्य ऐकिल्या ॥५॥ नैमिषारण्यीं ऋषेश्वर ॥ बैसले असती समग्र ॥ तयासीं सूत सांगे सविस्तर ॥ तुळसी माहात्म्य हे॥६॥ गुरु सांगे इद्र प्रल्हादासी॥ तुळसी कवचा ची कथा झाली ऐसी ॥पुढिले अनुसंधानासीं ॥चित्त देणें ॥७॥ कृष्ण नामें ब्राह्मण ॥ ब्राह्मण योनीं जन्मला आपण ॥ परी महा मूर्ख अज्ञान ॥ लेश नाही ज्ञानाच॥८॥ नाही वेदाध्ययन ॥ नव्हे शास्त्र पठण ॥ निरर्थक जन्म गेला म्हणून ॥ जंनं तयासीं हांसती ॥९॥ ब्राम्हण कुळीं जरी जन्मला ॥ ज्ञान नसतां वायां गेला ॥ जैसा अजागळींचा गलोला ॥ निर्थक ॥१०॥ ऐसा तो ब्राम्हण ॥ महा मूर्ख ज्ञान हीन न कित ॥ कित्येक काळ व्यर्थ गेला जाण ॥ आयुष्याची हानी झाली ॥११॥ ऐसें असतां एके दिवसीं ॥ काष्ठें आणावया गेला वनासी ॥ भ्रमण करितां तयासीं ॥ क्षूघेनें फार पीडिलं । ॥॥१२॥ तंव दृष्टी देखिंले तुळसीवन ॥ सहस्र वधी रोपे जाण ॥ मग तयां मध्ये आपण ॥ प्रवेशता जाहला ॥१३॥ आतां

भक्षीन हीं तुळसी पर्णे॥ तेणें माझी क्षुधा हरेल जाण ॥ ऐसें बोलोनियां आपण ॥ पर्णे तोडिता जाहला ॥१४॥ जंव पर्णास घाली हात ॥ तंव कृष्ण सर्प निघाला अकस्मात ॥ तेणें दंश केला त्वरित ॥ तया लागी ॥१५॥ विप्रे प्राण झाला व्याकुळ ॥ भूमी वरी पडिलता तात्काळ ॥ मूऱ्छा आली सबळ ॥ तया लागी ॥१६॥ तव त्या मार्गी अकस्मात। जात होते यम दूत॥ते एक मेकासीं बोलत ॥ ते समयीं ॥१७॥ हा परम पातकी असे मेला ॥ यासीं घेऊनि जाऊं चला ॥ सांडूनियां आपुले कुळा ॥ जाऊं नये ॥१८॥ ऐसें बोलुनी आल तया जवळीं ॥ तो कृष्ण सर्प घुधुःकारला तये वेळीं ॥ बोलता जाहला सुख कमळीं ॥ तयां प्रती ॥१९॥ अरे हा तुळसी वनांत पडिला ॥ तुळसीचा वायू यासीं स्पर्शला ॥ हा परम पुण्यवंत झाला ॥ तुम्हासीं संबंध नाहीं ॥२०॥ म्या यासीं केला दंश ॥ तेच हा जाहला पुण्य पुरुष ॥ ऐसे बोलोनिया अदृष्य्म ॥ सर्प जाहला ॥२१॥ तंव तेच वेळीं अकस्मात ॥ विष्णु चक्र आले त्वरित॥ तें ब्राह्मणाचे हातांत ॥ सांपडले देखा॥२२॥ चक्र हातीं सांपडले पाहीं ॥ यम दूतांचे न चाले कांही ॥ मग एकमेकासीं ते समयी ॥ बोलते जाहले ॥२३॥ आतां याचा पाहो प्रांत ॥ हा मरेल कीं पुन्हा होईल जिवंत ॥ याचा पुरवू अंत ॥ मग आम्ही जाऊं ॥२४॥ तुळसीच्या कृपे करुन ॥ तात्काळ उठिला ब्राह्मण ॥ हातीं चक्र असे दारुण ॥ स्पूर्श न करवे दूतांसी ॥२५॥ ब्राह्मण उठतां लवलाही ॥ परम ज्ञाता जाहला ते समयीं ॥ तुळसी महिमा न वर्णवे पाहीं ॥ मूर्खतो ज्ञाता जाहला ॥२६॥ तुळसी वनाचा वायु स्पर्शतां ॥ पातक संहारूनि झाला ज्ञाता ॥ तुळसी प्रसादें तत्वतां ॥ यम दूतांची वार्ता चालेना ॥ २७॥ म्हणोनि धन्य तो संसारी ॥ जो तुळसीची सेवाकरी ॥ त्या पुरुषासी श्रीहरी ॥ कोणे काळीं नुपेक्षी ॥२८॥ जो प्रााथः काळीं उठोन ॥ आधीं करी तुळसी चें दर्शान ॥ तरी त्याची फळश्रुती ऐसी जाण ॥सांगतों तुम्हासी ॥२९॥ त्यासी जाहलें नर्मदेचें स्नान ॥ गंगा गौतमी चें दर्शन ॥ आणि अगाध घडे पुण्य ॥ प्रातःकाळच्या दर्शनाणे ॥३०॥ सायं प्रातर्मध्यान्ह ॥ पूजा करितो तो धन्यधन्य ॥

त्यासीं लक्ष्मी चें नाहीं न्यून ॥ एसे पुराणीं बोलिलें॥ | ॥३१॥ पूर्वीचिया अनुसंधानीं ॥ चित्त द्यावें श्रोते जनीं ॥ स्वस्थ चित्त करूनी ॥ करावें श्रवण ॥३२॥ ब्राह्मणासीं जाहली ज्ञान प्राप्ती ॥ उठोनि चालिला गृह प्रती ॥ यमदूत परस्परे म्हणती ॥ समागमें जाऊं याच्या॥३३॥चक्र असे ब्राह्मणाच्या हातांत ॥ म्हणोनि यम दूत अंतरे चालत ॥ त्रिवर्ग पावले त्वरित ॥ गृहा ब्राम्हणाच्या ॥३४॥ द्वारी बैसला ब्राम्हण ॥ मग त्यांसी यम दूत करिती प्रश्न ॥ आह्मी यमदूत तुज न्यावया लागुन ॥ आलों होतो ॥३५॥ परी भगवंत कृपाळु जाहला ॥ चक्र पाठविलें तुजला ॥॥ आमुचा यत्न खुंटला ॥ नचले काहीं ॥३६॥ तरी तुज पुसतो एक ॥ ते सांगावें प्रीति पूर्वक ॥ पूर्वील पुण्य कितीक ॥ आहे तुझे ॥३७॥ त्वां पूर्वी काय केलें आचरण |॥ तुज प्रसन्ञ जाहला नारायण ॥ हे कृपा करून॥आम्हासीं सांग ॥३८॥ ऐकोनि प्रश्नाचा आदर ॥ बोलता जाहला द्वीजवर ॥ हा सकळ समाचार॥ तुम्हास श्रुत आहे ॥३९॥ तुम्हासी असे पूर्ण ज्ञान ॥ भूत भविश्य वर्तमान ॥ मी काय सांगों अज्ञान ॥ तुम्हीस ज्ञाता जाणतसा ॥४०॥ ऐकोनि त्याचें प्रति वचन ॥ यम दूत जाहले हर्षायमान ॥मग मागते जाहले वचन ॥॥ तया प्रती ॥४१॥ तुझ्या पुण्याचा लक्षांश ॥ आम्हास देणे या समयास ॥ ऐसे बोलोनि ब्राह्मणास ॥ नमस्कार केला॥४२॥ ऐसें बोलतां तयास॥ कृपा उपजली ब्राह्मणास ॥ लक्षांश पुण्य दीधले त्यांस ॥ ते समयी ॥४३॥ मग आज्ञा मागोनी ब्राह्मणासी ॥ यम दूत गेले आपुले स्थळासीं ॥ब्राह्मण करिता झाला सेवेसीं। पुनरपी तुळसीच्या ॥४४॥ उत्तम केलें वृंदावन ॥ सहस्र रोपे लाविले जाण॥ कर्दळी स्तंभ लाऊन ॥ मंडप केला ॥४५॥ भोंवत्याला विल्या पुष्पयाती ॥ ज्या मनोहर सुगंध असती ॥ रम्य स्थळ करोनि मध्ये मूती ॥ शाळिग्रामाच्या स्थापिल्या ॥४६॥ तुळसी शाळिग्रामाचे पूजन ॥ विष्णु सहस्र नामे करून ॥तुळसी पत्रें वाहुन ॥ नमस्कार करी ॥४७॥ येणें करून झाला परम ज्ञाता ॥ लक्ष्मीवंत जाहला तत्वता ॥ हरली संसार चिंत्ता ॥ भगवत्कृपा जाहली ॥४८॥ कृण्णंभट ब्राह्मण ॥ जाहला वेद शास्त्रीं प्रवीण ॥

॥४९॥

अठरा पुराणें मुखोद गतजाण ॥ जाहली तुळसी प्रसादें ॥४९॥ ब्राम्हणासी जाहली हे फळश्रुती ॥ ऋषेश्वरा प्रती सूत सांगती ॥ नैमिषारण्यीं बेसले असती ॥ एकांत स्थानीं ॥५०॥ हेचि कथा स्वर्गी बृहस्पती ॥ सांगतसे इंद्र प्रल्हादा प्रती ॥ ऐको नियां चित्तीं ॥ इंद्र प्रल्हाद संतोषले ॥५१॥ त्याच संस्कृता ची टीका ॥ श्रोतयांसीं सांगीतेली देखा ॥ ऐकतां चि परम सुखा ॥ पात्र जाहले ॥५२॥ तुळसी माहात्म्य परम दुर्लभ असे ॥ श्रवण करितां दिवसो दिवसे ॥लक्ष्मी वृद्धी होतसे ॥ विठ्ठल दास रुद्र म्हणे ॥५३॥

॥ इति श्रीस्कंद पुराणे ऋषि सूत संवादे तुळसी माहात्म्ये दशमोऽध्यायः ॥१०॥

॥ श्री स्वामी समर्थार्पणमस्तू ॥श्री गुरु दत्तात्रयार्पणमस्तू॥
॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥

❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀

# अथः एकाद्शोऽध्यायः

॥ ॐ श्री गणेशाय नमः ॥ ॐ श्री सरस्वत्यै नमः॥ ॐ श्री गुरुभ्यो नमः ॥॥ ॐ श्री स्वामी समर्थायै नमः॥ ॐ श्री ग्रामदेवतायै नमः॥ ॐ श्री वास्तू देवतायै नमः॥ ॐ श्री स्थान देवतायै नमः॥

॥ ब्राह्मण जाहला पुण्य पावन ॥ कारीता जाहला तुळसी अनुष्टान ॥ तंव तेथें नारदाचे आगमन ॥ अकस्मात जाहले॥१॥पुनीत देखोनियां त्यासी ॥ आश्चर्य वाटले नारदासी ॥ म्हणे हा होता महा दोषी ।तुळसी सेवेनें पावन जाहला ॥२॥ तरी धन्य धन्य तुळसीचे महिमान ॥ऐसे म्हणोनि केलें गमन ॥ मग विष्णु लोकास जाउन ॥ विष्णूसीं भेटता जाहला ॥३॥ ब्राम्हणाचा सांगीतला वृत्तांत ॥ महा मूर्ख झाला पंडित ॥ ऐसें तुळसीचें दत्त ॥ तयासी जाहलें ॥४॥ परिसोनि बोले नारायण ॥ तुळसीचे ऐसेंचि महिमान ॥ मज आणि तुळसींत मिन्नपण ॥ नाहीं जाण सर्वथा ॥५॥ तुळसी वेगळा मी नाहीं ॥ मज वेगळी तुळसी न राहे कदाही ॥ द्वेष तुळसीचा करिती पाही ॥ त्यांसीं निर्दाळी मी स्वयें ॥६॥ ऐसें बोलीला भगवान ॥ नारदा विनवी आपण ॥ मज सांगावें तुळसीचे अनुष्ठान ॥ आज्ञे प्रमाणें करीन मी ॥७॥ तुळसी चे ठाई नारदाची प्रीती ॥ जडली देखोनि सांगे श्रीपती ॥ पूजन सांगतों येणे रीती ॥ तें तूं करीं आता ॥८॥ उभय पक्षीं शुभ वारीं ॥ शुभ उद्य शुभ नक्षत्रीं ॥ क्लेश निवारणार्थ ऐसें करी ॥ तें सांगतों तुज ॥९॥ ग्रुहाचे द्वारी अथवा एकांत वनीं ॥ उभय भूमिका पाहोनी ॥ उत्तम वृंदावन करुनि ॥ सहस्रावधी रोपे लावी ॥१०॥ आपुली स्नान संध्या करी ॥ नित्य नेम सारी ॥ गायत्री चा जप करी ॥ मग आरंभ करी पुजना ॥११॥ सायं प्रातर मंध्यान्ह ॥ तुळसी चें ध्यान करून ॥

पूजा करी एकाग्र मन ॥ निश्चयेसीं ॥१२॥ आधीं करी तुळसीची प्रार्थना ॥ करद्वय जोडोनियां जाणा ॥ उभा राहोनि वृंदावना ॥ प्रार्थना ऐसी करावी ॥१३॥

**॥ प्राथना ॥ नमो नमो जगद्धात्रि जगद्देवि नमोस्तुते ॥ नमो नमो जगद्धते नमस्ते परमेश्वरी ॥१॥**

ऐसी प्रार्थना करी ॥ मग तुळसी चें ध्यान धरी ॥ ध्यान सांगतों मनांतरी ॥ बरवे धरीकां ॥१४॥

॥ ध्यानं ॥ **ध्यायेच्च-तुलसीं-देवीं-श्यामांकमल-लोचनाम् ॥ प्रसन्न-पद्म-कल्हार-वर-दांसु-चतुर्भुजाम् ॥२॥ किरीट हार केयूर कुंडलादि विभूषिताम् ॥ धवलांसुख-संयुक्तां-पद्मासन-विराजि-ताम् ॥३॥**

ऐसें करूनियां ध्यान ॥ मग करी आवाहन ॥ आवाहन तुज लागोन ॥ सांगतों ऐक ॥१५॥

**॥आवाहनम् ॥ ॥ देवि-त्रैलाक्य-जननी-सर्वलोकैक-पावनि। आगच्छ-भगवद्देवी-प्रसीद-तुलसि-प्रिये।। (देवैस्त्वं निर्मिता पूर्वमर्चितासि मुनीश्वरै। नमो नमसते तुलसि पापं हर हरिप्रये।।) ॥४॥**

या मंत्रे करून आवाहन ॥ आतां तुज सांगतों आसन ॥ऐका एकाग्र चित्ते करून ॥ सावधानऐक ॥१६॥

**॥ आसनम् ॥ ॥ सर्व-देव-मये-देवि-सर्वदा-विष्णु-वल्ल्भे ॥ देवि-स्वर्ण-मयं-दिव्यं-ग्रुहाणासनम-व्ययम् ॥५॥**

ऐसें झालिया आसन ॥ मग करी पादार्चन ॥ पादार्चन करावयाचा मंत्र जाण ॥ सांगतों तुज ॥ १७॥

**॥ पाद्यम् ॥ ॥ सर्व-देव-मयाकारे-सर्व-देव-नमोस्तुते ॥त्वं-प्रसीदमे ॥६॥**

या मंत्रें झालीया पादार्चन ॥ मग अर्घ्य समर्पावें जाण ॥ आतां अर्घ्याचा चा मंत्र आपण ॥ सांगतों तुज ॥१८॥

**॥ अर्घ्यम् ॥ ॥ सर्व-तीर्थ-मये-देवि-सर्वागम-निषेविते ॥ इदमर्घ्यम-गृहाणत्वं-देवि-देत्यांतक-प्रिये ॥७॥**

ऐसें अर्घ्य झालिया वरी ॥ आचमन सांगतों ते अवधारी ॥ नारदा प्रती स्वये श्री हरी ॥ सांगताहे ॥१९॥

**॥ आचमनम् ॥ ॥ सर्व-लोकस्य-रक्षार्थं-सदा-सन्निधि-कारीणि॥ गृहाणाच-मनं-देवि-प्रीत्यर्थं-परमेश्वरी ॥८॥**

ऐसे आचमन जाहलियावरी ॥ स्नानाचा मंत्र अवधारी ॥सांगतो मनांतरीं ॥ दृढधरीं ॥२०॥

**॥ स्नानं॥ ॥ गंगादिभ्यो-नदीभ्य-श्वसमा-नीतामिदं-जलम् ॥ स्त्नानार्थ-तुलसि-माते-प्रीत्यर्थ-प्रति-गृह्यत्ताम ॥९॥ मंदाकिनी-गोतमी-च-यसुना-च-सरस्वती ॥ गोमती-नर्मदा-तापिताभ्य-स्नानार्थ-माहतम् ॥१०॥नदी-नद-समुद्भूतं-पवित्रं-निर्मलं-जलं ॥ स्त्नानार्थ-तुलसि-माते-प्रीत्यर्थ-प्रति-गृह्यत्ताम ॥ ॥११॥**

स्नानाचा मंत्र सांगीतला ॥वस्त्रे वहावया सांगतो तुला ॥ या मंत्रें वस्त्रे समर्पी वहिली ॥ तुळसी देवीसीं ॥२१॥

**॥ वस्त्रम् ॥ ॥ क्षीरोद-मथनोदभूतं-चंद्र-लक्ष्मी-सहोदरम् ॥ गृहतां-परिधानार्थं-मिदं-वरं-शुभम॥१२॥**

ऐसें वाहिल्या वरी वस्त्र।आतां गंधाचा ऐक मंत्र ॥ सांगतों तुज सविस्तर ॥ तो अवधारी॥२२॥

**॥गंधम्॥ श्रीखंडं-कुंकुमंदिव्यं-कर्पूरागरु-संयुतम् ॥ कल्पितं-च-महादेवि-प्रीत्यर्थं-प्रति-गृह्यताम** ॥१३॥

ऐसें गंध समर्पिल्या वरी ॥ अक्षतेचामंत्र अवधारीं ॥ सांगतों तुज निर्धारी ॥तो ऐकपां ॥२३॥

**॥ अक्षता:॥ ॥ अक्षताश्च-सुर-श्रेष्ठे-कुंकुमाक्ता:-सुशोभिता:॥ मया-निवेदिता-भक्त्या-गृहाण-परमेश्वरि ॥१४॥**

अक्षतेचा मंत्र सांगीतला ॥ सौभाग्य द्रव्य अर्पी वाहिला ॥ त्याचा मंत्र तुजला ॥ सांगतो ऐक ॥२४॥

**॥ सोभाग्य-द्रव्यं-प्रीत्यर्थ-गृहाण-परमेश्वरि ॥१५॥ कंठ-सूत्रं-ताडपत्रं-तंथैव-पाद-भूषणम् ॥ नासामोक्तं-चांजनं-च-अर्पितं-ते-सुरेश्वरी ॥१६॥**

सोभाग्य द्रव्य अर्पिल्या वरी ॥ पुष्पें समर्पावीं ते अवसरीं ॥ त्याचा मंत्र निर्धारी ॥ सांगतो तुज ॥२५॥

**॥ पुष्पम ॥ ॥नीलोत्पल-सुकल्हार-मालत्यादी-निशोभने ॥ गंधवंति-च-पद्मानि-पुष्पाणि-प्रति-गृह्य-ताम् ॥१७॥**

आतां धूपाचा मंत्र तुजप्रती ॥ सांगतो तो धरून चित्तीं ॥ धूप समर्पी ऐसिया रिती ॥ तुळसा देवीसीं ॥२६॥

**॥ धूपम् ॥ ॥ देवि-गृहाण-देवेशि-मनोहारि-सु-गुग्युलम् ॥ आज्य-मिश्रंतु-तुलसि-प्रीत्याभीष्ट-प्रदायिनि ॥१८॥**

ऐसा धूप समर्पिल्या वरी ॥ दीप दाखवी ते अवसरीं ॥ तो मंत्र अवधारी ॥ एक चित्ते ॥२७॥

**॥ दीपम् ॥ ॥ अज्ञान-तिमिरांधस्य-ज्ञान-दीप-प्रदायानि ॥ तथैव-तुलसि-प्रीत्या-दीपोयं-प्रति-गृह्यताम् ॥ १९॥**

दीप समर्पिल्या वरी ॥ नेवेद्याचा मंत्र अवधारी ॥सांगतो या अवसरीं ॥ तुज कारणें ॥२८॥

**॥ नैवेद्यम् ॥ ॥ नमस्ते-जगतां-नाथे-प्राणिनां-प्रिय-दर्शने ॥ यथा-शक्ति-मया-दत्तं-नेवेद्यं-प्रति-गृह्यताम् ॥२०॥**

ऐसा नैवेध समर्पण करी ॥ मग उदक सोडावें भूमी वरी ॥ तयाचा मंत्र या प्रकारी ॥ म्हणावा ॥२९॥

**॥ उदकम् ॥ ॥ नमो-भगवति-श्रेष्ठे-नारायणि-जगन्मये ॥ शीतल-विमलं-नीरं-तुलसि-प्रति-गृह्यताम् ॥२१॥**

या उपरी उद्क समर्पोनी ॥ तांबूल समर्पी तुळसी लागुनी॥ त्याचा मंत्र श्रवणीं ॥ ऐक आतां ॥३०॥

**॥तांबूलम् ॥ ॥ अमृतामृत-संभुतं-तुलस्यमृत-रूपिणी ॥ कर्पूरादि-समायुक्तं-तांबूलं-प्रति- गृह्यताम् ॥२२॥**

यानंतर समर्पि दक्षिणा ॥ याचा मंत्र सांगतों जाणा ॥ सावधान करोनि अंतःकरणा ॥ ऐक आतां ॥३१॥

**॥ दक्षिणा॥ ॥ दक्षिणां-दक्षिण-करे-भक्तानां-प्रिय-कारिणि ॥ ददामिते-सदा-भक्त्या-तुलसि-प्राति-गृह्यताम् ॥२३॥**

ऐसी दक्षिणा समर्पिल्या वरी ॥ उत्तर नीराजन करी ॥ त्याचा मंत्र अवधारी ॥ सांगतों तुज ॥३२॥

**॥ नीराजनम् ॥ करोद्दर्तिस-दीपं-च-तिमिरस्य-निवारणंम् ॥ सौवर्णं-च-मयादत्तं-मार्तिक्यं-प्रति-गृह्यताम् ॥२४॥**

ऐसें नीराजन समर्पी ॥ मग पुष्पांजळी अर्पी ॥ तो मंत्र साक्षेपी ॥ ऐक आतां ॥३३॥

**॥ मंत्रपुष्पमू ॥ नाना-विधानि-पुष्पाणि-सुगंधानि-सुरेश्वरि ॥ अतस्त्वां-पूजयिष्यामि-गृह्यतां-सुमनोंजलिः ॥२५॥**

मंत्र पुप्पांजली जाहल्या वरी ॥ मग प्रदक्षिणा करी ॥ त्याचा मंत्र अवधारी ॥ सांगतों तुज ॥३४॥

**॥ प्रदक्षिणा ॥ नमो-नमो-जगद्धात्रि-जगद्देवि-नमो-नमः॥ नमो-नमो-द्भूतिर्नमस्ते-परमेश्वरि ॥२६॥**

प्रदक्षिणा जाहलिया वरी ॥ मग सास्टांग नमस्कार करी ॥ नमस्काराचा मंत्र ते अवसरीं॥ सांगतो तुज ॥३५॥

**॥ नमस्कारः ॥ प्रसीद-मम-देवि-त्वं-कृपया-परया-सदा ॥अभीष्ट-फल-सिद्ध्यर्तं-कुरुमे-माधव-प्रिये ॥२७॥**

ऐसा नमस्कार केलिया वरी ॥ प्रार्थना करीं जोडल्या करी ॥ मग प्रसन्न होईल सत्वरी ॥ तुळसी तुज कारणें ॥३६॥ प्रार्थनेचा मंत्र श्रीपती ॥ सांगता जाहला नारदा प्रती ॥ म्हणे एकाग्र चित्तीं ॥ ऐक आतां॥३७॥

**॥ प्रार्थना ॥ भद्रे-त्वामर्च-ये-नित्यं-प्रातरे-वशुचिर्नरः ॥ मध्यान्हेत्वां-च-सायान्ह-भुक्ति-मुक्ति-प्रदां-सदा ॥२८॥ सर्वोपचारेरथवा-चातुर्मास्ये-विशोषतः ॥ पूजये-त्तुलसीं-देवीं-मद्रूप-फलसिद्धये ॥२९॥**

ऐसें नारद मुनीसीं ॥ स्वमुखें सांगीतले हृषीकेशी ॥ तेचि कथा ऋषेश्वरासीं ॥ सूत सांगताहे ॥३८॥ स्वर्गी इंद्रप्रल्हादासीं॥गुरु सांगे आदरेसीं ॥ परिसतां उभयतां मानसीं ॥ परम संतोष जाहला ॥३९॥ त्याच परी श्रोतयांस ॥ विज्ञांप्ती करूनि सांगतसें सुरस ॥ उदास न धरावें मानस ॥ विठ्ठल दास रुद्र म्हणे ॥४०॥

॥ इति श्री स्कंद पुराणे तुळसी माहात्म्ये एकदाशोधायाय ॥आ.१०॥

॥ श्री स्वामी समर्थापणमस्तू ॥श्री गुरु दत्तात्रयार्पणमस्तू॥

॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥

❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# अथः द्वाद्शोऽध्यायः

॥ ॐ श्री गणेशाय नमः ॥ ॐ श्री सरस्वत्यै नमः॥ ॐ श्री गुरुभ्यो नमः ॥॥ ॐ श्री स्वामी समर्थायै नमः॥ ॐ श्री ग्रामदेवतायै नमः॥ ॐ श्री वास्तू देवतायै नमः॥ ॐ श्री स्थान देवतायै नमः॥

॥ नैमिषारण्यीं ऋषेश्वर ॥ बैसले असती समग्र ॥ ते पुसते झाले सर्वत्र॥ सूता लागीं ॥१॥ स्वामी तुळसी उत्पन्न जाहली कोठुन ॥ याचे कैसें आहे आख्यान ॥ तें सांगावें निरोपण ॥ कृपानिधी ॥२॥ आणिकइचें महिमान ॥तेंही सांगावें आपण ॥ श्रवणें तृप्त आमुचे कर्ण ॥ करा ऐसें बोलिले ॥३॥ ते समयीं सन्निध होता शतानंद ॥ सूताचा शिष्य वेद विद ॥ बोलता जाहला गुणानुवाद ॥तुळसी देवीचे ॥४॥ प्रातःकाळीं घडेल तुळसीचें दर्शन ॥ तरी सहस्र गोदानाचे पुण्य। लक्ष्मी राहे संपूर्ण ॥ तया पुरुषाचे घरीं ॥५॥ जो प्रातःकाळीं नित्य करी दर्शन ॥ त्यासी आणिकही प्राप्ती आहे जाण ॥ स्वामी ऐका चित्त देऊन ॥ बोलणें माझें ॥६॥ अशक्त होय बळिवंत ॥ देहींचे रोग नासती समस्त ॥ परम होय पुण्यवंत ॥ निश्चयेसीं॥७॥ शातानंदाचें इतुके जाहलें बोलणें ॥ मग सूत सांगते जाहले आपण ॥ म्हती स्वस्थ करूनिया मन ॥ तुळसी आख्यान ऐकावें ॥८॥ क्षीर ससुद्रीं होतीं चतुर्दश रत्नें ॥ तीं काढावयासीं केला यत्न ॥ तें सांगतों जाण ॥ तुम्हा प्रती ॥९॥ बिरडी केलीं वासुकीचीं ॥ रवी केली मेरूची ॥ युक्ती केली घुसळणाची ॥ ऐंशा प्रकारे ॥१०॥ एकीकडे घरिती सुरवर॥एकीकडे लागले असुर ॥ घुसळण करूनिया सत्वर ॥ रत्नें चतुर्दाशे काढिलीं ॥११॥ लक्ष्मी कोस्तुभ पारिजातक ॥ सुरा धन्वंतरी चंद्रमा देख ॥ ऐसीं हीं साहा जाहली ऐक ॥ आणिक सांगतों ॥१२॥ कामधेनु ऐरावत ॥ रंभा देवांगना नेमस्त ॥ अश्व सप्तमुखी शोभत ॥ ऐसीं दशक जाहलीं ॥१३॥ विष धनुष्य आणि शंख ॥ चवदावें

अमृत देख ॥ ऐसीं चतुर्दश रत्ने अमोलिक ॥ काढिलीं देखा॥१४॥ ऐसी काडीली चतुर्दश रत्ने ॥ देव देत्य विभाग करिते जाहले जाण ॥ कोणी घेतले कोण कोण ॥ तें सांगतों तुम्हा ॥१५॥ शंकरे घेतले चंद्रमा विष ॥ कौस्तुभ शंख लक्ष्मी विष्णूस ॥ अमृत दीधले देवांस ॥ तये वेळीं ॥१६॥ पांच प्राप्त जाहली इंद्रासी ॥ पारिजात करंभाधनुष्यासीं ॥ ऐरावत कामधेनूसीं ॥ घेता जाहला ॥१७॥ सुरादी घेली दैत्यांसी ॥ उच्चेश्रवा दीधला सूर्यासी ॥ धन्वंतरी स्वर्गासी ॥ राहिला देखा ॥१८॥ ऐसा चतुर्दश रत्नाचा विभाग केला ॥ विष्णू परम संतोषी जाहला ॥ आनंदें करुनी डोलों लागला ॥ तये वेळीं ॥१९॥ विष्णूची परम तृप्ती जाहली ॥ नेत्रांतून आसुवें बाहेर पडलीं ॥ त्यांतून तुळसी निघाली ॥ तात्काळ जाणा ॥२०॥ श्याम वर्ण चतुर्भुज ॥ कर्णी कुंडले मुगुट सतेज ॥ नेत्र कमळा कांर सहज ॥ असती देखा ॥२१॥ ऐसें देखोनि तियेसीं ॥ विष्णुणे आलिंगिली हृदयासीं ॥ परम होउनी संतोषी ॥ तिज प्रती बोलता जाहला ॥२२॥ तुळसी सीं करितां भाषण ॥ स्वर्गी सुरवरपाहती आपण ॥ काय बोलतो नारायण ॥ तें श्रवण करूं आम्ही ॥२३॥ तंव बोले नारायण ॥ तुजहून प्रिय आणिक नाही जाण ॥ तू माझी वल्लभा पूर्ण ॥ हे सत्य वचन जाण पै ॥२४॥ आणिक ऐक तुळसी देवी ॥ अखंड तूं मजपासीं असावी । प्रीत माझी असे आवघी ॥ तुझे ठायीं ॥२५॥ तुजवीण मज दुर्लभ नसे ॥ तुझे ठाई माझा परम संतोष ॥ म्हणोनी धरून हृदयास ॥ पुन्हा आलीन्गीली ॥२६॥ आणिक बोले लक्ष्मीकांत ॥ तुळसी तु ऐक निश्चित ॥ तुज सांगतों यथार्थ ॥ प्रीति पूर्वक ॥२७॥ नाना पुष्पयाती असती ॥ त्याची पुष्पं मज समर्पिती ॥ तेही माझे भक्त होती ॥ यथार्त जाणा ॥२८॥ मुक्ताफळा ने पूजा करिती ॥ सुवर्ण पुष्पे मज वाहती ॥ तेहि भक्त मज प्रिय होती ॥ यथार्थ जाणा ॥२९॥ नाना प्रकारची रत्नें॥पूजा करिती समर्पण ॥ रोप्य पुष्पें वाहती जाण मज कारणें प्रीती करूनी॥३०॥परी संतुष्ट नसें तुझे पत्राविण ॥ ऐसा माझा भावपूर्ण ॥ तुज सांगतों जाण ॥ निश्चयेसीं ॥३१॥ आणि सुवर्णाचे पर्वत ॥ रत्नाच्या लाखोल्या वाहता

नित्य ॥ पुण्याचे पर्वत सदोदित ॥ स्फटिक रत्ना मिती नाहीं ॥३२॥ इतुक्याचे फळ सांगतों देख ॥ सद्भावे वाहतां तुझें पत्र एक ॥ तुझ्या तों पत्रावांचुन आणिक ॥ मज प्रिय नाहीं ॥३३॥ ऐसें तुझे ठाई माझे मन ॥ बोलोनि तुळसी पत्रांची माळ घातली जाण ॥ कंठा पासूनि पादांगुष्ठ प्रमाण ॥ तये वेळीं ॥३४॥ मग होऊनि हर्षायमान ॥ म्हणे तूं साग कांहीं वरदान ॥ मागसील ते देईन ॥ तुजलागी ये समयी ॥३५॥ ऐसें बोलिला सर्वेश्वर ॥ मग तुळसी मागती जाहली वर ॥ तोही ऐका सादर ॥ चित्त देऊनियां ॥३६॥ म्हणे शंकराची तुझी प्रीती माझे ठाई ॥ अखंड असावी पाहीं ॥ मजवीण आणिक कांहीं ॥ तुह्मासी दुर्लभ नसावें ॥३७॥ आणिक मागतें देवाधिदेवा ॥ ते मज देईगा केशवा ॥ ऐसे बोलोनि तेव्हां ॥ विनविती जाहली ॥३८॥ माझे रोप लावोनि जो करी पाळण ॥ त्याचें किल्मिष जाईल निर्दाळुन ॥ स्वर्ग लोकाची प्राप्ती त्या कारणें ॥ केली पाहिजे ॥३९॥ जो करील माझे वृंदावन ॥ उदक घालील नित्यान ॥ त्यासीं वैकुंठ वास आपण ॥ दीघला पाहिजे ॥४०॥ जो नित्य करील माझें पूजन ॥ नैवेध दाखवी दीप लाउन ॥ त्यासी आपुली समता पूर्ण ॥ दीघली पाहिज़े ॥४१॥ अखंड वंदी माझें तीर्थ ॥ प्रदक्षिणा करील सात ॥ त्यासीं आपुली स्वरूपता निभ्रांत ॥ दिधली पाहिजे ॥४२॥ महापातकी असेल निभ्रांत ॥ तो माझी सेवा करील एक चित्त ॥ त्यासीं करावे पुण्यवंत देवाधिदेवा ॥४३॥ पापाचे पर्वत झाले असती ॥ तुझें नामस्मरण जे नर करिती ॥अंती त्यांचे मुखीं घालिती ॥ एक पर्ण माझे ॥४४॥ त्यासीं द्यावी उत्तम गती ॥ मुक्ती द्यावी निश्चिती ॥ माझी सेवा जे करिती ॥ तया लागी ॥४५॥ चतुर्मास मज पासीं लाविती दीप ॥ माझी पूजा करिती साक्षेप ॥ त्यासीं लक्ष्मी द्यावी अमुप ॥ स्वामिनाथा ॥४६॥ जो अखंड करी माझे भजन ॥ त्यावरी आपण कृपा करावी पूर्ण ॥ ऐसें मागीतले वरदान ॥ तुळसी देवीने ॥४७॥ विष्णु म्हणे तथास्तु ॥ तुझे पुरतील मनोरथु ॥ ऐसें बोलोनि अकस्मातु ॥ विष्णू अदृश्य जाहला ॥४८॥ स्वर्गी सकळ सुरवर ॥ आश्चर्य करिती थोर ॥ म्हणे तीतुळसी सवें अपार ॥

भगवंत बोलिला ॥ ४९॥ धन्य घन्य भाग्य तुळसीचे ॥ महिमान न वर्णवेइचे ॥ ऐसें बोलोनिया वाचे ॥ देव गेले निज धामा ॥५०॥ ऐसी कथा नैमिषारण्यासीं ॥ सूत सांगती ऋषेश्वरांसी ॥ तुळसीची उत्पत्ती झाली ऐसी | ते सांगीतली तुम्हाप्रती ॥५१॥ स्वर्गी इंद्रप्रल्हादासीं ॥ गुरु सांगे उभयतांसीं ॥ श्रवण करितां मानसीं ॥ उभयतांसीं संतोष ॥५२॥ त्यांचीं उच्छिष्ट उत्तरे ऐसीं ॥ प्राप्त झालीं वक्त्यासीं ॥ तींच श्रुत केलीं श्रोतयासीं ॥ श्रवणें दग्ध होती महादोष ॥५३॥ भाव धरोनि मानसीं ॥ जो श्रवण करील तुळसी माहात्म्यासीं ॥ त्यासी कृपा करील हृषीकेशी ॥ विठ्ठल दास रुद्र म्हणे ॥५४॥

॥इति श्री स्कंद पुराणे तुळसी माहात्म्ये द्वादशोध्यांयः ॥आ.१२॥

॥ श्री स्वामी समर्थार्पणमस्तू ॥श्री गुरु दत्तात्रयार्पणमस्तू॥

॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥

❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# अथः त्रयोद्शोऽध्यायः

॥ ॐ श्री गणेशाय नमः ॥ ॐ श्री सरस्वत्यै नमः॥ ॐ श्री गुरुभ्यो नमः ॥॥ ॐ श्री स्वामी समर्थायै नमः॥ ॐ श्री ग्रामदेवतायै नमः॥ ॐ श्री वास्तू देवतायै नमः॥ ॐ श्री स्थान देवतायै नमः॥

॥ नैमिषारण्यीं सकळ ऋषेश्वर ॥ सूता प्रती बोलती समग्र ॥तुळसी चे कीर्तीचा विस्तार ॥ आम्हास सांगीतला पाहिजे ॥१॥ पारिसोनि ऋषेश्वराची प्रश्नोक्ती ॥ सूत सांगती तयां प्रती ॥ सावधान होऊनि चित्तीं ॥ श्रवण करावें ॥२॥ सूत म्हणती तुळसीचीं दोन रूपें ॥ तेजोमय दिव्य स्वरूपें॥ कैसी जाणाल साक्षेपे ॥ सांगतों तुम्हा ॥३॥ एक श्याम वर्ण ॥ दुसरें शुभ्र संपूर्ण ॥ परि दोनही रूपाचेठायीं नारायण ॥ सर्वदां असे ॥४॥ दोनी रूपे सांगीतली निर्धार ॥ आता सांगतो कीर्तीचा विस्तार ॥ श्रवण करितां भवरोग दुस्तर ॥ निरसे देखा ॥५॥ प्रत्यही आपाद तळ मस्तका ॥ तुळसीचे खालील मृत्तिका ॥ सर्वांगासीं लाविता देखा ॥ सर्व पापे भस्म होती ॥६॥ जरी निरंतर भक्षी पर्ण ॥ तरी त्यासी घडे सहस्र गोदान ॥ परम पुण्यात्मा होय आपण ।॥ भक्षितां नर ॥७॥ नित्य तीर्थ प्राशन करी॥ तो पुण्य पावन होय संसारीं ॥ ॥ विष्णु लोकी निरंतरी ॥ करी वास्तव्य ॥८॥ शाळिग्रामासीं तुळसी पर्ण ॥ समर्पिल्या वीण न घे अन्न ॥ ऐसा ज्याचा नेम पूर्ण ॥ त्याची फळश्रुती ऐका ॥९॥ लक्ष्मी निरंतर राहे घरीं ॥ दिव्य देही होय शरीरीं ॥ अंत काळीं वास्तव्य करी ॥ विष्णु भुवनीं ॥१०॥ सर्व पाक निष्पत्ति झालिया घरीं ॥ तुळसी पत्रें तीर्थ प्रोक्षी वरी ॥ तो नैवेध शाळिग्रामासीं समर्पी जरी ॥ तरी तृप्त होय मगवान ॥११॥कर्त्या पुरुषासीं नाही अभावना ॥ पुत्र पौत्र संपूर्ण धन धान्या ॥ पावोनियां जाणा ॥ विष्णु पद प्राप्त होय ॥१२॥ तुळसी वृन्दावानी करी श्राद्ध ॥ तरी त्यासीं पुण्य घडे अगाध ॥ एके श्राधी दश श्राद्ध ॥

जाहलीं त्याचीं ॥१३॥पतिव्रतेसीं न लगे आणिक उपाव करावा ॥ तिसीं दुर्लभ पतिसेवा ॥ पति सेवेची देवाधि देवा ॥ आवडी मोठी ॥१४॥ परी तिने सेंवा तुळसीची करितां ॥ सद्भावे प्रदक्षिणा घालिंता ॥ हळदी कुंकु सुवासिनीसीं समर्पितां॥ सौभाग्य वर्धन होय तिचे ॥१५॥पुत्रांसीं भक्ति माता पित्याची ॥ गरज नाहि इतर साधनाची ॥ जे जे पदार्थी वासना त्यांची ॥ पुरविता मी होय ॥१६॥ दुर्लभ सेवा गो ब्राम्हणाची ॥ अखंड सेवा दोठाई ज्याचीं ॥ त्यासीं प्राप्ती होय सर्व सिद्धीची ॥ येणें चि करूनि ॥१७॥ परम दुर्लभ विष्णूची भक्ती ॥ ऐसा भांव धरू चित्तीं ॥ सेवा कर्त्यासीं होय प्राप्ती ॥ सायुज्यता ॥१८॥ शिष्यासीं दुर्लभ गुरूची सेवा ॥ गुरुसेवेने पावे परतीर ठेवा ॥ सदा स्वरूपी होईल राहावा॥गुरु सेवेने॥१९॥जैसी हीं आघवीं ॥ तैसीच तुळसीची सेवा जाणावी ॥ संर्व मन कामना पुरवी ॥ तुळसी देवी ॥२०॥ यास्तव श्री रामें सरयू तीरीं ॥ सेवा केली बहुत दिवसवंरी ॥ ज्ञान व्हावें मज अंतरी ॥ सर्व काळ ॥२१॥ मग तुळसी होऊनि प्रसन्न ॥ देती झालीं वरदान ॥ अपार दीधलें ज्ञान ॥ रंमचंद्रासी ॥२२॥दुसरे अनुष्ठान श्री रामे केले आपण॥ सिता शुद्धी करोनि रावण कुंभकर्ण ॥ निर्दाळावया ॥२३॥श्री रामें करितां अनुष्ठान ॥ पूर्णता झाली परिपूर्ण ॥ मग तुळसी होऊनि सुप्रसन्न ॥ वर देती जाहली ॥२४॥ श्री रामा तुझे मनोरथ ॥ सर्व पूर्ण होती यथार्थ ॥ ऐसा बोलोनि वाक्यार्थ ॥ आशीर्वाद दीधला॥२५॥ हनुमंत म्हणे तुळसी देवी ॥ मज सीता शुद्धी व्हावी॥श्री राम कृपा संपादावी ॥ तत्काळ देखा ॥२६॥ शुद्धी करोनी म्या व्हावें विजई॥पुनरपि रामासीं सांगावया येई ॥ हेच मज देई ॥ म्हणोनि अनुष्ठान केलें ॥२७॥ मग तुळसी प्रसन्न झाली ते समयीं ॥ म्हणे तुझी कार्य सिद्वी झाली पाही ॥ चिंता न करी कांहीं ॥ विजयी होसील हनुमंता ॥२८॥ श्री राम डारेंपडिळलावाळी ॥ तारा नमन करी ते वेळीं ॥ म्हणे पुन्हां खंडावी जन्मावळी ॥ प्राण नाथाची ॥२९॥ मिळणी होय सायुज्यतेसीं ॥ पुन्हां येणें नलगे गर्भवासी ॥ ऐसिया अनुष्ठानासीं ॥ करू आतां।३०॥मग तुळसीचे करूनि अनुष्ठान ॥ वर मागीतला

आपण ॥ म्हणे पतीचें येणें जाणें ॥ चुकवी माते ॥३१॥ मग प्रसन्न झाली तुळसी ॥ म्हणे पुनर्जन्म नाहीं वाळीसीं ॥ ऐसे बोलोनि त्या समयासी ॥ तुळसी अहृश्य जाहली ॥३२॥ याच परी तुळसीचें अनुष्ठान ॥ केलें कृष्णें कामना धरून ॥ तें मी सांगतों तुम्हालागुन ॥ ऐका आतां ॥३३॥ गोमती चे तीरी ॥ उत्तम वृंदावन केलें झडकरी ॥ सहस्र रोप लाविले ते अवसरीं, ॥ श्री कृष्ण नाथें ॥३४॥ म्हणे दोन संकल्प माझे मानसीं ॥ ते मी सांगतों तुज पासीं ॥ चित्त देऊनि परियेसी ॥ तुळसी देवी ॥३५॥ कंसाचे करावे निर्दाळण ॥ गोकूळ रक्षावे आपण ॥ हाचि मंज वर देई जाण ॥ म्हणोनि अनुष्टान करिता झाला ॥३६॥ श्री कृष्णे एक चित्ते ॥ अनुष्ठान केले दिवस बहुत ॥ मग तुळसी मूर्तिमंत ॥ भेटती झाली ॥३७॥ उभयतांसी जाहलें आलिंगन ॥ आलिंगिली परम प्रीती करून ॥ मग बोलती जाहली वचन ॥ श्री हरी प्रती ॥३८॥ तुमचे पुरती मनोरथ ॥ कंसासीं माराल निभ्रांत ॥ गोकुळ रक्षाल ॥ त्वरित निश्चयेसी ॥३९॥ ऐसें दीघले वरदान ॥ संतोष पावला जगज्जीवन ॥ मग बोलता जाहला आपण ॥ तुळसी प्रती ॥४०॥ म्हणे जितुके ठाईं माझी वस्ती ॥ ते मी सांगतो तुजप्रती ॥ श्रवण करीं एकचित्तीं ॥ दुश्रित न व्हावें ॥४१॥ क्षीर सागरी माझे स्थान ॥ वैकुंठ हें माझें भुवन ॥मध्यान्हीं रवि मंडळीं असें जाण निश्चयेसी ॥४२॥ आणिक वास्तव्य स्थळ द्वारका ॥ की हरी कीर्तनीं उभा देखा ॥ ऐसें बोलतां यदु नायका ॥ तुळसी देवी आनंदली ॥४३॥ इतुके स्थळीं माझी वस्ती ॥ परी तेथें नाहीं सुख निवृत्ती ॥ अखंड तुझे ध्यान चित्ती ॥ असे देखा ॥४४॥ मी सर्व काळ असे तुज जवळी॥ ऐसें बोलोनि वनमाळी॥ परिसोनी गोपांगना सकळी ॥ आश्चर्य करिती ॥४५॥ मग तुळसीसीं आलिंगुनी ॥ रास क्रीडा खेळें वृंदावनीं॥सकळ पाहती नयनी॥ सर्व जन ॥४६॥ सकळ गोपिका समवेत ॥ क्रीडा करी भगवंत ॥ मुरली वाजवी तेणें समस्त ॥ आनंद मय जाहले ॥४७॥ आतां याच समयासीं ॥ यात्रे करी जाती द्वारकेसीं ॥ तेही वृंदावनासीं ॥ नमस्कारासी पै जाती ॥४८॥ क्रीडा केली भगवंते ॥ म्हणोनि अवश्य जाती तेथे

॥॥ पुण्यवंत ते दर्शनाते ॥ करिती देखा ॥ ४९॥ अखंड करिती तुळसीचें पुजन ॥ लेती तुळसी काष्ठाचें भूषण॥कर्णी कंठीं दंडीं मनगटीं आपण ॥माळा घालिती देखा ॥५०॥ नर अथवा नारी ॥ तीं पुण्यवंत होती शरीरीं ॥ त्यामागे श्री हरी ॥ अखंड धांवे ॥५१॥ जैसी वत्सा कारणें ॥ घेनू धांवे सत्राणें ॥ तेसी तुळसी भक्तांसीं नारायण ॥ मागें पुढें सांभाळी ॥५२॥ जो असे तुळसीचा भक्त ॥ तो मज प्रिय अत्यंत ॥ त्यासीं मजसीं यथार्थ ॥ दुजा अर्थ कांहीं नसे ॥५३॥ असो भगवंतासी तुळसी समर्पिल्यावीण ॥ सर्वार्थ अन्न नाहि मक्षण ॥ ऐसा ज्याचा नेम संपूर्ण ॥ त्याची फळश्रुती एका ॥५४॥ त्यासीं विघ्न बाधूं न शके सर्वथा ॥ जैसी बाळकासी रक्षी माता ॥ ऐसा होय रक्षिता ॥ श्री हरी त्यासीं ॥५५॥ भगवंतासीं तुळसी समर्पावया कारण ॥ पर्णे तोडावीं आपण ॥ तोडावयाचा मंत्र पूर्ण ॥ सांगतों तुम्हासीं ॥५६॥

**॥मंत्र ॥ मोक्षैकहेतोर्धरणी-प्रसूते-जगत्समस्तेस्तु-गुरौ-प्रियायते॥ आराधनार्थे-द्विदलं-भवत्यास्तु-दाम्यहं-देवि-मम-क्षमस्व-तत् ॥५७॥**

या मंत्रें प्रार्थना करुन ॥ मग पर्णे तोडावीं आपण ॥ तीं समर्पावी हरि कारणें ॥ भाव पूर्वक ॥५८॥ नखे तोडिल्या पान ॥ ती ढीर्घ दोशी होय आपण ॥ बोटेंच करोनी जाण ॥ तुळसीं पत्रे तोडावीं ॥५९॥ द्वादशीस तोडील तुळसी पर्ण ॥ तो असुर योनींत जन्मेल जाण ॥ म्हणोनि द्वादशीस सर्वथा पर्ण ॥ तोडोच नये ॥६०॥ शाळिग्रामास पर्ण समर्पिल्या वीण ॥ सर्वथा अन्नचि नाहीं भक्षण ॥ ऐसा नेम असेल तेणें ॥ काय करावें ॥६१॥ ऐसी आशंका धराल चित्तीं ॥ तरी त्याची सांगतो ऐसी युक्ती ॥ तेही ऐका निश्चिती॥ चित्त स्थीर करूनिया ॥६२॥ निर्माल्य पत्र उदकीं धुवोनी ॥ तीं समर्पावीं शाळिग्रामा लागुनी॥परी द्वादशीस तोडो नये ऐसें पुराणीं ॥ बोलिलें आहे ॥६३॥विष्णु रूप शाळिग्राम॥दोन्ही मध्यें नाहीं मिथ्या भ्रम॥या कारणें धरोनि प्रेम ॥तुळसी अरपण कराव्या

॥६४॥हें जन तारावयासीं ॥ तुळसी ने वास्तव्य केलें प्रयागासीं ॥ तेथे स्नान करील त्यासी ॥ मोक्ष होय ॥६५॥ बिंदु माधवीं वा तुळसी सीं ॥ तेथें दर्शन होय ज्या प्राणियासीं॥ तो जाईल मोक्ष पदासीं ॥ सत्य जाणा ॥६६॥ यमलोकी चे पितर ॥ तेस्वर्ग वास करिती निरंतर ॥ यास्तव तुळसी स्थीर ॥ गयेसीं जाहली ॥६७॥ स्थीर झाली असे तेथें ॥भक्ताचें आगमन इच्छित ॥ जे जावोनि दर्शन करिती त्वरित ॥ पूर्वज त्यांचे उद्धरती ॥६८॥ ऐसी कथा ऋषीश्वरासीं ॥ सूते सांगीतली स्वमुखेसीं ॥ स्वर्गी इंद्र प्राह्लादासी ॥ देव गुरू सांगतसे ॥६९॥ तोचि हा सारांश ॥ वक्त्याने श्वृत केला श्रोतयांस ॥ अगाध महिमा तुळसीची विशेष ॥ बिठ्ठल दास रुद्र म्हणे ॥७०॥

॥ इति श्री स्कंद पुराणे तुळसी माहात्म्ये त्रयोदशोध्याय: ॥आ.१३॥

॥ श्री स्वामी समर्थापणमस्तू ॥श्री गुरु दत्तात्रयार्पणमस्तू॥

॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥

❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀

# अथः चतुर्द्शोऽध्यायः

॥ ॐ श्री गणेशाय नमः ॥ ॐ श्री सरस्वत्यै नमः॥ ॐ श्री गुरुभ्यो नमः ॥॥ ॐ श्री स्वामी समर्थायै नमः॥ ॐ श्री ग्रामदेवतायै नमः॥ ॐ श्री वास्तू देवतायै नमः॥ ॐ श्री स्थान देवतायै नमः॥

॥ नैमिषारण्यीं सर्व ऋषेश्वर ॥ बैसले असती समग्र॥ त्यांतून मरीची ऋषेश्वर ॥ सूता प्रती पुसतसे ॥१॥ तुळसीचें महिमान ॥ परिसावया कारण ॥ उदित माझे मन ॥ तरीं सांगीतले पाहिजे ॥२॥ तयांचा परिसोनि आदर ॥ सूत सांगे सविस्तर ॥ तव बोलता झाला सत्वर ॥ गरुड तेव्हां ॥३॥ सूतासीं करी विनंती ॥ म्हणे श्री हरी नारदा प्रती ॥ तुळसी महिमा आपुले मुखोद्गती ॥ सांगता जाहला ॥४॥ तें म्यां केलें श्रवण ॥ आज्ञा कराल तरी सांगेन ॥ ऐसें परिसोनी जाण॥ सूतें आज्ञा दीधली ॥५॥ मग गरुड मरीची प्रती ॥ सांगता जाहला यथामती ॥ जेजे बोलिला होता श्रीपती ॥ स्वमुखें नारदासीं ॥६॥ उत्तम करोनि वृंदावन ॥ सहस्त्रा वधी रोपे लाउन ॥ उदक घालोनि पूजार्चन ॥ नित्य करी ॥७॥ त्यासीं घडले वेदाध्ययन ॥ शास्त्राचें श्रेय आलें जाण ॥ यासीं संशय न धरावा कवणें ॥ ऐसें गरुडे सांगितलें ॥८॥ तुळसी मुळीची मृत्तिका ॥ प्रत्यहीं लाऊनि स्नान करीं देखा ॥ त्याचीं सप्त कुळें उदरती ऐका ॥ निश्च येसीं ॥९॥ तुळसीच्या तीर्थे स्नान करुन ॥ ऐसा नेम जया चा पूर्ण ॥ त्यासीं सर्व तीर्थाचे स्नान ॥ जाहलें जाणा

॥१०॥ कर्णी खोवी तुळसी दळ ॥ तो सदां असे निर्मळ ॥ तयाचे अंगीं विटाळ ॥ बाधक न होय ॥११॥ तुळसीचें एक पर्ण ॥ जो नित्य करी भक्षण ॥ त्याचे सर्व पाप जाय जाण ॥ ऐसें नारायण बोलिले ॥१२॥ शाळिग्रामासी तुळसी समार्पिल्या वीण ॥ प्राणांतीं नाहीं करणें भोजन ॥ ऐसा नेम जयाचा असेल पूर्ण ॥ त्याची फळश्रुती आइका ॥१३॥ विमानी बैसवोनि त्यासीं ॥ नेतील वैकुंठ भुवनांसी ॥ बैस बोले ऋशीकेशी ॥ आपुले मुखें ॥१४॥ अभिषेक करी तुळसीसीं ॥ धुप दीप नैवेध समर्पी सद्भावेसी ॥ मंगळ आरती करी गजरेसीं ॥ चतुर्मास ॥१५॥ त्याचे पितर कुंभपाकांतून निघती ॥ त्यांसी तत्काळ वैकुंठ प्राप्ती ॥ पुण्य सरल्या उत्तम योनी जन्मती ॥ सत्य जाण ॥१६॥ कार्तिकशुद्ध द्वादशीसी ॥ पूजा करी गजरेसीं ॥ हरिकथा करुनी खिरा पतीसीं ॥ वाटी देखा ॥ ॥१७॥ त्याचे सहस्र जन्माचे जाय पाप ॥ लक्ष्मी प्राप्त होय अमुप ॥ अंतीं विमानीं बैसोनि विष्णु समीप ॥ जाय देखा ॥१८॥ अखंड दीप लावी तुळसी जवळीं ॥ खंड होऊं नेदी कोणे काळीं ॥ तरीं त्याचे गृही सर्व काळीं ॥ लक्ष्मी वसे ॥१९॥ ये विषयी एक ऐका कथा ॥ श्रवण करावी श्रोता ॥ सावधान करूनि चित्ता ॥ पुढील वार्ता ऐकावी ॥२०॥ लुब्धक नामे एक शूद्र होता ॥ त्याची ऐकाजी कथा ॥ तुम्हा प्रती सांगतों आतां ॥ गरुड म्हणे ॥२१॥ माता पिता असती तयांसी ॥ स्त्री पुत्र असे त्यासीं॥ बंधू सहित गृहासीं ॥ काळ क्रमणा करीतसे ॥२२॥ तो मार्गस्थांचा वध करी ॥ अणखी उदंड जीव मारी ॥ ऐसें नित्य पाप करी ॥ लुब्धक तो ॥२३॥ ऐसें मारितां दिवस लोटले बहुत ॥पापाचे पर्वत जाहले अपरिमित ॥ म्हणोनिया पाहोनि शास्त्रार्थ ॥ सांगती तया ॥२४॥ घरचीं अवघीं करिती उपदेशा ॥ या कर्मे तुज घडेला बहुत दोष ॥ आतां तु पाप कर्मास ॥ प्रवर्तु नको ॥२५॥ ऐसें नित्यानित्य त्यास सांगती ॥ नाइकतां धनुश्य बाण घेऊनि हातीं ॥ नित्य जाय वना प्रती ॥ लुब्धक तो ॥२६॥ ऐसे करितां एके दिवसीं ॥ श्वापदे न देखे अरण्यासीं ॥ मार्गस्थ हीन भेटती वाटेसीं ॥ परम चिंतातुर जाहला ॥२७॥ ऐसा हिंडतां वनांतरीं ॥ शुधेनो

पीडिला भारी ॥ खरसी आली मुखा भीतरी ॥ प्राण जाऊं पाहतसे ॥२८॥ तंव अकस्मात देखिलें हरण ॥ अति सुंदर मनोहर जाण ॥ मग हातीं घेउनि धनुष्य बाण॥ त्याचे पाठीं लागला ॥२९॥ तो चमकोन गेला तुळसी वनांत ॥ हाही धावोन गेला तेथ ॥ तंव तो गुप्त झाला अकस्मात ॥ तये वेळीं ॥३०॥ तव लुब्धक प्रवेशाला तुळसी वनांत ॥ क्षुधेनें मूर्चित पडिला तेथे ॥ मागुती मृग त्वारीत ॥ निर्माण जाहला ॥३१॥ इंद्र देवा सह वर्तमान ॥ कौतुक पहावया आले आपण ॥ कनकाचा कैसा आहे हरिण ॥ तो दृष्टी पाहु ॥३२॥ ऐसे जाहलें त्या स्थळासीं ॥ तंव श्रुत जाहलें यमासी ॥ तेणें आपुलिया भृत्यासी ॥ आज्ञा केली ॥३३॥ म्हणे तुह्मीं जावें त्या स्थळासीं ॥ बांधोनि आणावें लुब्धकासीं ॥ ऐसी आज्ञा दीधली त्यांसी ॥ यम रायें ॥३४॥ ते आले महा भयानक ॥ श्यामवर्ण विक्राळ देख ॥ स्थूळ पिंगट वर्ण मस्तक ॥ हातीं पाश गोफणी ॥३५॥ एकाचे हातीं लोहाचीं मुसळें ॥ एकाचे करींटोण पेसगळे ॥ एक गिळूं म्हणती बळे ॥ लुब्धकासीं ॥३६॥ ऐसे ते आले त्या स्थळा ॥ परि स्पर्श न करवे त्याला ॥ तुळसी वनांत असे पडिला ॥ म्हणो नियां ॥३७॥ परस्परं एकमेकाते ॥ विचार करूं लागले तेथें ॥। आम्हासी न धरवे यातें ॥ हा तुळसी वनांत पडिला असे ॥३८॥ऐसा जंव विचार करिती॥ तंव अंतरीं जाणविले विष्णु प्रती ॥ मग विष्णु दूतांसी लक्ष्मी पती ॥ आज्ञा करिता जाहला ॥३९॥ लुब्धक पडिला तुळसी वना प्रती ॥ यम दूतन्यावया आले असती ॥ त्यांसी न धरूं द्यावें हातीं ॥ लुब्धकासी ॥४०॥ युद्धासी सरसावले तरी युद्ध करणे ॥ शिक्षा लावोनि बाहेर घालवणें ॥ लुब्धकासी घेऊ न येणे ॥ मज पासीं ॥४१॥ जे तुळसी स्पर्श तेणे केला ॥ तेणेच तो माझा परम भक्त झाला ॥ ऐसी आज्ञा भृत्याला ॥ श्री हरीने केली ॥४२॥ मग ते आले विष्णु दूत ॥ तेजोमय लखलखीत ॥ अंग कांती झळकत ॥ सूर्या सारिखी ॥४३॥ द्वादश टिळे रेखिले असती ॥ तुळसी माळा गळां शोभती ॥ महा पुण्य वंत दिसती ॥ श्याम रूपें ॥४४॥ गदा चक्र करीं शोभती ॥ दिव्यांबरं परिधान केली असती ॥

रत्न सुगुट विराजती ॥ शीरीं देखा ॥४५॥ कर्णी कुंडलें देदीप्यमान ॥ ऐसे ते पावले तुळसी भुवन ॥ मग यमदूतांप्रती वचन ॥ बोलते झाले॥४६॥ तुम्हासीं काय कारण यावया येथे ॥ ते म्हणती न्यावया आलो लुब्धकाते॥ परिसोनि त्याचिया वचनातें ॥ प्रत्युत्तर त्यांसी देती ॥४७॥ विष्णूची आज्ञा आहे ऐसी ॥ यासीं घेऊनि यावें विष्णु लोकांसी ॥ तरी तुम्ही जावे आपुले स्थळासीं ॥ आम्ही यासी घेऊनि जाऊ ॥४८॥ ते म्हणती यमाची आज्ञा आम्हासी ॥ यासीं आणावे यमलोकासी ॥ तरी आम्ही नेऊ यासीं ॥ तुम्ही जा आपुले स्थळा ॥४९॥ तेथें नेलिया यासी ॥ निवाडा होय पाप पुण्यासीं ॥ मग जे सांगती निश्चयेसीं ॥ भोगणे लागे॥५०॥विष्णु दूत म्हणती हें बोलतांवा उगें ॥॥ तुम्ही जावें आलिया मार्गे ॥ युद्ध करणे असेल याप्रसंगे ॥ तरी सुखें करावें ॥५१॥ ऐसें त्यांचें निष्ठुर बोलणे ॥ ऐकोनि विचार करिती आपण ॥ यासीं युद्ध करितां संपूर्ण ॥ पराभविती आम्हासी ॥५२॥ ऐसा विचार करोनि त्याहीं ॥ मग गमन केले पाही ॥ यमा जवळी जाऊनि ते समयीं ॥ सकळ वृत्तांत श्रुत केला ॥५३॥ यम दूत विष्णुदूतां चे भाषण ॥ लुव्धके केले श्रवण ॥ म्हणे धन्य भाग्य माझे पूर्ण ॥ भगवंते अंगि कारिले ॥५४॥ म्या कुटुंबा कारणे ॥ नाना कर्मे केली जाण ॥ सेवटीं लागले भोगणें ॥ माझें मज ॥५५॥ कोणाच्या रांडा कोणाची पोरें ॥ पुण्य पाप भोगिलें शारिरें ॥ बरोबर कोणी न ये हेतो खरे ॥ दिसता हे ॥५६॥ अंतीं कोणी कोणासीं ॥ सर्वथा न येती कार्यासी॥ धिग धिगम्या जन्मासीं ॥ व्यर्थ गमाविलें ॥५७॥ म्या आयुष्य व्यर्थ गमाविलें ॥ सवंर्था नाहीं हरि भजन कलें ॥ एसे अनुतापे ज्ञान जाहलें ॥ तुळसी च्या प्रसादें॥५८॥मग स्मरता झाला श्री हरिसी ॥ तैव विष्णु दूते नेलें त्यासीं ॥ नेऊनि विष्णु भुवनासीं ॥ श्री विष्णूसी भेटविला ॥५९॥ त्यासी ठेविले आपणा पासी ॥ कृपाळु झाला हषीकेशी॥हे कथा मरीची ऋषीश्वरासी ॥गरुडे सांगीतली ॥६०॥ स्वर्गी इंद्र

प्रल्हादासीं ॥ बृहस्पती सांगे उभयतांसी ॥ कथा सांगीतली ऐसी ॥ तुळसी माहात्म्याची ॥६१॥ तोचि संवाद श्रोतयांसीं हर्षे । वकत्यानें सांगीतला उल्हासें ॥ विकल्प न धरावा मानसें ॥ विठ्ठल दास रुद्र म्हणे ॥६२॥

॥ इति श्री स्कंद पुराणे तुळसी माहात्म्ये चतुदेशोअध्याय ॥आ.१४॥

॥ श्री स्वामी समर्थापणमस्तू ॥श्री गुरु दत्तात्रयार्पणमस्तू॥

॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥

❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# अथः पंचद्शोऽध्यायः

॥ ॐ श्री गणेशाय नमः ॥ ॐ श्री सरस्वत्यै नमः॥ ॐ श्री गुरुभ्यो नमः ॥॥ ॐ श्री स्वामी समर्थायै नमः॥ ॐ श्री ग्रामदेवतायै नमः॥ ॐ श्री वास्तू देवतायै नमः॥ ॐ श्री स्थान देवतायै नमः॥

॥ मागुती मरीची ऋषेश्वरासीं ॥ गरुड सांगता झाला तुळसी माहात्म्यासी ॥ म्हणे कथासांगतों तुम्हा पासीं ॥ ते ऐका आतां ॥१॥ मागे सांगी त लुब्धकाच्या कथेसी ॥ तो परम पुण्यवंत झाला परियेसी ॥ त्याचे झालिया दर्शनासीं ॥ पापी पुनीत होती ॥२॥ या उपरी एके समयासीं ॥ दुर्वास देवें शापिले इंद्रासीं ॥ तो भयाभीत होऊनि मानसीं ॥ कांपों लागळा ॥३॥ बहुत भाकोनि काकुलती॥ उःशाप मागे दुर्वा साप्रती ॥ तेव्हां दुर्वास उःशाप त्याप्रती ॥ देता जाहला ॥४॥ म्हणे समुद्राचे होईल मंथन ॥ त्यांतून निघतील चतुर्दश रत्ने ॥ त्यांतून तुज प्राप्त होईल तेणें निरसन ॥ या शापाचे होईल ॥५॥ यास्तव केलेंस सुद्रमंथन ॥ त्यांतून काढिलीं चतुर्दश रत्ने ॥ त्याचा विभाग संपूर्ण ॥ द्वादशोध्यायीं कथियेला ॥६॥ पांच प्राप्त जाहलीं इंद्रासी ॥ उःशाप घडला त्यासी ॥ विष्णु परमझाला संतोषी ॥ लक्ष्मी प्राप्त जाहली ॥७॥ मग अति प्रेमें ते अवसंरी ॥ आसुवे आली नेत्रा बाहेरी ॥ त्यांतून निघाली झडकरी ॥ तुळसीं देवी ॥८॥ हे पूर्वी सांगीतली कथा ॥ मागिले अध्यायी तत्वतां ॥ समयानुसार आतां ॥ किंचित सांगीतलें॥९॥मग तेच अवसरीं ॥ विष्णू ने बैसविली मांडीवरी ॥ ससुद्रांतील अमृत कुंभ भरी ॥ विभागासी ठेविलें होतें॥ १ ०॥त्यांतून बिंदू पडिला तुळसी वरी ॥ म्हणोनि अमर झाली पुरी ॥ ऐसे ग्रंथातरी ॥ सांगीतले आहे ॥११॥ नित्य विष्णूसीं अर्पी तुळसी पर्ण ॥ तो पुरुष देवा सीं वंद्य जाण ॥सर्व देव त्याचें दर्शन करून ॥ तृप्त होती ॥१२॥ तुळसी काष्ठ उगाळुन ॥ विष्णूसीं समर्पी जाण ॥ तरीं त्याच्या

हदयीं नारायण ॥ निरंतर राहे ॥१३॥ श्राद्धी करितां भोजन ॥ तुळसी माहात्म्य होय श्रवण ॥ तरी त्याचे पितृगण ॥ वैकुंठासी गेले ॥१४॥ ऐका ब्राह्मणाची कथा ॥ ते सांगतो आतां ॥ श्रवण करा एकात्मता ॥ एकचित्ते करोनी ॥१५॥ वरमेधा सुमेधा ब्राह्मण ॥ हें उभयतां बंधु असती जाण ॥ वरमेधा ज्येष्ठ आपण ॥ कनिष्ठ तो सुमेधा पै ॥१६॥ परम पवित्र उभयतां ॥ वेदाध्ययनीं तत्वता ॥ शास्त्राची संपूर्णता ॥ दोघांसीं असे ॥१७॥ त्यासीं द्रव्य असे अपार मग करिते जाहले उभयतां विचार ॥। नाशिवंत हें शरीर ॥ सारासार साधावा ॥१८॥ ऐसे विचारूनि मानसीं ॥ मग निघते झाले तीर्थ यात्रेसीं॥प्रदक्षिणा करूनि तीर्थासीं ॥ उत्तर देशीं पातले ॥१९॥ जातां जातां उत्तरदिदोसी ॥ कांतार वन देखिलें दृष्टीसीं ॥ मग प्रवेश केला तया समयासीं ॥ वना माजी ॥२०॥ तेथें तुळसीवन असे सुंदर ॥ देखोनि संतोषले द्वीजवर ॥ मग साष्टांग केला नमस्कार ॥ उभयतांनी ॥२१॥ तंव समीप असे वट वृक्ष एक ॥ तो महा विस्तीर्ण सुंदर देख ॥ त्यासीं दिखूनि परम हरिख ॥दोघे विप्र पावले ॥२२॥ तंव ज्येष्ठ म्हणे कनिष्ठासीं ॥ आम्ही श्रमून आलो या वनासीं ॥ विश्रांती पावळो या स्थळासी ॥ तुळसी वन देखुनी ॥२३॥ धन्य धन्य आमुचे पुण्य ॥ दृष्टी देखिलें तुळसी वन ॥ ऐसें बोलोनिया अनुष्ठान ॥ तुळसी चें करिते जाहले ॥२४॥चातुर्मास पर्यंत ॥ पूजन अर्चन केलें तेथें ॥ जप तप सदोदित ॥ करितसे तुळसी पासी ॥२५॥ अनुष्ठानाचे अगाध जाहले पुण्य ॥ मग विष्णूणे पाठविले विमान ॥ दिव्यांबरे वस्त्रें भूषण ॥ त्यासीं पाठविलीं ॥२६॥ तेजोमय कल्लोळी ॥ विमन उतरले भू मंडळीं ॥ विष्णू दूत तये वेळीं ॥ बोलते जाहले ॥२७॥ तुम्ही केलें तुळसीचे अनुष्ठान ॥ म्हणोनि प्रसन्न जाहले नारायण ॥ दिव्यांबरं आणि विमान ॥ तुह्मां कारणें पाठविलें ॥२८॥ तरीहीं अलंकार भूषणें ॥ दिव्यांबरे करा पारीधान ॥ ऐसे बोलुनिया आपण ॥ पुढें ठेविते जाहले ॥२९॥ मग त्यांसी करोनि नमस्कार ॥ आपणलेइले अलंकार ॥ वस्त्रं परिधान करूनी सत्वर ॥ विमानीं बैसते जाहले ॥३०॥ तत्काळ विमान गेले विष्णु भुवनासी ॥

मग उतरोनि चरण चालीसी ॥ येते जाहले हरि पासी ॥ तेसमयी ॥३१॥ चतुर्भुज पीतांबरधारी ॥ रत्न जडित मुगुट शिरीं ॥वैजयंती शोभे हृदयावरी ॥ भगवंताच्या ॥३२॥ सुनीळ नीळाचा गाभा ॥ कोटि सूर्याच्या सारिखी प्रभा ॥ त्या प्रकारी अति शोभा ॥ दश दिशा उजळल्या ॥३३॥ शंख चक्र गदा शोभती ॥ ऐसा दुरीं देखिला लक्ष्मी पती ॥ राही रुक्मिणी समस्ती ॥ उभ्या दोनी भागीं ॥३४॥ सत्यभामा चवरें ढाळी ॥ नारद विणा वाजवी जवळी ॥ ऐसा देखिला वनमाळी ॥ उभयतांनी ॥३५॥ मग साष्टांग घातला नमस्कार ॥ स्तुती करिती अपार ॥ मग आपला समाचार ॥ वरमेधा श्रुत करी ॥३६॥ म्हणे मज पूर्वी ब्रम्ह हत्या घडली होती ॥ यास्तव गेला सर्प योनी प्रती ॥ इंद्राचे आनंदवनांत वस्ती ॥म्या धरली होती ॥३७॥ यावनीं देवांगना नृत्य करिती ॥ त्यास लुब्ध होय मी चित्तीं ॥ ऐसे कित्येक दिवस त्या स्थळा प्रती ॥ म्या कर्मिलें जाणा ॥३८॥ तंव एकेदिवसी अकस्मात ॥ लोम हर्षण आला तेथें ॥ त्यानें देखोनिया मातें ॥ वन दग्ध केले ॥३९॥ मग मी अग्नि संगें जळलो ॥ सर्वेचि ब्रह्मराक्षस झालों ॥ एका वृक्षावरी असे बैसलो॥ रात्रं दिवस ॥४०॥ ऐसे क्रमिळें दिवस बहुत ॥ तंव तेथें लोम हर्षण आले अकस्मात ॥ त्यासीं देखोनियां त्वरित ॥ मस्तक चरणीं ठेविला ॥४१॥ कीव मकिली बहुत ॥ मगते झाले कृपावंत ॥ आतां ब्राह्मण जन्म पावसी नेमस्त ॥ येथून सुटका जाहली तुझी ॥४२॥ तुज सांग घडलें वेदाध्ययन ॥ तु होसी शास्त्रज्ञ संपूर्ण ॥ द्रव्यवंत बहुत होसी जाण ॥ चिंता न करीं ॥४३॥ प्रपंचीं भोगिसी सुख ॥ मग तीर्थ यात्रा करिसी देख ॥ मग तुळसी वनदेखसी एक ॥ अपूर्व नयनीं ॥४४॥ तेथें करसी तुळसीचें अनुणष्ठान ॥ तेणें प्रसन्न होईल नारायण ॥ श्री हरी दाखवील अपुले चरण ॥ तै तुझे गमन खुंटेल ॥४५॥ ऐसें बोलिला कृपा मूर्ती ॥ तेंचि झाले निभ्राती ॥ आजि चरण तुझे लक्ष्मी पती ॥ म्या देखिले ॥४६॥ ऐसें सांगोनि ते समयी ॥ साष्टांग नमस्कार केला पाही ॥ हरी म्हणे आता चिंता काही ॥ न करा तुम्ही ॥४७॥ तुळसीचें अनुष्ठान तुज अगाध जोडलें पुण्य ॥ आतां मज

सन्निध राहोन आनंद करी ॥४८॥ तुळसी प्रसादे करून ब्राह्मण जाहले परम पावन ॥ श्री हरीने वेकुंठी नेउन ॥ अक्षय पदीं स्थापिला॥॥४९॥ ऐसी कथा मरीची ऋषी पासी ॥ गरुडें सांगीतली त्या समयासी ॥ ऐको नियां सर्वोसीं ॥ समाधान जाहलें ॥५०॥ प्रथमोध्यायीं मंगळा चरण ॥ तुळसी काष्ठाचें गंध उगाळुन ॥ करावें श्री विष्णु पूजन ॥ ब्राह्मण संतर्पण सांगीतलें ॥५१॥ तुळसी खुटावयाची युक्ती ॥ दूर्वा वहावयाची प्रमाणोक्ती ॥ सर्व देवांच्या अनुष्ठाना ची प्रचीती ॥ सांगीतली द्वितीयाध्यायी॥५२॥ दशारथानें केलें अनुष्ठान ॥ तुळसी जाहली सुप्रसन्न ॥ चौघे पुत्र तयातें देउन ॥ तृतीय अध्याय संपविला ॥५३॥ चौत्या अध्यायाचे अंतीं चरित्र ॥ सोळा नामें सांगीतलीं परिकर ॥ पातकी पोंड्रीकाचा करूनि उद्धार ॥ वैकुंठ पदीं स्थापिला ॥५४॥ दोष घडला पार्वतीस ॥ कौनतेया ब्रह्मणाचे सांगोनि चरित्रास ॥ तुळसी नें स्वस्थला प्रती पाठ विलीतीस ॥ हे चि कथा पांचव्यांत ॥५५॥ साहावे अध्यायाचे अंतीं कथा ॥ ब्रह्मयास झाली शाप मुक्तता ॥ सुमलिनी झाली पुत्र वंती तत्वता ॥ तिच्या चारित्रा वार्णिलले ॥५६॥ सप्त्ममोध्यायी कथा सुरस ॥ राजे आणि ऋशी आले स्व्याम्वारास ॥ देवसेनेसी दाखऊनि श्वेत दीपास ॥तिच्या मनोरथास पुरविले ॥५७॥ आठवे अध्यायीं कथन ॥ उदयन राजा राणी सूशीला जाण ॥ तयाचें वारधक्य जाउन ॥ पुत्र वंती जाहली ॥५८॥ समस्त ऋषि स्वंदासींशरणयेत ॥ शिव वरदें अनुष्ठान करित ॥ मंत्र सिद्धीं सांगोनि तारका वधित । हेचि वदत नवमो ध्यायीं ॥५९॥ कृष्ण जोसी ज्ञान कर्म हीन ॥ तुळसी प्रसादे झाला षडशास्त्र निपुण ॥ यम दूत पुण्याचा लक्षांशास गेले मागोन ॥ दशमोध्यायीं हे चिकथा ॥६०॥ एकादशोध्यायीं कथा विषेष ॥ श्री हरी सांगती नारदास ॥ पूजा विधि मंत्र युक्त सुरस ॥ तुळसीची सांगीतली ॥६१॥ द्वादादशोध्यायीं कथा ॥ प्रसिद्ध ससुद्र मंथनी चोदा रत्नं काढिलीं अभेद ॥ प्रेमोदके तुळसी उत्पत्ती सांगीतली सुबद्द ॥ वरदान युक्त तेघवां ॥६२॥ त्रयोदशाध्यायीं निरोपण ॥ कृष्णें केले अनुष्ठान ॥ द्वारकेंत रास क्रीडा खेळोन ॥ तेथून प्रयाग स्थळीं

राहिलीं ॥६३॥ चतुरदशोध्यायीं कथन ॥ मनोहर मृत्तिका आख्यान॥ पातकी लुव्धक तुळसीनें उंडरोन॥ वैकुंठ भुवनीं पाठविला ॥६४॥ इंद्रास घडतां शाप दारुण ॥ चतुर्दश रत्न विभागें झालें शाप मोचन॥ वरमेधा सुमेधा वैकुंठीं स्थापुन ॥ पंचदशोध्याय संपविला॥६५॥हे पंघधरा अध्याय तुळसी माहात्म्य ॥ केवळ पंघरा खणाचे मंदिर परम ॥ यांत तुळसी सहित पुरुषोत्तम ॥ घवघवीत विराजे ॥६६॥ सद्भावे करितां पूजन अर्चन ॥ संतोषोनी जनार्दन ॥ चिंतिले फळ प्राप्त करुन ॥ शेवटीं अक्षय फळ प्राप्त करी॥६७॥ वक्ता विनवी श्रोतियांसी ॥ तुळसी माहात्म्य ऐसें असे ॥ श्रवणे महापातकाचा होय नाश ॥विठ्ठल दास रुद्र म्हणे ॥६८॥ येथूनि तुळसी माहात्म्य जाहलें संपूर्ण ॥ लिहून केलें कृष्णारपण ॥ भक्तांसी तारी श्री नारायण ॥ परमात्मा श्री हरी ॥६९॥ इति श्री स्कंद पुराणे ॥ तुळसी माहात्म्य कथने ॥ ऋषिसंवाद परिसणें ॥ पंचदशोऽध्याय गोड हा॥७०॥

॥ इति श्रीस्कंद पुराणे तुळसी माहात्म्ये पंचदशोःयायःसमाप्तः ॥आ.१५॥

॥समाप्तोष्यंग्रंथः॥ ॥श्रीकृष्णापंणमस्त॥॥श्रीमजत्रगदीश्वरापणमस्तु॥॥शुभंभवतु॥

॥ श्री स्वामी समर्थापणमस्तू ॥श्री गुरु दत्तात्रयार्पणमस्तू॥

॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥

❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀

## ॥ श्री तुलसी कवचम् ॥

॥ श्री गणेशाय नमः ॥अस्य श्री तुलसीकवच स्तोत्रमंत्रस्य ।श्री महादेव ऋषिः । अनुष्टुप्छन्दः ।श्रीतुलसी देवता । मन ईप्सितकामनासिद्ध्यर्थं जपे विनियोगः ।

तुलसी श्रीमहादेवि नमः पंकजधारिणी ।शिरो मे तुलसी पातु भालं पातु यशस्विनी ॥ १ ॥दृशौ मे पद्मनयना श्रीसखी श्रवणे मम ।घ्राणं पातु सुगंधा मे मुखं च सुमुखी मम ॥ २ ॥जिव्हां मे पातु शुभदा कंठं विद्यामयी मम ।स्कंधौ कह्वारिणी पातु हृदयं विष्णुवल्लभा ॥ ३ ॥पुण्यदा मे पातु मध्यं नाभि सौभाग्यदायिनी । कटिं कुंडलिनी पातु ऊरू नारदवंदिता ॥ ४ ॥जननी जानुनी पातु जंघे सकलवंदिता । नारायणप्रिया पादौ सर्वांगं सर्वरक्षिणी ॥ ५ ॥ संकटे विषमे दुर्गे भये वादे महाहवे । नित्यं हि संध्ययोः पातु तुलसी सर्वतः सदा ॥ ६ ॥ इतीदं परमं गुह्यं तुलस्याः कवचामृतम् । मर्त्यानाममृतार्थाय भीतानामभयाय च ॥ ७ ॥ मोक्षाय च मुमुक्षूणां ध्यायिनां ध्यानयोगकृत् । वशाय वश्यकामानां विद्यायै वेदवादिनाम् ॥ ८ ॥ द्रविणाय दरिद्राण पापिनां पापशांतये ॥ ९ ॥अन्नाय क्षुधितानां च स्वर्गाय स्वर्गमिच्छताम् । पशव्यं पशुकामानां पुत्रदं पुत्रकांक्षिणाम् ॥ १० ॥ राज्याय भ्रष्ट राज्यानाम शांतानां च शांतये ॥ भक्त्यर्थं विष्णुभक्तानां विष्णौ सर्वांतरात्मनि ॥ ११ ॥ जाप्यं त्रिवर्गसिध्यर्थं गृहस्थेन विशेषतः ।उद्यन्तं चण्डकिरणमुपस्थाय कृतांजलिः ॥ १२॥तुलसीकानने तिष्टन्नासीनौ वा जपेदिदम् । सर्वान्कामानवाप्नोति तथैव मम संनिधिम् ॥ १३ ॥ मम प्रियकरं नित्यं हरिभक्तिविवर्धनम् । या स्यान्मृतप्रजा नारी तस्या अंगं प्रमार्जयेत् ॥ १४ ॥ सा पुत्रं लभते दीर्घजीविनं चाप्यरोगिणम् । वंध्याया मार्जयेदंगं कुशैर्मंत्रेण साधकः ॥ १५ ॥ साऽपिसंवत्सरादेव गर्भं धत्ते मनोहरम् ।अश्वत्थेराजवश्यार्थी जपेदग्नेः सुरुपभाक ॥ १६ ॥पलाशमूले विद्यार्थी तेजोर्थ्यभिमुखो रवेः । कन्यार्थी चंडिकागेहे शत्रुहत्यै गृहे मम ॥ १७ ॥ श्री कामो

विष्णुगेहे च उद्याने स्त्री वशा भवेत् । किमत्र बहुनोक्तेन शृणु सैन्येश तत्त्वतः ॥ १८ ॥ यं यं काममभिध्यायेत्त तं प्राप्नोत्यसंशयम् । मम गेहगतस्त्वं तु तारकस्य वधेच्छया ॥ १९ ॥जपन् स्तोत्रं च कवचं तुलसीगतमानसः । मण्डलात्तारकं हंता भविष्यसि न संशयः ॥ २० ॥ ॥

इति श्रीब्रह्मांडपुराणे तुलसीमाहात्म्ये तुलसीकवचं नाम स्तोत्रं श्रीतुलसी देवीं समर्पणमस्तु ॥

॥ श्री स्वामी समर्थार्पणमस्तू ॥श्री गुरु दत्तात्रयार्पणमस्तू॥

॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥

❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀

## श्री तुलसी देवी नाम अष्टक स्तोत्र

।। वृंदा,वृन्दावानी,विश्व पूजिता ,विश्व व्यापिनी ,पुष्पसारा नंदिनी च तुलसी ,कृष्ण जीवनी ।। एतं नाम अष्टकम चैव स्तोत्र नामार्थ संयुतम ।।

यःपठेत तां च सम्पूज्य सो अश्वमेघ फलं लभेत

महा प्रसाद जननी सर्व सौभाग्य वर्धिनी

आधी व्याधी हर नित्यं तुलसी देवी नमोस्तुते ।।

।। श्री स्वामी समर्थार्पणमस्तू ।।श्री गुरु दत्तात्रयार्पणमस्तू।।

।।शुभं भवतु ।। ।।शुभं भवतु ।। ।।शुभं भवतु ।।

❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# श्री पुण्डरीक कृतं तुलसीस्तोत्रम्

जगद्धात्रि! नमस्तुभ्यं विष्णोश्च प्रियवल्लभे ।यतो ब्रह्मादयो देवाः सृष्टि स्थित्यन्तकारिणः ॥ १॥नमस्तुलसि कल्याणि नमो विष्णुप्रिये शुभे ।नमो मोक्षप्रदे देवि नमः सम्पत्प्रदायिके ॥ २॥तुलसी पातु मां नित्यं सर्वापद्भ्योऽपि सर्वदा ।कीर्तितापि स्मृता वापि पवित्रयति मानवम् ॥ ३॥नमामि शिरसा देवीं तुलसीं विलसत्तनुम् ।यां दृष्ट्वा पापिनो मर्त्या मुच्यन्ते सर्वकिल्बिषात् ॥ ४॥तुलस्या रक्षितं सर्वं जगदेतच्चराचरम् ।या विनिहन्ति पापानि दृष्ट्वा वा पापिभिर्नरैः ॥ ५॥नमस्तुलस्यतितरां यस्यै बद्धाञ्जलिं कलौ ।कलयन्ति सुखं सर्वं स्त्रियो वैश्यास्तथाऽपरे ॥ ६॥तुलस्या नापरं किञ्चिद्दैवतं जगतीतले ।यथा पवित्रितो लोको विष्णुसङ्गेन वैष्णवः ॥ ७॥तुलस्याः पल्लवं विष्णोः शिरस्यारोपितं कलौ ।आरोपयति सर्वाणि श्रेयांसि वरमस्तके ॥ ८॥तुलस्यां सकला देवा वसन्ति सततं यतः ।अतस्तामर्चयेल्लोके सर्वान् देवान् समर्चयन् ॥ ९॥नमस्तुलसि सर्वज्ञे पुरुषोत्तमवल्लभे ।पाहि मां सर्व पापेभ्यः सर्वसम्पत्प्रदायिके ॥ १०॥इति स्तोत्रं पुरा गीतं पुण्डरीकेण धीमता ।विष्णुमर्चयता नित्यं शोभनैस्तुलसीदलैः ॥ ११॥तुलसी श्रीर्महालक्ष्मीर्विद्याविद्या यशस्विनी ।धर्म्या धर्मानना देवी देवीदेवमनःप्रिया ॥१२॥लक्ष्मीप्रियसखी देवी

द्यौर्भूमिरचला चला ।षोडशैतानि नामानि तुलस्याः कीर्तयन्नरः ॥ १३॥लभते सुतरां भक्तिमन्ते विष्णुपदं लभेत् ।तुलसी भूर्महालक्ष्मीः पद्मिनी श्रीर्हरिप्रिया ॥ १४॥तुलसि श्रीसखि शुभे पापहारिणि पुण्यदे ।नमस्ते नारदनुते नारायणमनःप्रिये ॥ १५॥

इति श्री पुण्डरीक कृतं तुलसीस्तोत्रम् सम्पूर्णम् ॥

॥ श्री स्वामी समर्थार्पणमस्तू ॥श्री गुरु दत्तात्रयार्पणमस्तू॥

॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥ ॥शुभं भवतु ॥

❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# ॥ श्री तुलसी चालीसा॥

।श्री गणेशाय नमः।श्री स्वामी सामर्थाय नमः ।॥ दोहा ॥श्री तुलसी महारानी । करूं विनय सिरनाय।जो मम हो संकट विकट । दीजै मात नशाय॥॥चौपाई ॥नमो नमो तुलसी महारानी । महिमा अमित न जाय बखानी।दियो विष्णु तुमको सनमाना । जग में छायो सुयश महाना॥विष्णुप्रिया जय जयतिभवानि । तिहूँ लोक की हो सुखखानी।भगवत पूजा कर जो कोई । बिना तुम्हारे सफल न होई॥जिन घर तव नहिं होय निवासा । उस पर करहिं विष्णु नहिं बासा।करे सदा जो तव नित सुमिरन । तेहिके काज होय सब पूरन॥कातिक मास महात्म तुम्हारा । ताको जानत सब संसारा।तव पूजन जो करैं कुंवारी । पावै सुन्दर वर सुकुमारी॥कर जो पूजा नितप्रति नारी । सुख सम्पत्ति से होय सुखारी।वृद्धा नारी करै जो पूजन । मिले भक्ति होवै पुलकित मन॥श्रद्धा से पूजै जो कोई । भवनिधि से तर जावै सोई।कथा भागवत यज्ञ करावै । तुम बिन नहीं सफलता पावै॥छायो तब प्रताप जगभारी । ध्यावत तुमहिं सकल चितधारी।तुम्हीं मात यंत्रन तंत्रन में । सकल काज सिधि होवै क्षण में॥औषधि रूप आप हो माता । सब जग में तव यश विख्याता ।देव रिषी मुनि औ तपधारी । करत सदा तव जय जयकारी॥वेद पुरानन तव यश गाया । महिमा अगम पार नहिं पाया।नमो नमो जै जै सुखकारनि । नमो नमो जै दुखनिवारनि॥नमो नमो सुखसम्पति देनी । नमो नमो अघ काटन छेनी।नमो नमो भक्तन दुःख हरनी । नमो नमो दुष्टन मद छेनी॥नमो नमो भव पार उतारनि । नमो नमो परलोक सुधारनि।नमो नमो निज भक्त उबारनि । नमो नमो जनकाज संवारनि॥नमो नमो जय कुमति नशावनि । नमो नमो सुख उपजावनि।जयति जयति जय तुलसीमाई । ध्याऊँ तुमको शीश नवाई॥निजजन जानि मोहि अपनाओ । बिगड़े कारज आप बनाओ।करूँ विनय मैं मात तुम्हारी । पूरण आशा करहु हमारी॥शरण चरण कर जोरि मनाऊं । निशदिन तेरे ही गुण गाऊं।करहु मात यह अब मोपर दाया । निर्मल होय सकल ममकाया॥मंगू मात यह बर दीजै । सकल मनोरथ पूर्ण कीजै।जनूं नहिं कुछ नेम अचारा । छमहु मात अपराध हमारा॥बरह

मास करै जो पूजा। ता सम जग में और न दूजा।प्रथमहि गंगाजल मंगवावे। फिर सुन्दर स्नान करावे।।चन्दन अक्षत पुष्प् चढ़ावे। धूप दीप नैवेद्य लगावे।करे आचमन गंगा जल से। ध्यान करे हृदय निर्मल से।।पाठ करे फिर चालीसा की। अस्तुति करे मात तुलसा की।यह विधि पूजा करे हमेशा। ताके तन नहिं रहै क्लेशा।।करै मास कार्तिक का साधन। सोवे नित पवित्र सिध हुई जाहीं।है यह कथा महा सुखदाई। पढ़े सुने सो भव तर जाहीं।।।। दोहा ।।यह श्री तुलसी चालीसा पाठ करे जो कोय।गोविन्द सो फल पावही जो मन इच्छा होय।।

।। इति श्री तुलसी चालीसा ।।

।। श्री स्वामी समर्थार्पणमस्तू ।।श्री गुरु दत्तात्रयार्पणमस्तू।।

।।शुभं भवतु ।। ।।शुभं भवतु ।। ।।शुभं भवतु ।।

❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀ ❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀